## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५६९

निर्णय दिनांक १६-११-२००७

१ श्री. नरेंद्र चंद्रशेखर पाटील, : अपिलार्थी
शितलस्मृती, अहिल्याबाई होळकर उद्यानाजवळ,
बिदर रोड, उदगीर, तालुका उदगीर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प,
लातूर, तालुका जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हाधिकारी, लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नरेंद्र चंद्रशेखर पाटील हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प श्री. प्रदीप विश्वंभरराव मरवाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत आणि जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी म्हणून सुध्दा तेच हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे देवर्जन मध्यम प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी मौजे नेकनाळ तालुका देवणी तत्कालीन तालुका उदगीर येथील सर्व्हे नंबर ७० पैकी संपादीत केलेल्या ४६ आर क्षेत्राच्या मावेजासंदर्भात खालील प्रमाणे, १९९३ ते २००६ या कालावधीमधील माहिती मागितली होती.

१. “ अर्जदाराने दिनांक २० एप्रिल २००६ रोजी केलेल्या अर्जावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील.

२. सदरील सर्व्हे नंबर ७० मधील संपादीत जमीन ४६ आर जमिनीचा मावेजा मिळण्यासाठी इतर कोणी अर्ज केला आहे काय ?

३. नरेंद्र चंद्रशेखर पाटील हे सर्व्हे नंबर ७० मधील संपादीत जमीन ४६ आर चा मावेजा मिळण्यास अपात्र आहेत काय ?

४. असे असल्यास, यासंबंधीच्या कायदेशीर तसेच तांत्रिक बाबींचा खुलासा.”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीला आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात संबंधीत संचिकेतील कागदपत्रे निश्चित करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात दिनांक १२-०६-२००६ रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या पत्रास अनुसरुन अपिलार्थी तदनंतर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १३-०६-२००६ रोजी उपस्थित राहिले. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना, पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली नस्ती न पाहता त्यांना पत्र स्वरुपात उत्तर पाहिजे असल्याचे सांगून ते निघून गेले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून लिखीत स्वरुपात कोणताही प्रतिसाद विहित मुदतीत न मिळाल्यामुळे अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर त्यांनी दिनांक ०५-०८-२००६ असा दिनांक दर्शविला आहे.

सदर अपिलाची सुनावणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक १५-०९-२००६ रोजी घेऊन या संदर्भात आपले आदेश दिले. या ठिकाणी असे दिसून येते की, जिल्हाधिकारी यांनी त्यांचे आदेश देतांना ते स्वतंत्र निर्णय स्वरुपात न काढता त्यांनी कार्यालयीन नस्तीवरच त्यांच्या निर्णयाची नोंद केली आहे. या नस्तीतील टिपणीमध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी विचारलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक १ व २ वर काय कारवाई केली याची माहिती देण्याची नोंद घेतली आहे. हे आदेश जिल्हाधिका-यांनी कोणास दिले याची नोंद या टिपणीच्या प्रतीवरुन दिसून येत नाही. अपील सुनावणीवर निर्णय कशा प्रकारे देऊ नये याचे हे प्रकरण म्हणजे एक उत्तम नमुना आहे असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस आपला निर्णय लेखी स्वरुपात न कळवून फक्त कार्यालयीन नस्तीच्या टिपणीवर आपला अभिप्राय नोंदविला, ही बाब माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या पूर्णपणे विसंगत आहे. कारण त्यांच्या या निर्णयाविरुध्द जर अपिलार्थीस अपील करावयाचे असेल तर जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील निर्णयाची प्रत जोडणे अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे आवश्यक आहे. अशा प्रकारची कोणतीही कारवाई अपिलार्थीस या ठिकाणी जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील आदेश पारीत करण्याच्या चुकीच्या पध्दतीमुळे करता आली नाही, याची येथे प्रामुख्याने नोंद घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०९-२००६ रोजी अपिलार्थी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडील

पत्र क्रमांक १९९२/एलएनक्यू/मा.अ./सीआर-२८ त्यांना अन्वये कळविली आहे. सदर माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने विचारलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे दिसून येते.

तथापि, वरील माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलामध्ये जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उशीरा माहिती पुरविली असून ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे असे म्हटले आहे. सदर माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याच्या संदर्भात त्यांनी आयोगाकडे कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांनी लागलीच दुस-याच दिवशी म्हणजे दिनांक ०७-०६-२००६ रोजी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या संचिकेतील कागदपत्रे निश्चित करण्याकरिता त्यांच्या कडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या कार्यालयात दिनांक १२-०६-२००६ रोजी उपस्थित राहण्यासंदर्भात कळविले होते. तथापि जन माहिती अधिका-याचे हे पत्र अपिलार्थीस उशीरा प्राप्त झाल्याने ते दिनांक १३-०६-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर झाले. त्या दिवशी म्हणजे दिनांक १३-०६-२००६ रोजी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहूनही कोणतीही कारवाई केली नाही. तथापि तदनंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १४ ऑक्टोंबर २००६ रोजी उपस्थित राहून त्यांना आवश्यक असलेल्या एकूण ९५ दस्तऐवजांच्या प्रतीची मागणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे केली. सदर दस्तऐवजांच्या प्रती जन

माहिती अधिकारी यांनी आवश्यक ते शुल्क आकारुन दिनांक ०६-१२-२००६ रोजी पुरविल्या.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी, नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली असून, अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये मुद्दामहून टाळाटाळ केली नसल्याचे त्यांनी, आयोगापुढील युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणत्याही प्रकारे मुद्दामहून टाळाटाळ केल्याचे अथवा अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे सिध्द होत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या दिनांक ०६-०६-२००६ रोजीच्या अर्जातील संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०९-२००६ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याचे कारण जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने व त्याचबरोबर अपिलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे, हे त्यांना निश्चित न करता आल्यामुळे ते अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरवू शकले नाही, असे सांगितले. त्यांच्या विधानात सत्यतेचा थोडा अंश दिसून येतो, कारण त्यांना जर अपिलार्थीपासून माहिती लपवावयाची असती तर त्यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील संबंधीत नस्ती पाहण्याकरिता उपलब्ध करुन देण्याची सकारात्मक भूमिका सुरुवातीसच घेतली नसती. एवढे जरी असले तरी त्यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी विहित मुदतीपेक्षा जास्त कालावधीचा विलंब लावून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा काही प्रमाणात भंग केल्याचे दिसून येते. अपिलार्थीने माहिती पोस्टाने मागितली असता त्यांना व्यक्तिशः कार्यालयात उपस्थित राहण्यास सूचित करण्याची जन माहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे याची नोंद त्यांनी

घ्यावी. त्यांनी अपिलार्थीस जरी विलंबाने माहिती दिली असली तरी त्यामध्ये त्यांचा, कोणताही असद्‌हेतू होता असे आयोगास आढळून येत नाही, कारण त्यांनी अपिलार्थीस मध्यंतरीच्या काळात वेळोवेळी त्यांच्याकडील उपलब्ध नस्त्या पाहणी करण्यासाठी उपलब्ध केल्या होत्या. त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा काहीशा प्रमाणात भंग केल्यामुळे त्यांना, आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी यापुढे त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी प्रमाणे प्राप्त झालेल्या सर्व माहितीच्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी, आवश्यक ती माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, ती त्यांनी मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्यामुळे, सदर माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. फक्त अपिलार्थीस उशीरा माहिती मिळाला हा अपिलार्थीचा मुद्दा मान्य करण्यात येऊन त्याकरिता, जन माहिती अधिकारी यांना वरील प्रमाणे ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, येथून पुढे त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियमा व्दारे प्राप्त झालेल्या अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये आवश्यक ती कारवाई करावी.

औरंगाबाद	( वि. बा. बोरगे )

दिनांक	१६-११-२००७	राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१	श्री. नरेंद्र चंद्रशेखर पाटील, शितलस्मृती, अहिल्याबाई होळकर उद्यानाजवळ, बिदर रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२	जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, पूर्णा प्रकल्प, लातूर, तालुका जिल्हा लातूर	यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, लातूर	यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५	निर्णय नस्ती

१.	श्री.सुनील विनायकराव मगर, ढोकी रोड, कळंब, जिल्हा-उस्मानाबाद

२. माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जनअपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६०

निर्णय दिनांक १६-११-२००७

१ श्री. एस. एम. पिसोळकर, : अपिलार्थी

सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश,

शिवाजीनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा

महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा

महानगरपालिका, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | उप अभियंता, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | | शहर अभियंता, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. एस. एम. पिसोळकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त श्री. विलास भोसीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, महानगरपालिका श्री. मोहन धोंडिबा वाघमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील सिमेंट रस्त्याच्या बांधकामा संदर्भात व साफसफाई आणि पाणी समस्याबाबत २००० ते २००६ या कालावधीमधील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेल्या माहितीमध्ये -- मालमत्ता कर वसूली विभाग, स्वच्छता विभाग, पाणीपुरवठा विभाग आणि बांधकाम विभाग या ४ विभागाचा समावेश होतो.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड पोस्टाने अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने सांगितले की, अपिलार्थीचा सदर अर्ज प्रथम महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झाला व तदनंतर तो वेगवेगळ्या विभागाकडे त्यांनी पाठविला. सदर अर्ज सामान्य प्रशासन विभागाकडे कधी प्राप्त झाला व तो कोणत्या विभागाकडे कधी पाठविला याची माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी देऊ शकले नाहीत. अपिलार्थीने विचारलेल्या मालमत्ता विभागा संदर्भातील माहिती उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे नाही. पाणीपुरवठ्या बाबत अपिलार्थीने विचारलेल्या माहिती संदर्भातील माहिती अपिलार्थीस त्यांनी दिनांक २६-०३-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिल्याचे आयोगास सांगितले. अपिलार्थीने विचारलेली रस्त्या-संदर्भातील माहिती त्यांनी दिनांक ०५-०१-२००७ रोजी अपिलार्थीस दिल्याचे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००७ रोजी प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण व चुकीची असल्याचे नमूद केले आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सदर अपिलावर सुनावणी न घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बद्दल त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांच्या या कृतीव्दारे स्पष्ट केला आहे असे

आयोगाचे स्पष्ट मत आहे. त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील न ठरवून आपल्या कार्यशैली-तील कर्तव्य परायणतेचा अभाव याव्दारे स्पष्ट केला असून त्याच्या या कार्यपध्दतीची नोंद आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०३-२००७ रोजी व्दितीय अपील केले. सदर अपील करण्याचे कारण म्हणून त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपील त्यांनी ठरविले नाही असे अपिलार्थीने या अर्जात दिले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी ज्या रस्त्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीची मागणी केली होती, त्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे. त्यांनी त्यांच्या युक्तिवादाप्रीत्यर्थ या रस्त्याचे काही फोटो आयोगास दाखविले. त्याचबरोबर या रस्त्यासंदर्भात वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांचे कात्रणही सादर केले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर रस्ता उत्कृष्ट असून, अपिलार्थीने दाखविलेले फोटो याच रस्त्याचे आहेत किंवा कसे याबाबत त्यांनी शंका व्यक्त केली.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे अनिवार्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत

होताच १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी द्यावा. सदर निर्णयावर अपिलार्थीचे समाधान न झाल्यास ते राज्य माहिती आयोगा कडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०१-२००७ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १६-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एस. एम. पिसोळकर, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, शिवाजीनगर, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शहर अभियंता, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६७

निर्णय दिनांक १६-११-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,<br>सचिव, जगजीवनराम को. ऑप. हौसिंग<br>सोसायटी, पद्मपूरा, ५-११-२०, पद्मपूरा,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,<br>औरंगाबाद, जिल्हाधिकारी कार्यालय, तळ<br>मजला, औरंगाबाद | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,<br>जालना रोड, कॅनरा बॅकेंचे वर, सेव्हन हिल<br>जवळ, उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

<u>**विवेचन**</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी रावसाहेब उदाजी राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. सदानंद गोविंदराव पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे औरंगाबाद शहरातील पद्‌मपूरा सर्व्हे क्रमांक ३ व २ च्या संदर्भात काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने मागविलेल्या या माहितीमध्ये -- सर्व्हे नंबर ३ व २ च्या मूळ नकाशाची प्रमाणित प्रत, सदर जागेची भूसंपादनानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली या संदर्भातील कागदपत्रे, सदर जागा चर्मकार समाजासाठी संपादन करुन त्यांच्या ताब्यात दिली काय ? दिली असल्यास त्याचा तपशील, सर्व्हे नंबर ३ पद्‌मपूरा, औरंगाबाद संपादीत केलेल्या मूळ नकाशाची प्रमाणित प्रत, जागा संस्थेकडे हस्तांतरीत करतांना त्यासोबत दिलेला मूळ नकाशा व त्या संदर्भातील कागदपत्रे, दिनांक ०९-०८-२००५ रोजी उच्च न्यायालयाने स्थगन आदेश उठविले असूनही त्या जागेची मावेजा रक्कम भरण्यासाठी दिरंगाई का, मोबदल्याची जागा देणार आहे की नाही, नसता सर्व्हे नंबर ३ चीच ३ एकर १९ गुंठ्ठे जागा आम्हास परत करणार काय ? वरील सर्व निमार्ण झालेल्या परिस्थितीस समाजकल्याण विभाग जबाबदार आहे हे सिध्द होत नाही काय, आमचा नष्ट झालेला वेळ, श्रम, पैसा व

झालेला मनःस्ताप यांची नुकसानभरपाई कोण देणार काय ? -- अशा इतर प्रकारचे अनेक प्रश्न विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः किंवा नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०६-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. तथापि या माहितीवर समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली गेली नसल्याचे आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने ही सुनावणी घेण्यासंदर्भात त्यांच्याकडे दिनांक १५-११-२००६ व ११-१२-२००६ रोजी २ स्मरणपत्रे देखील पाठविली आहेत. तथापि एवढे करुनही जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर सुनावणी घेतली नाही. सदर अपिलावर सुनावणी न घेण्याची कारणे त्यांनी आज आयोगासमोर एका शपथपत्राव्दारे सादर केली आहेत. या शपथपत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, सदर अपील अर्ज व तदनंतरची स्मरणपत्रे त्यांच्या कार्यालयातील संबंधीत नस्ती हाताळणारे कर्मचारी, सहाय्यक माहिती अधिकारी व माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे वेळेत सादर केली नाही व ही बाब राज्य माहिती आयोगाकडील दिनांक २०-१०-२००७ ची नोटीस त्यांचे कार्यालयास दिनांक ०६-११-२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर निदर्शनास आली. याबाबत संबंधितांकडून कारवाई करण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे त्यांनी या शपथपत्रात पुढे नमूद केले आहे. सदर कर्मचा-यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्यासाठी त्यांच्यावर दिनांक ०७-११-२००७ रोजी कारणे दाखवा

नोटीस बजावण्यात आली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे अनावधानाने राहून गेल्याचे त्यांनी शेवटी कबूल केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारे प्रतिसाद न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले. त्यामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकाही मुद्दयावर माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्या ताब्यात असलेला चुकीचा नकाशा संबंधितांकडून दुरुस्त करुन मिळण्याप्रीत्यर्थ त्यांना आजही या माहितीची आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०६-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे. अपिलार्थीस त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेला नकाशा दाखविला असता तो अपिलार्थीस मान्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यातील तांत्रिक विसंगती व क्लीष्टता पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम सुनावणी घेणे अनिवार्य आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी आयोगाकडे सादर केलेले, सुनावणी घेण्याचे अनावधानाने राहून गेले, हे कारण आयोग मान्य करत नाही व त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्याकडे सादर केलेल्या त्यांच्या दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी नुसार सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपला निर्णय पारीत करावा.

सदर निर्णय अपिलार्थी यांना मान्य नसेल तर ते राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घ्यावी व आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १६-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, सचिव, जगजीवनराम को. ऑप. हौसिंग सोसायटी, पद्मपूरा, ५-११-२०, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद, जिल्हाधिकारी कार्यालय, तळ मजला, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जालना रोड, कॅनरा बॅकेंचे वर, सेव्हन हिल जवळ, उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६५६

दिनांक १७-११-२००७

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी
मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी
कार्यालय, भोकर, तालुका भोकर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर,
तालुका भोकर,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, भोकर, जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जी. एस. रायबोळे हे गैरहजर आहेत तर, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. बशीर ऊजमाखान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. बी. एन. कावळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ तालुका कृषि कार्यालय तालुका भोकर जिल्हा नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती देणे – १) कामाचे नांव, २) गावांचे नांव, ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत, ६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे, अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु.

भ. च कामे, सी. ना. बा. कामे, मा. ना. बा. कामे, डा. बा. कामे इत्यादी कामाची माहिती देणे.

तालुका कृषि कार्यालय, तालुका भोकर जिल्हा नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, कामाचे मोजमाप (एम. बी.) पुस्तिकांची छायांकीत प्रत व तसेच वरील कामाचे कॅश बुकाची छायांकीत प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्राची माहिती देणे. ”

सदर माहिती अपिलार्थीने शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देण्यात आला नाही. अपिलार्थीच्या या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०२-१२-२००६ रोजी एक पत्र लिहिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्या कडून अपिलार्थीने विचारलेली माहिती संकलीत करण्याचे काम सुरु असून त्यांच्याकडून माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थीस देण्याचे त्यांनी आश्वासीत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी थोड्या फार फरकाने कायम ठेवल्याचे दिसून येते.

सदर, अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. उपस्थित

जन अपिलीय अधिकारी यांना, सदर अपिलाची सुनावणी घेतली किंवा कसे याबाबत विचारले असता त्यांनी वरील विधानास दुजोरा दिला.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी न घेऊन त्यांचे सहकारी कृषि अधिकारी यांना वाचविण्याचा प्रयत्न केला व त्याचबरोबर जलसंवर्धन कामात प्रचंड भ्रष्टाचार केला असल्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यास घाबरतात असे म्हटले आहे. याच अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिका-यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास पुढे विनंती केली आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेऊन त्यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये जी विधाने केली आहेत तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांचेकडील दिनांक ०२-१२-२००६ व ०५-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये दिली असून ही माहिती दिनांक १०-०१-२००७ रोजी अपिलार्थीस मिळाल्याची त्यांची पोहोच त्यांनी आयोगासमोर सादर केली आहे. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, सदर अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार तीच ती माहिती मागत असतात. त्यांच्या अशा प्रकारच्या सवयीमुळे त्यांच्या नियमीत कामात अडथळा निर्माण होतो. त्यांना ही माहिती त्यांच्याकडील मंडळ कृषि अधिका-याकडून गोळा करुन घ्यावी लागते, ती माहिती त्यांच्याकडे विलंबाने प्राप्त झाल्याने अंतीमतः त्यांना हा विलंब झाला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक १९-०६-२००६ रोजी मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १८-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीप्रमाणे सर्वसाधारण परिस्थितीत प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि, या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीपेक्षा ५ महिने १६ दिवस इतका विलंब लावल्याचे दिसून येते. या विलंबास, जन माहिती अधिकारी यांच्या अधिपत्याखालील मंडळ कृषि अधिकारी भोकर व मातूळ हे दोन अधिकारी देखिल जबाबदार असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) अन्वये, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे, त्यांचे जे इतर कर्मचारी जबाबदार असतील त्यांनाही जन माहिती अधिकारी समजण्यात यावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी या सर्वांनी मिळून अपिलार्थीस माहिती देण्यापोटी विलंब लावल्याचे सिध्द होत आहे. या विलंबाच्या समर्थनार्थ यांच्याकडे आजमितीस कोणतेही कारण उपलब्ध नाही. त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अर्जाकडे त्यांनी केलेले दुर्लक्ष, हेच अपिलार्थीस माहिती विलंबाने प्राप्त होण्यास कारण आहे असे आयोगाचे मत आहे. याच बरोबर, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, संबंधीत अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीअन्वये माहिती मागण्याचे अर्ज छापून घेतले असून त्यामध्ये काही जागा रिकाम्या ठेवल्या आहेत. या रिकाम्या जागेमध्ये, संबंधीत गावाचे अथवा तालुक्याचे नाव लिहून माहिती मागविणे हे केवळ एकच काम ते करत असल्याचे दिसून येते. या माहितीमुळे कोणते व्यापक जनहित ते साध्य करणार आहेत हे सांगण्यासाठी ते आज आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन माहिती अधिकारी यांनी, संबंधीत अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करुन त्यांच्या नियमीत कामात अडथळा आणतात, अशा अर्थाचा युक्तिवाद आयोगासमोर केला आहे. यासंदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, “माहिती मागवणे” हा भारतीय नागरिकांचा, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ अन्वये अधिकार व हक्क आहे. त्याचबरोबर, अधिनियमातील तरतुदीनुसार, कार्यवाही करण्याचे काम हे सार्वजनिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांवर लादलेले अतिरिक्त काम नसून, ते काम त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचाच एक अविभाज्य भाग आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचा हा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस मुळात प्रथम प्रतिसाद देखील त्यांच्याकडील दिनांक ०२-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिला. हा प्रथम प्रतिसाद देखील त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीपेक्षा विलंबाने दिल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्याच्या त्यांच्या कृतीव्दारे स्पष्ट केला आहे हे सिध्द होत आहे. तेव्हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीस अनुसरुन असे आदेशीत करण्यात येते की, आयुक्त (कृषि) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी कर्मचारी या सर्वांवर त्यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

अपिलार्थीस आता माहिती मिळाली असल्याने माहितीबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी कर्मचारी या सर्वांवर त्यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १७-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६७३

निर्णय दिनांक १७-११-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल,<br>मुख्याध्यापक,<br>केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे),<br>तालुका परळी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, बीड | : | प्रतिवादी |

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. व्ही. के. जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी श्री. एस. एस. सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या विभागीय चौकशी संदर्भात व सेवाविषयक बाबी, जी. पी. एफ. डिपॉझिट, पदोन्नती इत्यादी संदर्भात एकूण ५ मुद्दयावर खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

सदर माहिती मागवितांना त्यांनी अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडील दिनांक २५-०६-१९९७ रोजी त्यांनी पारीत केलेल्या निकालाचा संदर्भ दिला आहे.

१. “ सदरील निर्णयानंतर आपल्या खात्याने या निर्णयातील आदेशाप्रमाणे यासंबंधी कोणकोणती कार्यवाही केली त्या सर्व कार्यवाहीच्या / आदेशांच्या प्रती द्याव्यात.

२. या आदेशात पदोन्नतीचे प्रमाण ३:१ ठरवून त्यानुसार फेरचौकशी करावी व त्यानुसार योग्य निर्णय घ्यावा व चूक झाली असल्यास दुरुस्त करावी, असे म्हटलेले आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयाने व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचे कार्यालयाने आजपर्यत याबाबत केलेल्या फेरचौकशी बद्दल व घेतलेल्या निर्णयाबद्दलच्या तसेच यासंबंधीच्या अहवालाच्या सर्व प्रती द्याव्यात.

३. या आदेशात म्हटल्याप्रमाणे जी. पी. एफ. डिपॉझिट करण्याबद्दल व हे पेमेंट मला देणेबद्दल आजपर्यंत आपल्या खात्याने काय-काय कार्यवाही केली याबद्दलची माहिती परिपूर्णरित्या द्यावी.

४. आजपर्यंत ही रक्कम डिपॉझिट करण्यात आलेली नाही यासाठी कोणता अडसर निर्माण झाला ती कागदपत्रे द्यावीत व यासंबंधी आपणाकडे कोणती कार्यवाही प्रलंबित आहे याची माहिती द्यावी.

५. अप्पर विभागीय आयुक्तांच्या आदेशानंतर आपण त्यांचे वरिष्ठांकडे अपील केले होते काय ? केले असल्यास ते कोणाकडे आणि कधी केले होते याबद्दलची माहिती द्यावी. ''

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे अपर आयुक्त औरंगाबाद यांनी संदर्भ केलेल्या आदेशासंदर्भात त्यांचे कार्यालयाकडून झालेल्या कारवाईशी संबंधीत कागदपत्रांची मागणी केल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे व त्यामध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहिती संदर्भात एकूण ५ मुद्दयावर संदर्भिय प्रकरणातील सद्यःस्थितीची माहिती दिली आहे. या पत्राबरोबर त्यांनी शासनाकडून प्राप्त झालेले उत्तर व गट विकास अधिकारी यांनी दिलेल्या प्रमाणपत्राची छायांकीत प्रत देखील अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००६ रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांनी केलेल्या माहितीच्या अर्जातील सर्व ५ मुद्दयाची माहिती मिळाल्याचे मान्य केल्याने, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. त्यामध्ये त्यांनी माहिती अधिका-याने जन अपिलीय अधिका-याच्या निकालानंतर अद्यापही त्यांना माहिती दिली नसल्यामुळे व ती माहिती जाणुन-बुजून दिली नसल्यामुळे त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती वस्तुस्थितीशी पूर्णपणे विसंगत असून, त्यांनी त्यांच्या म्हणण्यापुष्ट्यर्थ आयोगास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे दाखविली.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या कडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे दिली असून, अपिलार्थीचा वादाचा मुद्दा फक्त -- त्यांचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम त्यांच्या पासबुकामध्ये जमा केली नसल्याबद्दलचा आहे. त्यांनी आयोगासमोर असेही कबूल केले की, अपिलार्थीच्या भविष्य निर्वाह निधीच्या पासबुकामध्ये ज्या काही विसंगती असतील त्या विसंगतींचा ते येत्या ७ दिवसाच्या आत ताळमेळ घालून ते अपिलार्थीस याच मुदतीत त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे पासबूक देतील.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये, "जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली नाही हे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी मान्य केले" असा उल्लेख आहे. तथापि, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयामध्ये, अपिलार्थीस ही माहिती दिलेली नाही अशा अर्थाचे कोणतेही विधान केलेले नाही. यावरुन अपिलार्थी हे आयोगाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आज दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांनी अपर विभागीय आयुक्त यांनी दिनांक २५-६-१९९७ रोजी दिलेल्या निकालानंतर प्रत्येक बाबीवर काय कारवाई झाली या संदर्भातील कारवाईच्या / आदेशाच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्या कडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रत्येक मुद्दयावर संक्षिप्त उत्तर देऊन त्यांना माहिती अवगत केली आहे. आज रोजीच्या सुनावणीमध्ये अपिलार्थीस चौथ्या वेतन आयोगा-मुळे प्राप्त झालेले सुधारीत वेतन व, त्यांना प्राप्त झालेले वेतन यातील फरक भविष्य निर्वाह निधी मध्ये जमा झाला नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. सदर फरक अपिलार्थीच्या खाती जमा झाला आहे, तथापि, त्यांची अपिलार्थीकडे उपलब्ध असलेल्या पासबुकामध्ये नोंद घेण्यात आली नाही असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी ही नोंद येत्या ७ दिवसात घेण्याचे व अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेले भविष्य निर्वाह निधी पासबुक अद्यावत करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. अपिलार्थीने माहिती मागितलेल्या माहितीपैकी उर्वरीत मुद्दे हे प्रशासकीय धोरणासंबंधीचे असून या संदर्भातील प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस द्याव्यात. सदर निर्णयाची योग्यअयोग्यता याबाबत आयोगाचे काहीही भाष्य नाही. याच बरोबर येथे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी हे

आयोगाची दिशाभूल करित आहेत -- असा वरीलप्रमाणे उपस्थित केलेला मुद्दा आयोग मान्य करित आहे.

सबब असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयावरील माहिती संदर्भातील सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. (ज्या प्रती त्यांनी अपिलार्थीस यापुर्वीच पुरविल्या होत्या त्या वगळून). त्याचबरोबर अपिलार्थीच्या भविष्य निर्वाह निधी पासबुकातील सर्व विसंगती त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत दूर करुन अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत भविष्य निर्वाह निधी पासबूक अद्यावत करुन द्यावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या मुद्दयावरील माहिती संदर्भातील सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. (ज्या प्रती त्यांनी अपिलार्थीस यापुर्वीच पुरविल्या होत्या त्या वगळून).

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या भविष्य निर्वाह निधी पासबुकातील विसंगती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत दूर करुन, अपिलार्थीस त्यांचे भविष्य निर्वाह निधी पासबुक ७ दिवसाच्या आत अद्यावत करुन द्यावे.

औरंगाबाद                                                    ( वि. बा. बोरगे )

दिनांक   १७-११-२००७                                राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे), तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/०३

निर्णय दिनांक   १९-११-२००७

१ श्री. संपत अंबादास जळके,   :   तक्रारदार

रा. भवानी रस्ता, घर नंबर ४४४/३, तुळजापूर,

तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी,

नगरपरिषद, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. संपत अंबादास जळके व जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद यापैकी कोणीही उपस्थित नाहीत.

तक्रारदाराने राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या दिनांक ०४-०४-२००७ रोजीच्या तक्रार अर्जान्वये (आयोगास प्राप्त दिनांक ०७-०४-२००७) अशी तक्रार केली आहे की, मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर यांनी, राज्य माहिती आयोगाने अपील क्रमांक २००६/ ६५/०७/औरंगाबाद संदर्भात दिनांक ०६-०२-२००७ रोजी दिलेल्या निर्णयातील आदेशांचे अद्यापही पालन केलेले नाही. त्यामुळे त्यांना तक्रारदारास माहिती देण्याचे सूचित करुन, त्यांच्यावर योग्य ती शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

या तक्रार अर्जावर आपले म्हणणे मांडण्यासाठी, तक्रारदार व मुख्याधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. मुख्याधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाचे आदेश, त्या आदेशामध्ये दिलेल्या मुदतीत पालन करणे माहिती अधिकार अधिनियमान्वये अनिवार्य होते. तथापि, या प्रकरणी मुख्याधिकारी यांनी तक्रारदारास माहिती दिली किंवा नाही हे समजण्यास ते उपस्थित नसल्यामुळे मार्ग नाही. तक्रारदारास त्यांनी माहिती दिली नसल्यास ती, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत तात्काळ विनामूल्य द्यावी असे आदेशीत करण्यात येत आहे.

मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत मूळ सुनावणी आदेशामध्येच आदेश दिले असल्यामुळे त्यासंबंधीचे पुर्नआदेश नाहीत. तथापि, संचालक नगरपालिका प्रशासन यांनी, आयोगाने दिलेल्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या आदेशान्वये मुख्याधिकारी नगरपरिषद,

तुळजापूर यांच्याविरुध्द चौकशी करण्याच्या आदेशाच्या अनुपालनाची सद्यःस्थिती आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अवगत करावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. संचालक नगरपालिका प्रशासन यांनी, आयोगाने दिलेल्या दिनांक ०६-०२-२००७ रोजीच्या आदेशान्वये मुख्याधिकारी नगरपरिषद, तुळजापूर यांच्याविरुध्द चौकशी करण्याच्या आदेशाच्या अनुपालनाची सद्यःस्थिती आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत अवगत करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संपत अंबादास जळके, रा. भवानी रस्ता, घर नंबर ४४४/३, तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मूळ आदेशाच्या प्रतीसह)

३ आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा

इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मूळ आदेशाच्या प्रतीसह)

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६९

निर्णय दिनांक १९-११-२००७

१ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल, : अपिलार्थी
मुख्याध्यापक,
केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे),
तालुका परळी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, बीड

## **विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. विलास काशीनाथराव जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी श्री. शिवाजी शंकर सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळांची संख्या, शाळांची यादी व मुख्याध्यापकांची सेवाजेष्ठता यादी याबाबत खालील प्रमाणे मागितली होती.

६. “ बीड जिल्हा परिषदे अंतर्गत म्हणजेच आपल्या कार्यालया अंतर्गत जिल्ह्यात किती शाळा आहेत व त्या कोठे आहेत त्यांची नांवे व पत्ते द्यावेत.

७. आपल्या खात्याअंतर्गत जिल्ह्यात आज रोजी कार्यरत असलेल्या सर्व मुख्याध्यापकांची सेवाजेष्ठतेनुसार यादी द्यावी. या यादीमध्ये मुख्याध्यापकाचे नांव, त्याची पात्रता, प्रथम नेमणूक दिनांक, प्रवर्ग, सेवेचा कालावधी, इत्यादी सह इतर आवश्यक व उपलब्ध असलेली माहिती द्यावी.

८. केंद्रीय प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक व इतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक यांचे पद शासकीय दृष्टीकोनातून सारखेच आहेत किंवा वरिष्ठ व

कनिष्ठ आहेत याबद्दलची माहिती देऊन त्या नियम, तरतूदी व शासन आदेशाची प्रत द्यावी.

९. मी सध्या गाढे पिंपळगाव येथील आपल्या शाळेत मुख्याध्यापक आहे. सेवा जेष्ठतेप्रमाणे माझे प्रमोशन केव्हा व्हावयास पाहिजे होते व ते केव्हा दिले याबद्दलची माहिती द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-०९-२००६ असा दिनांक लिहिलेले प्रथम अपील दिनांक ३१-०८-२००६ रोजी दाखल केले. सदर अपिल जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्राप्त झाले.

या अपिलाची जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन या अपिलासंदर्भात आपला अंतीम निर्णय दिनांक ०९-१०-२००६ रोजी पारीत केला. जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या या सुनावणीमध्ये अपिलार्थीने त्यांना मुद्दा क्रमांक १ व ४ ची माहिती प्राप्त झाल्याचे नमूद केले व सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक २ व ३ ची सुधारीत माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००६ रोजी देण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचे अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००६ रोजी त्यांनी मागितलेल्या मूळ माहितीपैकी मुद्दा क्रमांक २ व ३ ची सुधारीत माहिती दिली.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयाने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. त्यामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अद्यापपर्यत माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर माहिती देईपर्यत, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याबाबत आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना मुद्दा क्रमांक १, २ व ४ ची माहिती प्राप्त झाली असून त्यांचा आक्षेप जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ३ च्या संदर्भात दिलेल्या माहितीसंदर्भात आहे. त्यांच्या मताप्रमाणे ही माहिती चूक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस, दिनांक दिनांक १४-०८-२००६ रोजी व सुधारीत माहिती दिनांक २६-०९-२००६ रोजी त्यांनी पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे अशीही माहिती दिली की, केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक व इतर जिल्हा परिषदेचे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक, ही दोन्ही पदे समान दर्जाची असून आपआपसात बदलीपात्र आहेत, त्यामुळे या पदामध्ये वरिष्ठ व कनिष्ठ असा भेद करता येत नाही.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः माहिती पुरविली ती, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या प्रथम सुनावणीच्या वेळी परत सुधारीत करुन दिली. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहिती

मध्ये ज्या विसंगती त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या त्यांचा ताळमेळ घालून तयार केलेली सुधारीत माहिती त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील अपील सुनावणीच्या दिवशीच अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक ३ बाबत जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगास वरील प्रमाणे माहिती दिलेली आहे. ज्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक व केंद्रीय प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक हे सर्व एकाच संवर्गातील असून त्यांची पातळी समान असल्याचे त्यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले आहे. यासंवर्गामध्ये कोणतेही पद दुस-या पदापेक्षा वरिष्ठ अथवा कनिष्ठ नाही हेही त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये सांगितले. याचबरोबर या पदांच्या सेवा शर्तीच्या प्रती देखील अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००६ रोजी पुरविल्या, हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सुरुवातीला म्हणजे दिनांक १४-०८-२००६ रोजी त्यांनी अपिलार्थीला माहिती तपासून न देता पुरविली होती, त्यामध्ये अपिलार्थीस विसंगती दिसून आली व तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्या विसंगतीचे निराकरण दिनांक २६-०९-२००६ रोजी केले. अपिलार्थीस प्रथमतः माहिती देतांना ती काळजीपूर्वक न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दाखल होणा-या माहिती अर्जावर माहिती देतांना सतर्क राहावे अशीही सूचना त्यांना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, येथून पुढे भविष्यात त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये दाखल होणा-या माहिती अर्जावर माहिती देतांना विशेष सतर्क राहावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे), तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९८

निर्णय दिनांक १९-११-२००७

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, : अपिलार्थी
गौरीकुंज, श्री. बालाजी ट्रेडर्स आडत दुकान
मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई,
जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद,
जिल्हा उस्मानाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वसंत संपतराव मुंडे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. व्ही. एल. कांबळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्रभारी अधीक्षक अभियंता, सार्वजनिक

बांधकाम मंडळ श्री. संतोष शेलार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे केज विधानसभा मतदार संघातील २००१ ते २००५ या कालावधीतील रोजगार हमी योजने अंतर्गत अंबाजोगाई, धारुर व केज या तालुक्यातील कामांची माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

१०. " केज विधानसभा मतदार संघातील अंबाजोगाई, धारुर, केज येथील रोजगार हमी योजना मधील कामाची यादी, अंदाजपत्रके, पुर्वी झालेली कामे, अपूर्ण कामे, मंजूर असलेली कामे, अंदाजपत्रकासहीत माहिती देणे.

११. मोजमाप पुस्तिका,

१२. मजुरांचे हजेरीपत्रक संपूर्ण माहिती सोबत (नांव, गाव, कामाचे दिवस हजेरीसहीत त्याचा पगार इ.)

१३. मातीकामाचे दिवस बुकाप्रमाणे नोंदणी केलेल्या मोजमाप पुस्तिका."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करतांना मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीपैकी काही भागांची माहिती विचारली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०४-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि, या सुनावणीस जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही उपस्थित राहिले नाहीत व अपिलार्थीने आपले म्हणणे फॅक्सव्दारे जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविले होते. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०२ मे २००६ रोजी आपला निर्णय पारीत केला. या निर्णयामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे सूचित केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन देखील अपिलार्थीस, आवश्यक ती माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले. त्यामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना काही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक ०२-०६-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली असून ही माहिती ४० पृष्ठाचे बुकलेट या स्वरुपात आहे. तथापि त्यांना मोजमाप पुस्तिका व मजुरांचे हजेरीपत्रक यांच्या झेरॉक्स प्रती आजही हव्या आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मस्टरची संख्या ६२१३ इतकी असून प्रत्येक मस्टरमध्ये ८ पाने आहेत. असे असतांना एकूण झेरॉक्स काढावयाच्या पृष्ठांची संख्या अंदाजे ५०,००० च्या घरात जाते. सदर मस्टरच्या प्रती झेरॉक्स काढून देण्याइतपत त्यांच्याकडे निधी उपलब्ध नाही.म्हणून इतके दिवस त्यांनी ही माहिती अपिलार्थी स पुरविली नाही. याचबरोबर, त्यांना ही माहिती उपविभागीय पातळीवरुन गोळा करावी लागत असल्याने ती संकलीत करण्याकरिता त्यांना विलंब लागला. त्यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०३-२००६ रोजी ही माहिती देण्यापोटीचे शुल्क रुपये ८०,००० कळविले होते.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आज दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद लक्षात घेता असे दिसून येते की, यामध्ये अपिलार्थीच्या दिनांक २४-११-२००५ रोजीच्या अर्जासंदर्भातील निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी उशिरात उशीरा दिनांक २३-१२-२००५ रोजी अगर तत्पूर्वी देणे भाग होते. तथापि, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जास प्रतिसादच मूळी दिनांक २२-०३-२००६ रोजी म्हणजे विहित कालावधीपेक्षा अंदाजे ३ महिने उशिराने दिला. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना, त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या आदेशान्वये, अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले असूनही केवळ झेराक्स करण्याकरिता आवश्यक ते अनुदान उपलब्ध नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती दिली नसल्याचे दिसून येते. प्रत्येक भारतीय नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणाकडून माहिती मागण्याचा हक्क माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ नुसार प्राप्त झाला आहे. माहिती मागविणे हा नागरिकांचा हक्क असून, माहिती पुरविणे हे जन माहिती अधिकारी यांचे आद्य कर्तव्य आहे हे पाहता व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना दिलेले आदेश पाहता, असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी अद्यापही जी माहिती अपिलार्थीस देणे बाकी आहे, अशी सर्व माहिती जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीस विहित मुदत टळून गेल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी ८०,००० रुपये इतके शुल्क भरण्याचे सूचित केले आहे ही बाब येथे विचारात घ्यावी लागेल. अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी टळून गेल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य देणे भाग आहे.

जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी आपले कर्तव्य चोखपणे बजावले नसल्याचे सिध्द होत आहे.  जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती आजतागायत दिली नाही ही त्यांची कृती त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करते.  त्यांनी दाखविलेल्या अशा प्रकारच्या कर्तव्यपराणतेचा अभाव व बेपर्वाई बद्दल सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत पाठवावा असेही त्यांना पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, यापुर्वी दिलेली माहिती वगळून उर्वरीत सर्व माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेला त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी त्यांचेवर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंडे, गौरीकुंज, श्री. बालाजी ट्रेडर्स आडत दुकान मार्केट, परळी वैजनाथ, तालुका परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६५४

दिनांक २०-११-२००७

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी

कार्यालय, कंधार, तालुका कंधार,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार,

तालुका कंधार, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, कंधार, जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २०-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जी. एस. रायबोळे हे गैरहजर आहेत तर, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. विश्वंभर निळकंठराव मंगनाळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. अंकुश दशरथ बरडे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ तालुका कृषि कार्यालय तालुका कंधार जिल्हा नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती देणे – १) कामाचे नांव, २) गावांचे नांव, ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत, ६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे, अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु. भ. च कामे, सी. ना. बा. कामे, मा. ना. बा. कामे, डा. बा. कामे इत्यादी कामाची माहिती देणे.

तालुका कृषि कार्यालय, तालुका कंधार जिल्हा नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, कामाचे मोजमाप (एम. बी.) पुस्तिकांची छायांकीत प्रत व तसेच वरील कामाचे कॅश बुकाची छायांकीत प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्राची माहिती देणे. ”

सदर माहिती अपिलार्थीने शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल झाला नाही असे त्यांचे म्हणणे, जन माहिती अधिकारी यांनी शपथपत्राव्दारे दाखल केले आहे, तद्वतच अपिलार्थीने माहिती मागणीसाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज केला असल्याचे त्यांना प्रथम, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर, समजले असे त्यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.  या अपिलामध्ये त्यांनी शासकीय माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित होऊन जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्याचे म्हटले आहे.  परंतु दिनांक ३१-

०८-२००६ रोजीपर्यत, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मूळ अर्जासंदर्भात, त्यांच्या कडे तो प्राप्त झाले नसल्याने कोणताही निर्णय दिला नव्हता. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील करण्याचे कारण म्हणून जे कारण दर्शविले आहे ते वस्तुस्थितीशी विसंगत दिसत आहे.

अपिलार्थीच्या सदर अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-१०-२००७ रोजी सुनावणी ठेवली होती, परंतु सदर सुनावणीस अपिलार्थी हजर राहिले नाहीत व सुनावणीची तारीख बदलून देण्याबाबत जन अपिलीय अधिकारी यांना अर्ज दिला. अपिलार्थीची ही विनंती मान्य करुन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक ०३-११-२००७ रोजी सुनावणीसाठी बोलाविले होते, तथापि सदर सुनावणीस देखील अपिलार्थी हजर राहिले नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांनी लावलेल्या सुनावणीच्या तारखेस अपिलार्थीने हजर न राहता, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांनी दाखल केलेल्या अपील अर्जावर ९० दिवसात कोणताही निर्णय न दिल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे शास्ती लावण्याचे आदेश निर्गमीत करण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडून ४३७५० रुपये दंड वसूल करुन, सदर रक्कम शासनाकडे जमा करावी व जमा केलेल्या पैशाच्या पावतीची छायांकीत प्रत त्यांना पाठवावी अशीही त्यांनी पुढे विनंती केली आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असून त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलातील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजण्यात यावा असे

व्दितीय अपील अर्जात म्हटले असल्याने उपरोक्त वर्णन केल्याप्रमाणे त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक १९-०६-२००६ रोजीचा प्रथम अर्ज यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांना अपिलार्थीने काही माहिती करिता त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी अर्ज केला आहे असे समजले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्जाबरोबर सादर केलेल्या त्यांच्या दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या प्रतीवरुन ही प्रतच त्यांच्याकडे माहितीसाठी केलेला अर्ज समजून त्यांनी त्यांच्या कडील दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता लागणारे आवश्यक शुल्क रुपये ४०२६२ /- इतक्या रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयामध्ये करण्याबाबत अपिलार्थीस सूचित केले. त्यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याबाबत त्यांच्या कडील आवक जावक रजिस्टरच्या संबंधीत पृष्ठांची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. यावरुन त्यांनी अपिलार्थीस सदर शुल्क भरण्याबाबत विनंती केल्याचे दिसून येते. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असेही स्पष्ट केले की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०६-१२-२००६ रोजी विनामूल्य दिली असून त्यामध्ये फक्त अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मस्टरच्या झेरॉक्स प्रती या मुद्दयावरील माहितीचा समावेश नाही. अपिलार्थीने मागितलेल्या मस्टरची संख्या एकूण ६६२ असून सदर मस्टरच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना ४०२६२ रुपये इतका खर्च येणार आहे. सदर खर्च करण्याकरिता त्यांच्या कडे अनुदान उपलब्ध नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे करण्यात आलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात

जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला होता किंवा कसे हे कळण्यास, अपिलार्थीच्या गैरहजेरीमुळे, काहीही मार्ग नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, शपथपत्रावर अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे कबूल केल्याने, अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे दाखल झाला नाही हे अनुमान आयोग काढत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अपील दाखल केल्यानंतर त्याच दिनांक ३१-०८-२००६ रोजी अपिलार्थीने केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना प्रथम कल्पना आल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपिल हाच माहितीसाठीचा अर्ज समजून त्यांनी दिनांक २०-०९-२००६ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणा-या खर्चाची कल्पना दिली. जन माहिती अधिकारी यांच्या या कार्यवाहीमुळे जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस सदर प्रतिसाद विहित वेळेत दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर विहित मुदतीत दिलेला प्रतिसाद, अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक त्या शुल्काचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरणा न करणे व जन अपिलीय अधिकारी यांनी दोनदा सुनावणीस बोलावूनही त्यास अपिलार्थीचे गैरहजर राहणे व त्याच बरोबर आजच्या आयोगाच्या सुनावणीस देखील त्यांचे गैरहजर राहणे या बाबी पाहता, अपिलार्थीस ही माहिती मिळविण्यामध्ये फारसे स्वारस्य असल्याचे दिसून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे भराव्या लागणा-या शुल्काबाबत जन माहिती अधिकारी यांचे दिनांक २०-०९-२००६ चे पत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला नाही ही बाब देखिल वरील विधानास पुष्टी देत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची वाट न पाहता अपिलार्थीने आयोगाकडे सरळ व्दितीय अपील सादर केले आहे. या सर्व बाबींचा परामर्श घेता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कडून विनामूल्य माहिती हवी आहे व ही माहिती

प्राप्त करुन घेण्याबाबत ते फारसे गंभीर नसल्याचे, त्यांच्या प्रथम अपिलीय अधिकारी व आयोगापुढील सुनावणीमधील गैरहजेरीमुळे सिध्द झाले आहे. याही उपर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी दिनांक ०६-१२-२००६ रोजी काही माहिती विनामूल्य दिल्याचे दिसून येते. हा घटनाक्रम व सर्व वस्तुस्थिती पाहता, अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळणे योग्य राहील, या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २०-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६३

दिनांक २१-११-२००७

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी

कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, मुखेड,

तालुका मुखेड,

जिल्हा नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुखेड, जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, मुखेड, जिल्हा नांदेड |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जी. एस. रायबोळे हे गैरहजर आहेत तर, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. गोरे आनंदा गोविंदराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. सुरकूठवार एच. बी. (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ तालुका कृषि कार्यालय तालुका मुखेड, जिल्हा नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती देणे – १) कामाचे नांव, २) गावांचे नांव, ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत, ६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे, अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु.

भ. च कामे, सी. ना. बा. कामे, मा. ना. बा. कामे, डा. बा. कामे इत्यादी कामाची माहिती देणे.

तालुका कृषि कार्यालय, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, कामाचे मोजमाप (एम. बी.) पुस्तिकांची छायांकीत प्रत व तसेच वरील कामाचे कॅश बुकाची छायांकीत प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्राची माहिती देणे. ”

सदर माहिती अपिलार्थीने शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या सदर माहितीसाठीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीचा सदर अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देऊ शकले नाहीत, असे त्यांनी आज आयोगासमोर सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले आहे की, अपिलार्थीने केलेला अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक १९-०९-२००६ रोजी प्राप्त झाला असून, या अपील अर्जासोबत अपिलार्थीने जन

माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेला माहितीसाठीचा अर्ज जोडला नाही.  सदर माहितीचा अर्ज कुरिअर मार्फत जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे अपिलार्थीचे म्हणणे त्यांना ग्राह्य धरता येणार नाही कारण, त्या पावतीवर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कोणाचीही सही नाही.  यास्तव, त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केल्याचे या दिनांक २७-०९-२००६ रोजीच्या पत्रान्व्ये अपिलार्थीस कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  आयोगाकडे केलेल्या या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती दिली नाही, व जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदतीत त्यांच्या अपिलावर निर्णय दिला नाही, असे म्हटले आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे शास्ती लावण्याची आयोगास विनंती करुन, पुढे या शास्तीची रक्कम शासकीय कोषागारात भरुन संबंधीत चलनाची प्रत अपिलार्थीस पाठविण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे.  त्यामुळे, त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जी विधाने केली आहेत तोच त्यांचा युक्तिवाद आहेत असे समजून पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा मूळ माहितीसाठीचा अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नसल्याने, त्यांना ही माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत देता आली नाही.  अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक ०४-१२-२००६ रोजीचे व्दितीय अपील (जे आयोगास दिनांक १५-०१-

२००७ रोजी प्राप्त झाले) जन माहिती अधिकारी यांना दाखविल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीस सदर अपिल हाच प्रथम अर्ज समजून ही माहिती दिनांक ०८-१२-२००६ रोजी पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नाही, हे त्यांनी आयोगासमोर आज एका शपथपत्राव्दारे कबूल केले आहे. त्यांना तो खरोखरच त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला किंवा कसे, हे आज अपिलार्थी गैरहजर असल्यामुळे कळण्यास मार्ग नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांनी आयोगास शपथपत्र सादर केल्याने, त्यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अर्ज प्राप्त झाला नाही, हे त्यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यास हरकत नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्या कडे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या माहितीच्या अर्जाची प्रत देखील जोडली नाही. याचबरोबर, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील जन माहिती अधिका-यास दाखविल्याबरोबर, हे अपिल हाच प्रथम अर्ज समजून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००६ रोजी संपूर्ण माहिती दिली आहे. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००६ रोजी संपूर्ण माहिती दिल्याप्रीत्यर्थ आयोगास एक शपथपत्र सादर केले आहे. अपिलार्थीचा प्रथम अर्ज मुळात, जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याचे वरील प्रमाणे सिध्द झाले आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांना विचारलेली माहिती, जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाची पध्दत पाहता, अपिलार्थीने हे सर्व मुद्दे आणि अपील अर्ज छापून घेतले असून, फक्त काही जागा रिकाम्या ठेवल्या आहेत. या रिकाम्या जागेमध्ये संबंधीत माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नाव टाकून अपील करणे, अपील सुनावणीस गैरहजर राहणे, आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहणे, अशा प्रकारची अपिलार्थीची कृती, आयोगास, त्यांनी केलेल्या इतर प्रकरणा

मध्येही दिसून येते.  सदर माहितीव्दारे, अपिलार्थी कोणते जनहित साध्य करणार आहेत, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक असावे असे आयोगाचे मत आहे.  अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या कृतीने,  माहिती अधिकार अधिनियमाचे पावित्र्य भंग झाले आहे असे आयोगास वाटते.

अपिलार्थीस आता, जन माहिती अधिकारी यांच्याकडून वेळेत व संपूर्ण माहिती मिळाल्याचे वर उल्लेखिल्याप्रमाणे सिध्द झाले असल्यामुळे, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील तथ्यहीन ठरत आहे व परिणामी ते फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१.    अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद                                  ( वि. बा. बोरगे )

दिनांक    २१-११-२००७                    राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१    श्री. जी. एस. रायबोळे, मा. सरपंच मौजे दाभाडी, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२    जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६४

निर्णय दिनांक २१-११-२००७

श्री. जी. एस. रायबोळे, : अपिलार्थी

मा. तालुका अध्यक्ष भारिप बहुजन महासंघ,

किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, तालुका कृषि

अधिकारी कार्यालय, मुदखेड, तालुका

मुदखेड,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड,

तालुका मुदखेड,

जिल्हा नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जी. एस. रायबोळे हे गैरहजर आहेत तर, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. तावडे दत्तात्रय किशनराव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. लाभशेटवार अवधून शंकरराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने, त्यांच्याकडील दिनांक १९-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात सन २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ तालुका कृषि कार्यालय तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड मध्ये तुम्ही केलेल्या व चालू असलेल्या कामाची माहिती देणे – १) कामाचे नांव, २) गावांचे नांव, ३) शेत सर्व्हे नंबर, ४) कामाचा प्रकार, ५) कामाची अंदाजित किंमत, ६) वरील कामावर पैशाचा व खर्च व धान्य कुपन्स खर्चाची माहिती देणे तसेच मातीबंधारे, अर्दनस्ट्रक्चर कामे, शेततळी कामे, पु.

भ. च कामे, सी. ना. बा. कामे, मा. ना. बा. कामे, डा. बा. कामे इत्यादी कामाची माहिती देणे.

तालुका कृषि कार्यालय, तालुका मुदखेड, जिल्हा नांदेड मार्फत वरील प्रकारच्या केलेल्या कामाचे मजुराचे हजेरी मस्टरची छायांकीत प्रत, कामाचे मोजमाप (एम. बी.) पुस्तिकांची छायांकीत प्रत व तसेच वरील कामाचे कॅश बुकाची छायांकीत प्रत इत्यादी प्रकारच्या कामाची वरील माहिती व वरील कामावरील कागदपत्राची माहिती देणे. ”

सदर माहिती अपिलार्थीने शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २९-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीने मागितलेली माहिती मंडळ कृषि अधिकारी, मुदखेड जिल्हा नांदेड यांच्याशी संबंधीत असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत मंडळ कृषि अधिकारी मुदखेड यांना दिनांक ०३-०७-२००६ रोजी पाठवून अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याची सूचना दिली होती.

जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे सहाय्यक यांच्याकडून विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवलेली आहे.

सदर, अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०८-०९-२००६ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीकडून अपील अर्ज प्राप्त होऊनही, जन अपिलीय अधिकारी यांनी, या अपील अर्जावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांनी देखील, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर

कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे मान्य केले.  संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी न घेऊन, एक प्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या विषयी, त्यांच्या मनात असलेला अनादर त्यांच्या कृतीतून स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे.  अपिलार्थी यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थी व व संबंधीत जन माहिती अधिकारी या दोघांनाही एकत्र बोलावून घेऊन त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन, त्यावर आपला निर्णय पारीत करणे, हे अधिनियमाव्दारे अभिप्रेत आहे, तथापि, त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करुन, याव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केल्याचे आयोगास दिसून येते.  जन अपिलीय अधिकारी यांच्या, या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद सचिव (कृषि) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना या निमित्ताने सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नाही, व जन अपिलीय अधिकारी यांनी, या प्रकरणी अपिलाची सुनावणी न घेऊन जन माहिती अधिकारी यांना वाचविण्याचा प्रयत्न केला असे म्हटले आहे.  राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी पुढे, जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे रुपये ४७७५० इतकी शास्ती लावून व ती वसूल करुन शासनाकडे जमा करण्याची व सदर शास्ती, शासनाकडे जमा केलेल्या पावतीची प्रत, त्यांना पाठविण्याची विनंती केली आहे.

आज रोजी, युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपीलामध्ये त्यांचे जे लेखी म्हणणे मांडले आहे, तोच त्यांचा युक्तिवाद समजून त्या युक्तिवादाच्या आधारे पुढील सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक २९-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर, सदर माहिती मंडळ कृषि अधिकारी मुदखेड यांच्याशी संबंधीत असल्याने, त्यांनी तो अर्ज दिनांक ०३-०७-२००६ रोजी मंडळ कृषि अधिकारी मुदखेड यांच्याकडे पाठवून, अपिलार्थीस द्यावयास लागणारी माहिती त्यांच्या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना, मंडळ कृषि अधिकारी यांना दिल्या. तदनंतर, त्यांनी त्यांच्या कार्यालयातील पत्र दिनांक २०-०७-२००६ व ०८-०९-२००६ व्दारे, संबंधीत मंडळ कृषि अधिका-यांस स्मरणपत्रे देखील दिली. तदनंतर, मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्यानंतर, ती अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली. अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०६-१०-२००६ रोजीच्या माहितीमध्ये मस्टरच्या झेरॉक्स प्रती त्यांनी दिल्या नव्हत्या, त्या त्यांनी, अपिलार्थीस अंतीमतः दिनांक ०८-१२-२००६ रोजी प्रत्यक्ष पुरविल्या आहेत. अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२००६ ची माहिती पोस्टाने पाठविल्याप्रीत्यर्थ त्यांनी कार्यालयातील जावक नोंदवहीची सत्यप्रत आयोगास सादर केली आहे व अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००६ रोजी व्यक्तिशः माहिती पोहोचविल्याबद्दलची अपिलार्थीची पोहोच पावती, त्यांच्याकडील त्यांनी आयोगास सादर केली आहे.

वरील घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, तसेच अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेला युक्तिवाद लक्षात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीचा प्रथमतः त्यांच्याकडे अर्ज दिनांक १९-०६-२००६ चा, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक २९-०६-२००६ रोजी प्राप्त झाला. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी,

त्यांना उशिरात उशीरा दिनांक २८-०७-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-१०-२००६ रोजी म्हणजेच, विहित मुदतीपेक्षा ६९ दिवस इतक्या विलंबाने अर्धवट प्रतिसाद दिला आहे व अर्धवट प्रतिसाद दिल्यानंतर तदनंतर ६२ दिवसांनी व्दितीय प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरवून त्यांनी, त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-१२-२००६ रोजी त्यांच्याकडील कामाच्या मस्टरच्या झेरॉक्स प्रती पुरविल्या आहेत. वास्तविकतः जन माहिती अधिकारी व संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांचे मुख्यालय एकाच ठिकाणी असून, अपिलार्थीस मस्टरच्या झेरॉक्स प्रती देण्याकरिता त्यांनी चार महिन्याहूनही जास्त कालावधी लावावा, हे एक आश्चर्य म्हणावे लागेल. या प्रकरणी, दोन्ही अधिका-यांची मुख्यालये एकाच ठिकाणी असल्याने, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती विहित मुदतीत देणे कोणत्याही परिस्थितीत अशक्य नव्हते, किबंहुना ही माहिती न देण्यामध्येच त्यांना जास्त रस असावा असे या प्रकरणी म्हटल्यास वावगे होणार नाही. कृषि विभागातील कामासंदर्भात राज्य माहिती आयोगाकडे ब-याच तक्रारी प्राप्त होत असतात. त्यातील बहुतांशी तक्रारी, कृषि विभागात हजेरीपत्रकावर जी कामे केली जातात त्या संदर्भातील असतात.

अपिलार्थीस विलंबाने माहिती देऊन, जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जे इतर सहाय्यक / कर्मचारी जबाबदार आहेत, त्या सर्वानी मिळून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन त्याव्दारे आपल्या कार्यशैली मधील कर्तव्य परायणतेचा अभाव या प्रकरणात स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर सहाय्यक कर्मचारी यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात यावे, अशी माहितीचा अधिकार अधिनियम २००५

मधील कलम ५ (५) मध्ये तरतूद आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी व त्यांना ज्या सहाय्यकाकडून अपिलार्थीस देण्यासाठी माहिती गोळा करावयाची होती अशा सर्वांवर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेला त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल आयुक्त (कृषि) यांनी, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करुन, आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर १५ दिवसाच्या आत सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता पूर्णतः माहिती मिळाली असल्याने, अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि), पुणे यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सहकारी / कर्मचारी या सर्वांवर, त्यांनी दर्शविलेला त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत, करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर १५ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मा. तालुका अध्यक्ष भारिप बहुजन महासंघ, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, मुदखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६७०

निर्णय दिनांक २१-११-२००७

१ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल, : अपिलार्थी

मुख्याध्यापक,

केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे),

तालुका परळी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

जिल्हा परिषद, बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

जिल्हा परिषद, बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २१-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) श्री. विलास काशिनाथराव जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद श्री. शिवाजी शंकर सुर्यवंशी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या स्वतःच्या तसेच केज व परळी तालुक्यातील शाळांच्या मुख्याध्यापकांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

१४. " मी केंद्रिय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे) तालुका परळी वै. जिल्हा बीड येथे मुख्याध्यापक म्हणून सेवेत आहे. माझ्या खालील तारखांना बदल्या करण्यात आलेल्या आहेत.

अ) आदेश क्र. प्रा. ९ अ / मु. अ. प. / ०५, दि. २९-११-२००५
ब) आदेश क्र. प्रा. ९ अ / मु. अ. प. अंब/१०३२८/०६, दि. ०३-०२-२००६

या बदल्या कोणत्या कारणास्तव करण्यात आल्या, इतक्या लवकर-लवकर बदल्या करण्याची का आवश्यकता पडली, याबद्दलची कागदोपत्री माहिती देण्यात यावी व या बदल्या करण्याची जी कारणे घडली, त्या कारणांची कागदोपत्री माहिती द्यावी.

१५. केज व परळी तालुक्यात एकाच ठिकाणी अनेक वर्षे मुख्याध्यापक काम करतात त्यामुळे या दोन तालुक्यातील कार्यरत असलेल्या मुख्याध्यापकांचे व ते ज्या तारखे पासून त्या शाळेत कार्यरत आहेत त्या तारखांसह यादी द्यावी.

१६. दिनांक ०५ मार्च २००५ रोजी, गुणवत्ता विकास चाचणी परिक्षा झाली. या परिक्षेनंतर, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांनी माझी एक वेतनवाढ कमी केली. या परिक्षेनंतर कोण-कोणत्या मुख्याध्यापकाची वेतनवाढ बंद करण्याचा आदेश विभागीय आयुक्त कार्यालयाने दिला होता, त्याची केज व परळी या दोन तालुक्यातील यादी द्यावी.

१७. या नंतर कोण-कोणत्या मुख्याध्यापकांची रोखलेली / कमी केलेली वेतनवाढ पुन्हा देण्यात आली, त्यांची नावे व वेतनवाढ पुन्हा बहाल केल्याची तारीख, इत्यादी

माहिती द्यावी, त्याचबरोबर या वेतनवाढी कोणत्या आदेशाने पुन्हा चालू केल्या त्या आदेशाची प्रत द्यावी.

१८. माझी एक वेतनवाढ बंद झालेली होती. इतरांना ही वेतनवाढ पुन्हा चालू केल्या नंतर माझी वेतनवाढ अद्यापही दिलेली नाही. त्यामुळे कमी केलेली वेतनवाढ पुन्हा बहाल न करण्यासाठी माझ्यासाठी एक व इतरांसाठी दुसरा नियम आपण लावलेला आहे, तो कोणत्या कारणामुळे लावला, याची माहिती देऊन माझी वेतनवाढ पुन्हा चालू करण्यास कोणता अडसर आहे व इतरांच्या वेतनवाढी पुन्हा चालू करतांना तो का आला नाही, याबद्दलची कागदोपत्री माहिती द्यावी.

१९. दिनांक ०३ मार्च २००६ ते ०५ मे २००६ या काळातील माझा पगार अद्याप पर्यत का दिलेला नाही व तो देण्यासाठी जी कागदपत्रे अडथळा आणतात, त्या कागदपत्रांच्या प्रती व माहिती द्यावी.

२०. माझ्या भविष्य निर्वाह निधीच्या आजपर्यतच्या सर्व नोंदी असलेली पासबुकची प्रत द्यावी."

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जामध्ये, एकूण ७ मुद्दयावर माहिती मागविली होती. त्यापैकी, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या या पत्रामध्ये एकूण ४ मुद्दयावर (मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ६) अपिलार्थीस माहिती दिली. मुद्दा क्रमांक १, २ व ७ बाबत त्यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार,

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ३१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०२-०९-२००६ रोजी प्राप्त झाला.

या अपील अर्जामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपुरी असल्याचे, व त्यांनी केलेल्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, २ व ७ ची माहिती त्यांना मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना विहित मुदतीत परिपूर्ण माहिती दिली नसल्याने, व दिलेली माहिती अपुरी असल्यामुळे, जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची व प्रशासकीय कारवाई करण्याची विनंती त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केली आहे.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी, दिनांक २६-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन, आपले आदेश त्याच दिवशी म्हणजे दिनांक २६-०९-२००६ रोजी पारीत केले.

या अपील निर्णयामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांनी, असे म्हटले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २ व ७ ची माहिती अनुक्रमे दिनांक २६-०९-२००६ व २७-०९-२००६ रोजी, अपिलार्थीस देण्याचे मान्य केल्याने, अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. ही माहिती अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी, दिनांक २९-०९-२००६ रोजी दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिका-याने जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही, त्यांना माहिती दिली

नसल्याने, त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) प्रमाणे प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याबाबत, तसेच कलम २० (२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, दिनांक १४-०८-२००६ रोजी व दिनांक २६-०९-२००६ रोजी माहिती प्राप्त झाली असून, त्यांची थकीत वेतनवाढ मात्र त्यांना अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांच्याकडून मंजूर झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००६ व दिनांक २६-०९-२००६ रोजी माहिती दिली आहे. अपिलार्थीच्या थकीत वेतनवाढीसंदर्भात त्यांनी आयोगासमोर असे स्पष्ट केले की, शिक्षकांच्या थकीत वेतनवाढी देण्यासंदर्भातील निर्णय, त्यांच्याकडे गट शिक्षणाधिकारी यांच्या कडून संबंधीत शिक्षकाच्या कार्यक्षमतेसंबंधात प्राप्त झालेल्या अहवालानुसार तपासणी करुन घेण्यात येतो. अपिलार्थी यांच्या या प्रकरणी, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक यांनी गट शिक्षणाधिकारी यांना अपिलार्थीची वेतनवाढ पूर्ववत देण्यासंदर्भात अहवाला दिला. तथापि, गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून त्यांना या संदर्भातील अहवाल अद्याप येणे बाकी आहे. गट शिक्षणाधिकारी यांच्याकडून, अपिलार्थी यांच्या थकीत वेतनवाढीसंदर्भात त्यांना कोणताही अहवाल प्राप्त न झाल्यामुळे, त्यांना अपिलार्थीच्या थकीत वेतनवाढी पूर्ववत चालू करण्याबाबत निर्णय घेणे शक्य झाले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, व आज दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एकूण ७ मुद्दयावर माहिती मागितली असतांना त्यांना प्रथमतः अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये फक्त ३, ४, ५ व ६ या मुद्दयांचीच माहिती

देण्यात आली. मुद्दा क्रमांक १, २ व ७ संदर्भातील माहिती अपिलार्थीस दिनांक २६-०९-२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत देण्यात आली. सर्वसाधारण परिस्थितीत, अपिलार्थीने दिनांक १७-०७-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर, अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ रोजी अगर तत्पूर्वी सामान्यतः माहिती मिळणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे आवश्यक होते. तथापि, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अर्धवट माहिती पुरवून, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर मुद्दा क्रमांक १, २, व ७ च्या संदर्भात माहिती देण्याकरिता त्यांनी विहित कालावधीपेक्षा ४० दिवसांचा विलंब लावल्याचेही यावरुन सिध्द होत आहे. या विलंबाचे समर्थन करतांना, जन अपिलीय अधिकारी यांचे सहाय्यक श्री. थापडे यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील वेगवेगळ्या कार्यासनाशी संबंधीत असून, संबंधीत कार्यासनाकडे अपिलार्थीचा अर्ज प्राप्त न झाल्याने, त्यांना या अर्जावर विहित मुदतीमध्ये माहिती देणे शक्य झाले नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीचा हा युक्तिवाद आयोग मान्य करत नाही, कारण अपिलार्थीस संपूर्ण माहिती देणे, हे जन माहिती अधिकारी यांचे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार प्रथम कर्तव्य आहे. नंतर कार्यालयातील, कोणत्या कार्यासनाने कोणती माहिती द्यावयाची व ती किती दिवसात द्यावयाची हे ठरविणे, हा जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या अंतर्गत प्रशासनाचा भाग आहे असे आयोगाचे मत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे त्यांचे इतर जे सहाय्यक / कर्मचारी आहेत त्यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे. यामुळे या प्रकरणी, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना सहाय्य

करणारे त्यांचे जे इतर सहाय्यक / कर्मचारी आहेत, हे देखील अपिलार्थीस विलंबाने माहिती पुरविण्यासाठी जबाबदार आहेत हे सिध्द होत आहे.

हे पाहता असे आदेशीत करण्यात येते की :

अपिलार्थीस, या प्रकरणी त्यांनी विचारलेल्या माहितीपैकी संपूर्ण माहिती विहित मुदतीत न देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहाय्यकांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत पाठवावा. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (b) च्या तरतुदीस अनुसरुन असेही आदेश देण्यात येत आहेत की, अपिलार्थी यांच्या वेतनवाढीच्या संदर्भातील प्रकरणी त्यांनी, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १ महिन्याच्या आत निर्णय घेऊन आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व त्यांचे इतर सहाय्यक / कर्मचारी जे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार आहेत त्यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई

करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत होताच २ महिन्याच्या आत पाठवावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थी यांच्या वेतनवाढीच्या संदर्भातील प्रकरणामध्ये हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १ महिन्याच्या आत निर्णय घेऊन आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २१-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख रईसोद्दीन शेख ईस्माईल, मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा, पिंपळगाव (गाढे), तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६७५

निर्णय दिनांक २२-११-२००७

श्री. विनायकराव अंबादासराव मगर, : अपिलार्थी

राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड, कळंब,

तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब,

जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा. प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विनायकराव अंबादासराव मगर, यांच्या वतीने त्यांचे वकील श्री. सुधीर गोविंदराव भालेराव व जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद श्री. प्रमोद हरिभाऊ सवाखंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने, त्यांच्याकडील दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, १९९० ते ०८-०८-२००६ पर्यतच्या कालावधी-तील पुर्नवसीत गावासंदर्भात खालील प्रमाणे एकूण ४ मुद्दयावर माहिती मागितली होती.

१. १९९० साली जिल्हा परिषदेने प्राथमिक शाळा न. प. कळंबकडे हस्तांतरीत केल्या, तेव्हा आपण कोणत्या आदेशानुसार पुनर्वसन (सा) मधील जि. प. ची शाळेची इमारत ताब्यात घेतली, त्याची प्रत देण्यात यावी.

२. पावसाळ्यामध्ये अतिक्रमण काढू नयेत असे आदेश असतांना, मारुती मंदिर पुर्नवसन (सा) येथील परिसरातील अतिक्रमण काढतांना कोणत्या शासन निर्णयाचा अंमल केला, त्याची प्रत द्यावी.

३. अतिक्रमण काढतांना अतिक्रमण धारकास आधी नोटीस देणे गरजेचे असते, पण आपण नोटीस न देता अतिक्रमण काढले, त्यासाठी ज्या आदेशाचा अंमल केला, त्याची प्रत द्यावी.

४. मारुती मंदिर परिसरातील अतिक्रमण काढतांना, तेथून ४० फुटावर असलेल्या समाज मंदिर व चावडी मधील व परिसरातील अतिक्रमण न काढण्यासाठी कोणत्या शासन निर्णयाचा आधार घेतला, त्याची प्रत द्यावी."

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा सदर अर्ज, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १४-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन या पत्रामध्ये, त्यांनी अपिलार्थीस मुद्दा क्रमांक १, २ व ३ या संदर्भात खुलासा करुन, आवश्यक त्या आदेशाच्या छायांकीत प्रती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ३० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्यास सूचित केले आहे. सदर शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १२-०९-२००६ रोजी केला. सदर भरणा दिनांक १२-०९-२००६ रोजी केल्याचा निश्चित पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १४-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी अंतीमतः दिनांक ०७-११-२००७ रोजी आदेश पारीत केले, व अपिलार्थी यांचे अपील मान्य करुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून, अपिलार्थी यांना माहिती देण्यापोटीचे घेतलेले शुल्क त्यांना परत करण्याचे सूचित केले. तथापि, जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस प्राप्त होण्यापुर्वीच अपिलार्थीने, राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, दिनांक २७-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले. सदर अपील अर्ज राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक १५-०१-२००७ रोजी नोंदवून घेण्यात आला.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी, अपिलार्थी यांच्यातर्फे उपस्थित असलेले त्यांचे वकील श्री. सुधीर भालेराव यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती अपेक्षित होती, ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०९-२००६ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. या अपिलावर, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या बाजुने निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांना मुद्दा क्रमांक १ च्या बाबतीत सर्व कागदपत्राच्या प्रती, मुद्दा क्रमांक २ च्या बाबत सविस्तर माहिती व मुद्दा क्रमांक ४ च्या बाबतीत, मारोती मंदिर परिसरातील अतिक्रमण काढतांना तेथून ४० फूट अंतरावर असलेले समाजमंदिर व चावडी परिसरातील अतिक्रमण न काढण्यासाठी कोणत्या शासन

निर्णयाचा आधार घेतला याचा खुलासा अपिलार्थीस करावा, असे आदेशीत केले होते. तथापि, त्यांना आजतागायत समाधानकारक माहिती, जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्यानंतर देखील, या आदेशास अनुसरुन, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०६-०३-२००७ रोजी जी माहिती पुरविली आहे, ती माहिती प्रथम पुरविलेल्या माहिती प्रमाणेच आहे, असे त्यांनी पुढे प्रतिपादित केले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेल्या दिनांक ११-०१-२००७ च्या आदेशाप्रमाणे, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००७ च्या पत्रान्वये दिली आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता, यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने केलेल्या दिनांक ०८-०८-२००६ रोजीच्या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १८-०८-२००६ रोजी, त्यांच्याकडे माहिती उपलब्ध असल्याबाबत सुचविले व याच पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीस आवश्यक असणा-या प्रती करिता त्यांच्या कार्यालयात रुपये ३० इतक्या रक्कमेचा भरणा करण्यासही सुचविले आहे. तदनंतर अपिलार्थीने दिनांक १२-०९-२००६ रोजी सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर, त्यांनी दिनांक १२-०९-२००६ रोजीच अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ संदर्भातील, कोणत्या आदेशानुसार पुर्नवसीत वसाहतीतील जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत नगरपरिषदेने ताब्यात घेतली, या आदेशासंदर्भात त्यांच्याकडे

असलेल्या जिल्हा परिषदेच्या ठरावाची व जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या दिनांक २८ जून २००५ च्या पत्राची प्रत देखील त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. या पत्रामध्ये, त्यांनी पुर्नवसीत गावातील शाळेची इमारत, नगरपरिषदेकडून काढून घेण्यासंबंधातील निर्णय जिल्हा परिषदेने घेणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. या पत्रात पुढे असेही म्हटले आहे की, “सदरील इमारत नगरपरिषदेकडून काढून घेऊन धरणग्रस्त हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, कळंब यांना भाडे तत्वावर देणेबाबतचा विषय जिल्हा परिषदेच्या विचाराधीन असल्याचे शिक्षणाधिकारी (प्रा.) यांच्या पत्रावरुन निदर्शनास येते. तथापि, सदर इमारत या संस्थेस द्यावयाची किंवा कसे हा निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हा परिषद उस्मानाबाद व आवश्यकता पडल्यास राज्य शासनाच्या आखत्यारीत येत आहे.” जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेली माहिती व पुरविलेली कागदपत्रे व त्याकरिता लागलेला कालावधी पाहता, त्यांनी अपिलार्थीस, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत पुरविली असल्याचे दिसते. याचबरोबर येथे असाही उल्लेख करण्यात येतो की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात असलेल्या सर्व कागदपत्रांच्या नस्त्या पाहण्यासाठी देखील विनंती केली होती. जन माहिती अधिकारी यांच्या या विनंतीस अनुसरुन, दिनांक ०८-११-२००६ रोजी सर्व संचिका अपिलार्थीने बघितल्या असून, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती यांच्या कार्यालयात दिसून आली नसल्याबाबतची नोंद त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात, सर्व कागदपत्रांची पाहणी करुन लेखी स्वरुपात दिली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रामध्ये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली माहिती नाही, हे अपिलार्थीने त्यांनी दिनांक ०८-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कागदपत्राची तपासणी करुन लेखी लिहून दिले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, पूर्ण माहिती दिली नाही अथवा, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली, असे सिध्द होत नाही. अपिलार्थी यांचे म्हणणे

असे आहे की, त्यांना ज्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे त्या स्वरुपात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ती माहिती मिळाली नाही, तर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती त्यांनी अपिलार्थीस पुरविली आहे. त्यांच्या कडील सर्व नस्त्यांची पाहणी करुन, अपिलार्थीस ज्या स्वरुपात माहिती पाहिजे आहे, ती त्यांच्याकडे नसल्याचे अपिलार्थीचे प्रमाणपत्र देखील त्यांनी आयोगास दाखविले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या स्वरुपात माहिती उपलब्ध नसल्याने, ते ती माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. जर त्यांच्याकडे माहिती आवश्यक त्या स्वरुपात उपलब्ध नसेल तर, ते ती उपलब्ध करुन देऊ शकणार नाही हे उघड आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विनायकराव अंबादासराव मगर, राजमाता जिजाऊ चौक, ढोकी रोड,

कळंब, तालुका कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६७६

निर्णय दिनांक २२-११-२००७

१ श्री. क्षिरसागर मोतीराम तुकाराम, : अपिलार्थी

अध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन,

शाखा अर्धापूर (तामसा रोड), तालुका अर्धापूर,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (रोहयो), नांदेड,

जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सहाय्यक वन संरक्षक,

(तेंदूपान), नांदेड, जिल्हा नांदेड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. क्षिरसागर मोतीराम तुकाराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (रोहयो) श्री. महमद सिराजोद्दीन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, (तेंदूपान) श्री. सूर्यकांत विठ्ठलराव मंकावार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २५-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावामध्ये राष्ट्रीय कामासाठी धान्य या योजने खालील कामासंदर्भात, जानेवारी २००६ ते ऑगस्ट २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ तालुका हदगाव मधील चोरंबा, निमगाव, चाभरा व तालुका अर्धापूर मधील चेनापूर येथील वन विभागाच्या मालकीच्या क्षेत्रात राष्ट्रीय कामासाठी धान्य या योजनेखाली किती खर्च झाला, कामाचे स्वरुप, नगदी रक्कम व धान्य किती उचलले, दुकानदाराचे नांव, मजूरांना वाटप केलेले रजिस्टरची स्वाक्ष-यांची झेरॉक्स प्रत.”

अपिलार्थीने सदर माहिती साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, पाठविलेल्या या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी फक्त चेनापूर या गावासंदर्भात कोणते काम व कोणते वर्ष एवढीच माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी, या कामावर झालेला एकूण खर्च, नगदी रक्कम व धान्य स्वरुपात झालेला खर्च, मजुरी वाटपाच्या रजिस्टरची प्रत अशी कोणतीही माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे अर्धवट माहिती प्राप्त झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना प्राप्त झालेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याचे नमूद करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अर्ज अपिलार्थीने सहाय्यक वन संरक्षक, नांदेड तेंदू पाने यांना उद्देशून केला आहे. तथापि सहाय्यक वन संरक्षक यांची त्यावेळी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक न झाल्याने, त्यांनी या प्रकरणी सुनावणी घेतली नाही. याबाबत त्यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये, जन अपिलीय अधिकारी तथा उप वन संरक्षक, नांदेड यांच्याकडे पाठविला व त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस त्यांची याच पत्राव्दारे कल्पना देखील दिलेली आहे. त्यांनी उप वन संरक्षक यांच्याकडे सदर अपील पाठविल्यानंतर दिनांक २४-०१-२००७ रोजी, त्यांची जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक झाली. सदर नेमणूक झाल्यानंतरही त्यांनी, या अपिलाची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगा समोर कबूल केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, दिनांक २६-१०-२००६

रोजी, परत उर्वरीत माहिती पाठविल्याचे कळविल्यावरुन त्यांनी, या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही असे आयोगासमोर सांगितले. दिनांक २६-१०-२००६ रोजीची जन माहिती अधिकारी यांची, सदर कथित माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्याचे, अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-१२-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. त्याचबरोबर त्यांनी आयोगा-कडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये "कामाचे स्वरुप, इस्टीमेट, एम. बी. इत्यादी नवीन व अतिरिक्त माहिती" देखील मागितली आहे. परंतु, **ज्या माहितीचा उल्लेख अपिलार्थीने केलेल्या, प्रथम अर्जामध्ये नसेल ती माहिती जन माहिती अधिका-याने या टप्प्यावर देणे अपेक्षित नाही.**

आज झालेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक २५-०८-२००६ रोजी माहिती मागविली असता, त्यांना जन माहिती अधिका-याकडून दिनांक ०४-१०-२००६ रोजी अर्धवट माहिती मिळाली. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी प्रथम अपील करुन देखील, त्यांना आजतागायत कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकली नाही, त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असून, त्यांना मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती आजही हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहिती मागितलेल्या वेळी ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते, तर सहाय्यक

वन संरक्षक (ज.का.सं.) किनवट या पदावर कार्यरत होते. त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०४-१०-२००६ रोजी माहिती पुरविली असून, परत दिनांक २६-१०-२००६ रोजी देखील अपिलार्थीस पोस्टाने माहिती पुरविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व वरील घटनाक्रमाचा अभ्यास करता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः दिनांक २५-०८-२००६ रोजी अर्ज केल्यानंतर, सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीस दिनांक २४-०९-२००६ रोजी अगर तत्पूर्वी, त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भातील काही निर्णय जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे, माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) मधील तरतुदीनुसार अपेक्षित होते. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस प्रथम प्रतिसाद देखील विहित मुदतीपेक्षा १० दिवस इतक्या उशिराने दिला आहे. याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २६-१०-२००६ रोजी परत उर्वरीत माहिती दिल्याचे विधान केले आहे. तथापि, अपिलार्थीस ही माहिती पुरविली असल्याचे ते आयोगासमोर कोणत्याही प्रकारे सिध्द करु शकले नाहीत. आयोगाने त्यांना सूचना देऊन देखील त्यांनी, आपल्या कार्यालयातील जावक नोंदवहीच्या रजिस्टरची प्रत त्यांच्याबरोबर आणली नाही. तसेच ही माहिती अपिलार्थीस मिळाली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे लक्षात घेता, सदर माहिती दिनांक २६-१०-२००६ या दिवशी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली, असे म्हणणे धारिष्ट्याचे होईल असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले, तथापि जन अपिलीय अधिका-याने या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव त्यांच्या वर्तनाने या प्रकरणी दाखवून दिला आहे. त्यांच्या या अशा प्रकारच्या वर्तनाची नोंद, सचिव, (वने) यांनी घ्यावी, असे त्यांना या प्रकरणी सूचित करावेसे वाटते. एकूणच, हे प्रकरण वन विभागाच्या अधिका-यांकडून सर्व पातळीवर

आवश्यक त्या गांभीर्याने हाताळले गेले नसल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी परत, अपिलार्थीस मुळातच प्रथम प्रतिसाद देखील १० दिवस उशिराने देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती – धान्य वाटप करणा-या दुकानदारांची नावे -- ही माहिती महसूल विभागाशी संबंधीत असल्याने, अपिलार्थी यांच्या अर्जातील एवढ्या भागापुरती माहिती, त्यांनी महसूल विभागाच्या सक्षम विभागाकडून प्राप्त करुन घ्यावयास पाहिजे होती किंवा अपिलार्थीचा या अर्जातील हा भाग महसूल विभागाच्या सक्षम प्राधिकरणा-कडे पाठवावयास हवा होता व त्याची प्रत अपिलार्थीस द्यावयास हवी होती. तथापि, त्यांनी याबाबत कोणतीही कृती न करुन, माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ६ (३) (i) चा देखील भंग केल्याचे उपरोक्त प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस संपूर्ण माहिती न देता काही माहिती विलंबाने दिल्याबद्दल ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरतात असे आयोगाचे मत आहे.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे, त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे (दहा दिवसाकरिता) एकूण रुपये २५०० /- (रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. **सदर शास्तीची रक्कम त्यांनी ३१ डिसेंबर २००७ पुर्वी शासकीय कोषागारात लेखा शिर्ष संकेतांक " ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" खाली एकाच हप्त्यात भरावी.** सदर शास्तीची रक्कम जन माहिती अधिकारी यांनी, शासकीय कोषागारात

भरल्याची उप वन संरक्षक, नांदेड यांनी खात्री करुन घ्यावी व तदनंतर १५ दिवसाचे आत आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी अर्ज केल्यानंतर, १ वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही, अपिलार्थीस संपूर्ण माहिती देण्यासाठी कोणत्याही प्रकारे सकारात्मक प्रतिसाद न देऊन, त्यांनी दर्शविलेला आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, सचिव (वने) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांना, पुढे असेही सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (महसूल विभागाशी संबंधीत असलेल्या माहितीसह) हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व तसे केल्याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास ३० नोव्हेंबर २००७ अखेरपर्यंत आयोगास पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील निश्चित केलेल्या विहित मुदतीत न दिल्यामुळे, त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे (दहा दिवसाकरिता) एकूण रुपये २५०० /- (रुपये दोन हजार पाचशे फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनात उल्लेख केल्याप्रमाणे करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, सचिव, (वने) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

४. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती (महसूल विभागाशी संबंधीत असलेल्या माहितीसह), हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व त्याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास, ३० नोव्हेंबर २००७ अखेरपर्यत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. क्षिरसागर मोतीराम तुकाराम, अध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन, शाखा अर्धापूर (तामसा रोड), तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, (रोहयो), नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक वन संरक्षक, (तेंदूपान), नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उप वन संरक्षक, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (वने), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६७७

निर्णय दिनांक २२-११-२००७

१ श्री. मोमीन इमाम घुडुसाब, : अपिलार्थी
मोमीन गल्ली, लोहारा, तालुका लोहारा,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २२-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोमीन इमाम घुडुसाब (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. एन. एन. जोशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी श्री. एस. एम. मुंढे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २६-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, केरोसीन वितरण व इतर बाबीसंदर्भात ०१ जानेवारी २००४ ते जुलै २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " माहितीचा अधिकार २००५ च्या अधिनियमातील कलम ४ (१) (ब) नुसार कार्यवाही करुन विविध प्रकारच्या १७ बाबींवरील प्रसिध्द केलेल्या, माहितीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.
>
> जिल्हा पुरवठा कार्यालयाने काढलेल्या लोहारा तालुक्यातील टक्केवारीनुसार गावनिहाय / विक्रेतेनिहाय केरोसीन निश्चिती केलेल्या, पत्रकाच्या झेराक्स प्रती देण्यात याव्यात. तसेच जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील १ व २ सिलेंडर असलेल्या गॅसधारकांच्या संख्येची माहिती देण्यात यावी. सदरील माहिती तालुकानिहाय व एजन्सीनिहाय द्यावी. घाऊक विक्रेते, मराठवाडा ऑईल एजन्सी यांचा केरोसीन कोठा जानेवारी २००६ पासून बंद केलेला आहे. सदरील एजन्सीचा केरोसीन कोठा स्थगित अथवा बंद करण्याच्या कारवाईबाबत, पुरवठा विभागाने केलेल्या कारवाईचे पत्र, पुरवठा उपायुक्त यांचा अपीलावरील निर्णय, मा. मंत्री महोदयांनी अपीलावर दिलेला निर्णय, आदीच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. घाऊक विक्रेते झिंगाडे यांच्या

संदर्भात राज्याच्या पुरवठा विभागाच्या वतीने काही पत्रव्यवहार झालेला असून त्याच्या प्रती देण्यात याव्यात.

मासिक केरोसीन नियतनाच्या जानेवारी ०६ ते जुलै ०६ या महिन्याच्या प्रती देण्यात याव्यात. तसेच, लोहारा तहसील कार्यालयाने दिलेल्या प्रपत्र अ व ब च्या जानेवारी ०४, जानेवारी, ०५, जानेवारी, ०६ ते जुलै, ०६ या महिन्याच्या प्रती देण्यात याव्यात. लोहारा तहसील कार्यालयाने जानेवारी २००४ ते जुलै २००६ पर्यत जिल्हा पुरवठा कार्यालयास पाठविलेल्या केरोसीन संदर्भातील प्रस्तावाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात.

केरोसीन विक्रेते सुभाष झिंगाडे, एस. एस. झिंगाडे व नागनाथ निंगशेट्टी यांच्या केरोसीन परवान्याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. वरील विक्रेत्यांना परवाना देत असतांना केलेल्या कार्यवाहीची व विक्रेत्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. जिल्हा दक्षता पथकाने, जानेवारी ०४ पासून लोहारा तालुक्यातील विक्रेत्यांच्या केलेल्या तपासण्याबाबतचा अहवाल देण्यात यावा. केरोसीन विक्रेते झिंगाडे व निंगशेट्टी यांचे संदर्भात तहसील लोहारा व संबंधीत विक्रेत्यांसोबत झालेल्या पत्रव्यवहाराच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. तरी, वरील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती प्रमाणित करुन देण्यात याव्यात. जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या संगणकातील केरोसीन संदर्भातील व इतर सर्व डाटा मला सीडी मध्ये देण्यात यावा. तेव्हा वरील सर्व कागदपत्रे, सीडी, माहिती मला उपलब्ध करुन द्यावी ही विनंती.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थी यांनी ते दारिद्र्य रेषेखालील असल्याचे म्हटले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम अंशतः प्रतिसाद दिला. यामध्ये त्यांनी, अपिलार्थीस प्रपत्र अ व ब च्या प्रती तसेच केरोसीन विक्रेते श्री. सुभाष झिंगाडे, श्री. एस. एस. झिंगाडे व नागनाथ निंगशेट्टी यांची माहिती तहसीलदार, लोहारा व उमरगा यांच्याकडून हस्तगत करण्याची सूचना या पत्राव्दारे दिली आहे. तथापि या पत्राची प्रत त्यांनी तहसीलदार लोहारा व उमरगा यांना अग्रेषित केल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अशा प्रकारे अर्धवट माहिती प्राप्त झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक १४-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची सुनावणी, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-१०-२००६ रोजी ठेवली होती. या सुनावणीस अपिलार्थी हे हजर झाले नाहीत. तथापि, जन अपिलीय अधिकारी यांनी, याच दिवशी या संदर्भातील त्यांचे आदेश पारीत करुन, जन माहिती अधिकारी यांना जानेवारी २००४ पासून लोहारा तालुक्यातील केलेल्या तपासणीचे अहवाल अर्जदारास उपलब्ध करुन देण्याचे व अपिलार्थीच्या अर्जामध्ये नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या सर्व प्रती उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या अपील निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याकरिता कोणताही निश्चित असा कालावधी दिलेला नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १३-१०-२००६ रोजीच्या आदेशावरुन दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी एका पत्राच्या स्वरुपात हा आदेश दिला असून, त्याची प्रत अपिलार्थीस दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी

यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उर्वरीत माहिती दिनांक ०२-०१-२००७ रोजी दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. सदर अपिलामध्ये, त्यांनी केरोसीन वितरण विषयक संगणकातील माहिती त्यांना हवी असल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये, अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अद्यापही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ (१) (ब) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाने स्वंयप्रेरणेने घोषीत करावयाची माहिती, तद्वतच जन माहिती अधिकारी यांच्या पत्रानुसार तहसीलदार लोहारा व उमरगा यांच्याकडून हस्तगत करावयाची माहिती, त्यांना अद्यापही प्राप्त झाली नाही व सदर माहिती त्यांना आज रोजीही आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते सध्या कार्यरत असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद या पदावर दिनांक १८-०५-२००७ पासून कार्यरत आहेत, तथापि, सदर अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती मिळविण्याप्रीत्यर्थ एकदाही गेले नाहीत. सदर माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः अपेक्षित असल्याने, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता त्यांचेकडे जाणे अपेक्षित आहे. आयोगाकडील व्दितीय अपिलाची सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी संबंधीत नस्ती शोधून काढली असता, अपिलार्थीस अद्यापही काही माहिती द्यावयाची बाकी राहिली आहे, असे त्यांना प्रथम कळले. अपिलार्थीस आता उर्वरीत माहिती येथून पुढे १० दिवसाच्या आत देण्याची त्यांनी आयोगासमोर तयारी दर्शविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व वरील घटनाक्रम पाहिला असता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, एकाच वेळी दिली गेली नाही व ते वरीलप्रमाणे स्पष्ट होत आहे. मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अर्ज दिनांक २६-०७-२००६ रोजी केला असता, अपिलार्थीस दिनांक २५-०८-२००६ रोजी, अगर तत्पूर्वी संपूर्ण माहिती संदर्भात आपला निर्णय जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे, अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित आहे. तथापि, अपिलार्थीस जरी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली असली तरी, ती माहिती अर्धवट असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे. कारण, अपिलार्थीस दिल्या गेलेल्या दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या माहितीमध्ये, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी कलम ४ (१) (ब) च्या संदर्भातील माहिती दिल्याचे दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांची, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती परस्पर तहसीलदार उमरगा व लोहारा यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याची सूचना देण्याची त्यांची कृती बरोबर नाही. कारण, तहसीलदार व जिल्हा पुरवठा अधिकारी हे एकाच प्राधिकरणाचे दोन वेगवेगळे भाग असल्याने, अपिलार्थीने प्रथमतः ज्या अधिका-याकडे माहितीची मागणी केली, त्या अधिका-याने सदर माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन ३० दिवसात देणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित असते. तथापि, अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी नक्की कोणत्या अडचणी आल्या, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन कळून येत नाहीत. तद्वतच अशा प्रकारच्या कोणत्या अडचणी त्यावेळी होत्या किंवा कसे हेही जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले नाही. अपिलार्थी यांनी, आज युक्तिवादामध्ये ते तहसीलदार लोहारा यांच्याकडे ४-५ वेळा हजर राहिले, परंतु त्यांना तहसीलदाराकडून, जन माहिती अधिकारी यांनी आदेशीत करुनही माहिती प्राप्त झाली नसल्याचे, आयोगासमोर स्पष्ट केले. हे सर्व

पाहता जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना एकूणच या प्रकरणामध्ये, अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती द्यावयाची होती किंवा कसे, याबाबत आयोगास शंका येत आहे. वास्तविकतः अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना अपिलार्थीस विहित मुदतीत देणे सहज शक्य होते. अपिलार्थीने मागितलेल्या माहिती पैकी, अधिनियमातील कलम ४ (१) (ब) संदर्भातील माहिती तर दिनांक १५ ऑक्टोंबर २००५ रोजीपासून सार्वजनिक प्राधिकरणाने प्रसिध्द करणे अनिवार्य आहे, त्यामुळे अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यामध्ये, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांना कोणतीही अडचण नव्हती. परंतु, माहिती देण्यासाठी हेतुपुरःस्सर टाळाटाळ करणे हाच त्यांचा एक उद्देश त्यामध्ये असू शकतो, असे आयोगास वाटते. या टाळाटाळीचे नेमके कारण, जरी आज कागदोपत्री उपलब्ध नसले तरी, जन माहिती अधिकारी व त्यांच्या संबंधीत सहका-यांच्या वर्तनावरुन, त्यांनी आपल्या वरील प्रकरणातील कृतीमध्ये, त्यांच्या कार्यशैली मधील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट करुन, अधिनियमातील तरतुद ७ (१) चा भंग केल्याचे निःसंशयपणे दिसून येत आहे. सबब, जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी, जे अपिलार्थीस माहिती देण्याकरिता जबाबदार आहेत, त्या सर्वांनी आपल्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल, त्यांच्यावर सचिव, (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन, आपला अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर, अपिलार्थीस आता आवश्यक असलेली उर्वरीत माहिती, जन माहिती अधिकारी यांनी, हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी, असेही त्यांना पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीतील उर्वरीत माहिती हे आदेश निर्गमीत होताच १० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती अर्धवट देऊन / न देऊन, त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेल्या कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई बद्दल, त्यांच्यावर, सचिव, (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत होताच ३ महिन्याचे आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २२-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोमीन इमाम घुडुसाब, मोमीन गल्ली, लोहारा, तालुका लोहारा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८०

दिनांक २३-११-२००७

श्री. धनाजी दासराव खरसडे, : अपिलार्थी

मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, कृषि अधिकारी

कार्यालय, कृषि विभाग, अनाळा, तालुका परंडा,

जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा,

तालुका परंडा,

जिल्हा उस्मानाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षात : | जन माहिती अधिकारी | : | मंडळ कृषि अधिकारी, अनाळा तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद |
| | जन अपिलीय अधिकारी | : | तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. धनाजी दासराव खरसडे, जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, अनाळा तालुका परंडा व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००१ ते २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ मौजे मलकापूर तालुका परंडा च्या संपूर्ण शिवारात आपल्या खात्यामार्फत सन २००१ ते २००५ पर्यत मा. ना. बा. क. व बल्डींग मा. ना. बा. दुरुस्त्या गट नं. ६२/६२, ९०, १७७, १७७, १७८, १३७, १९१, १९२, १६४, २३२, २०५ मध्ये कामे झालेली आहेत. त्या सर्व कामाचे बजेट कुपन्स वाटप तसेच काम मजुरीचे दिनांक व काम संपल्याची दिनांक काय आहे व सदरील कामावर किती मजूर होते त्यांच्या हजेरीपटाच्या रजिस्टरची झेरॉक्स प्रती व मस्टरची झेरॉक्स ही माहिती मिळण्याबाबत. ”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांच्याकडून, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताच प्रतिसाद दिल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपील अर्ज, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास त्याच दिवशी म्हणजेच दिनांक ०४-१२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांच्या कार्यालयातील लिपिकाने दिलेल्या पोहोच पावतीवरुन सिध्द होत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८-१२-२००६ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. याबाबत त्यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना, त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते. तथापि तदनंतर दिनांक १८-१२-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी हे कार्यालयात उपस्थित नसल्याने या दिवशी सुनावणीची प्रक्रिया पार पडू शकली नाही. अपिलार्थीने, जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १८-१२-२००६ रोजी हजर राहूनही जन अपिलीय अधिकारी हे त्या दिवशी गैरहजर असल्याने सुनावणी होऊ शकली नाही, ही बाब जन अपिलीय अधिकारी यांचे दिनांक १८-१२-२००६ रोजी निदर्शनास आणली आहे. या पुष्ट्यर्थ त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयात दिलेल्या पत्राची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. तदनंतर या अपिलाची सुनावणी झाली नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने व्दितीय अपील दाखल करतांना, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या कलम ११ (१) चा संदर्भ दिला आहे. तथापि, अपिलार्थीने अर्ज केलेल्या दिवशी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ निरसीत झाला होता. परंतु, अपिलार्थीस त्यांच्या माहितीच्या मागणीसंदर्भात न्याय मिळण्याच्या दृष्टीने अपिलार्थीने हे अपील, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये आयोगाकडे केले आहे, असे मानून या प्रकरणी निर्णय घेण्यात येत आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना, पुरेशा अवधीने सुनावणीची लेखी कल्पना देऊन देखील, ते आज सुनावणीस गैरहजर आहेत. त्यांच्या गैरहजेरीची कारणे आज रोजी आयोगासमोर उपलब्ध नाहीत. तथापि, आयोगाकडे अपिलार्थीने या प्रकरणातील उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, कृषि विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीसंदर्भात एक तर कल्पना नसावी किंवा कोणत्याही सामान्य नागरिकास त्यांच्या खात्यासंदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही, असा त्यांनी विडा उचललेला असावा असे आयोगास वाटते. आतापर्यंत आयोगाच्या या कार्यालयामध्ये, कृषि विभागाशी संबंधीत जितक्या सुनावण्या झाल्या त्यातील ९० टक्के सुनावण्यामध्ये आयोगाच्या नजरेस अशी वस्तुस्थिती दिसून आली की, कृषि विभागातील क्षेत्रिय अधिका-यांना, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींचे अजिबात ज्ञान नाही, अथवा जाणुन-बुजून सामान्य नागरिकांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याचे हेतुपूर्वक टाळाटाळ करत आहेत. कृषि विभागाच्या अधिका-यांची अशा प्रकारची मानसिकता, माहितीचा अधिकार अनियम २००५ मधील तरतुदीस छेद देत असून, या अधिनियमाप्रती त्यांच्या मनात असलेला

अनादरच ते एक प्रकारे दाखवत असल्याचे सिध्द होत आहे. ही बाब कृषि खात्याला निश्चितपणे भुषणावह नाही, या आयोगाच्या मताशी सचिव, (कृषि) देखील सहमत होतील, अशी आयोगाची खात्री आहे. तेव्हा त्यांना असे सूचित करण्यात येते की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भात, त्यांच्या खात्यातील क्षेत्रिय अधिका-यांनी त्यांच्याकडे प्राप्त होणा-या किती अर्जावर विहित मुदतीत कारवाई केली आहे, किती अपील अर्जावर विहित मुदतीत निर्णय दिले आहेत याची त्यांच्या पातळीवर पडताळणी करुन क्षेत्रित अधिका--यांना या संदर्भात प्रशिक्षण देण्याची कारवाई करावी. या प्रशिक्षणाचा उद्देश मुख्यत्वेकरुन, त्यांच्या मनात असलेली प्रचलीत मानसिकता बदलण्याच्या दृष्टीने असावा, असेही त्यांना या ठिकाणी सूचित करण्यात येत आहे.

आता उपरोक्त प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता असे दिसून येईल की, अपिलार्थीने प्रथम अर्ज केल्यानंतर त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत प्रतिसाद दिला नाही, तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलाची तारीख निश्चित करुनही त्या दिवशी ते गैरहजर राहिले. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाव्दारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे, असे आयोगाचे मत आहे. तेव्हा असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी जन माहिती अधिकारी त्यांनी लावलेल्या विलंबाबाबत, त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा. त्यांनी या प्रकरणी दर्शविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्याची शिफारस सचिव, (कृषि) यांना का करु नये याचाही खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करावा. याचप्रमाणे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांच्या

बेपर्वाई वृत्तीची देखील सचिव (कृषि) यांनी नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये विचारलेल्या माहितीसंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी सदर अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्यांना हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यात यावी व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या दिनांक ०६-११-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत, त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची कारवाई का करण्यात येऊ नये याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी, या प्रकरणी दर्शविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्याची

शिफारस सचिव, (कृषि) यांना का करु नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धनाजी दासराव खरसडे, मु. पो. तांदुळवाडी, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, अनाळा तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, परंडा, तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८१

दिनांक २३-११-२००७

श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रअप्पा, : अपिलार्थी
मु. पो. वलांडी, तालुका देवणी,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी
(ब), तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा
परिषद, लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रअप्पा (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. चंदनशिवे एस्. डब्ल्यू. (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी (ब) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, एन. जे. सौदागर यांच्या संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. "सौदागर एन. जे. आपले बी. एड पास झालेले मार्कमेमोची सत्यप्रत मिळणेबाबत,

२. सौदागर एन. जे. आपले जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत मिळणेबाबत,

३. आपले शिक्षक पदाचे व मुख्याध्यापक पदाचे वैयक्तीक मान्यतेचे (अप्रोल) ची सत्यप्रत व परवेक्षादिन व कायम झालेले सत्यप्रत मिळणेबाबत,

४. प्रमाणित बिंदु नामावली (रोस्टर) आरक्षण बिंदू नामावलीची मु. अ. च्या सत्यप्रतने मिळणेबाबत."

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २६-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी रुपये ३६ इतके शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. त्याचबरोबर ३६ रुपयाची मनीऑर्डर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केल्यानंतर व अपिलार्थीने केलेली ३६ रुपयाची मनीऑर्डर जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०५-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, अपिलार्थीस दिनांक ०७-०९-२००६ रोजी काही माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीच्या दिनांक ०७-०९-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीप्रमाणे मुद्दा क्रमांक १, २ व ३ संदर्भात त्यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ४ बिंदू नामावली या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस दिलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, मिळालेल्या अशा प्रकारच्या अर्धवट माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यास, अपिलार्थीस ७ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही कृती पूर्णतः चुकिची असल्याचे दिसून येते. कारण जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही त्यांच्याकडे बोलावून, त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर आपला अंतीम निर्णय पारीत करणे, हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. या प्रकरणात जन अपिलीय अधिकारी यांनी, अशा प्रकारची कोणतीही कारवाई न करता, जन माहिती अधिका-यास अपिलार्थीस ७ दिवसात माहिती देण्याचे एका वेगळ्या पत्राव्दारे सूचित केल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निणर्याने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मुख्याध्यापकपदी श्री. एन. जे. सौदागर यांच्या कायम स्वरुपी नेमणुकीस मान्यता मिळाल्याची व त्यांनी मागणी केलेल्या मूळ माहितीतील मुद्दा क्रमांक ४ ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापही मिळाली नाही.

जन माहिती अधिकारी हे आज सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत, तर जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणामध्ये प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी हे संबंधीत संस्थेचे सचिव आहेत. तथापि, अपिलार्थीने त्यांच्याकडे अपील अर्ज केल्यानंतर त्यांनी, तात्काळ जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याचे सूचित केले आहे.

वरील घटनाक्रम व वस्तुस्थिती व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येईल की, मुळात अपिलार्थी यांनी श्री. सौदागर यांच्या कायम स्वरुपी नेमणुकीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दिलेल्या मान्यतेच्या प्रतीची मागणी त्यांच्या मूळ अर्जात केलेली नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस देणे अभिप्रेत नाही. या प्रकरणी, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमधील ४ मुद्दयापैकी ३ मुद्यावरील माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत पुरविली आहे. तथापि अपिलार्थीस मुद्दा क्रमांक ४ शी संबंधीत माहिती त्यांनी अपिलार्थीस का दिली नाही, हे ते आज आयोगासमोर उपस्थित नसल्याने, कळण्यास मार्ग नाही.

दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद, आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद लक्षात घेता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत अर्धवट माहिती दिलेली आहे. त्यांच्या या कृतीने, त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव सिध्द केला आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की , अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जामध्ये मागितलेली मुद्दा क्रमांक ४ ची माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व अनुपालन अहवाल आयोगास सात दिवसाचे

आत सादर करावा.  जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस, विहित मुदतीत माहिती देतील याची खात्री शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी करावी.

वर म्हटल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना राज्य माहिती आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी यापुढे भविष्यात त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, प्राप्त होणा-या अर्जावर सतर्कतेने कारवाई करावी असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ४ संबंधात संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी व या संदर्भातील आपला अनुपालन अहवाल आयोगास, तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अर्धवट माहिती दिल्याबद्दल त्यांना आयोगा-तर्फे सक्त ताकीद देण्यात आहे.

४. जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देतील याची खात्री शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक २३-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. महाजन भिमाशंकर शिवरुद्रअप्पा, मु. पो. वलांडी, तालुका देवणी, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय विद्यालय, टाकळी (ब), तालुका देवणी, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८२

निर्णय दिनांक २३-११-२००७

१ श्री. एस. एम. मगर, : अपिलार्थी

घर नं. २-५-९७/बी, मोगलपूरा,

पानचक्की रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, वैजापूर,

जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,

जिल्हा औरंगाबाद

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २३-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. एस. एम. मगर हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री. मिरासे राम पुंजाजी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. पिराजी लक्ष्मण सोरमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, अब्दुल हकीम अब्दुल गफूर यांना दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्र संदर्भात दिनांक १७-०१-१९८७ ते २४-०८-२००१ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> “ श्री. अब्दुल हकीम अब्दुल गफूर यांना दिनांक १७-०१-१९८७ ला दिलेले जातीचे प्रमाणपत्र, तलाठी वैजापूर यांचा अहवाल व अर्जासोबतच्या सर्व कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती.”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी, त्यांच्या कार्यालयामध्ये शोध घेऊनही अपिलार्थीने मागितलेली कागदपत्रे व संचिका उपलब्ध होऊ शकली नाही असे कळविले. याच बरोबर, अपिलार्थीने त्यांच्या अर्जामध्ये सदर प्रकरणाचा संचिका क्रमांक दर्शविलेला नसल्यामुळे त्यांना ही संचिका शोधता आली नाही असे म्हटले आहे व संबंधीत प्रकरणाचा क्रमांक व दिनांक त्यांनी या पत्रामध्ये अपिलार्थीकडून पुढे अपेक्षिला होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०२-०६-२००६ रोजी प्रथम अपील केले.

या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्या पातळीवर सदर प्रकरण तपासून अपिलासंदर्भात दिनांक १९-१०-२००६ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशाची प्रत त्यांनी, तहसीलदार व अपिलार्थी यांना दिलेली आहे. या निर्णयामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अर्जदाराने मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे सूचित करुन प्रकरण निकाली काढले आहे. सदर निर्णय देतांना, जन माहिती अधिकारी यांचे माहिती उपलब्ध होऊ शकत नाही हे विधान त्यांना संयुक्तीक वाटले नसल्याचे म्हटले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील निर्णय होऊनही, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आयोगाच्या असे निदर्शनास आणले की, श्री. अब्दुल

हकीम अब्दुल गफूर रा. वैजापूर यांनी तडवी जातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक, औरंगाबाद, जिल्हा मजूर सहकारी संस्थाचा संघ मर्यादित औरंगाबाद, जिल्हा कृषि व ग्रामीण विकास बॅक, औरंगाबाद व सहयोग नागरी सहकारी पतसंस्था म. वैजापूरचे संचालकपद भुषविले आहे. जात पडताळणी समितीने, त्यांच्याकडे पुरावा येण्यापुर्वीच दिनांक २१-०४-२००१ रोजी क्रमांक ००८ रोजी श्री. हकीम यांना जात वैधता प्रमाणपत्र दिले आहे. सदर प्रमाणपत्र दिल्यानंतर, समितीकडे उपलब्ध असलेल्या जातीच्या कागदपत्राची तपासणी करिता उप संचालक अनुसुचित जमाती प्रमाणपत्र समिती यांनी श्री. अब्दुल हकीम यांच्याकडे या पूरक कागदपत्रांची मागणी केली आहे. म्हणजेच, संबंधीत समितीने कागदपत्राचा उपलब्ध असलेला पुरावा लक्षात न घेता, आधी वैधता प्रमाणपत्र दिले व तदनंतर या प्रमाणपत्राशी पूरक अशी कागदपत्रे श्री. हकीम यांच्याकडून मागितली आहेत. यावरुन श्री. अब्दुल हकीम यांनी, तडवी जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर केले आहे, असे या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे हजर नाहीत त्यामुळे आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अर्जामधील त्यांचे म्हणणे, हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे दिनांक २१-०१-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी सदर माहितीचा त्यांच्या कार्यालयाच्या अभिलेखामध्ये कसोशीने शोध घेतला. तथापि, हरप्रकारे प्रयत्न करुनही त्यांना अपिलार्थीस हवी असलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकली नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही महसूल विभागाच्या "अ" या प्रकारच्या अभिलेखामध्ये मोडते. सदर अभिलेख ज्या कर्मचा-याच्या ताब्यात होते त्या कर्मचा-यावर त्यांनी आजतागायत कोणतीही कारवाई केलेली नाही.

अपिलार्थीने दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये, ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट महाराष्ट्र या संस्थेने अब्दुल हकीम यांना दिलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रतीचा समावेश आहे. या संस्थेने, श्री. अब्दुल हकीम यांना सदर प्रमाणपत्र देण्यापूर्वी, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचा आधार घेऊनच हे प्रमाणपत्र दिले असणार. म्हणजेच पर्यायाने अपिलार्थीने मागितलेली माहिती, ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट या संस्थेकडे उपलब्ध असणार हे उघड आहे. सदर संस्थेकडे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती बाबत काही विचारणा केली होती का असे आयोगाने विचारल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यास नकारार्थी उत्तर दिले. अपिलार्थीने विचारलेली माहिती "अ" वर्गाच्या अभिलेख्यामध्ये मोडत असल्याने, सदर अभिलेख गहाळ झाल्यास संबंधीत कर्मचा-यावर काय कारवाई करु शकता असे विचारल्यावर जन माहित अधिकारी यांनी संबंधीत कर्मचा-यावर शिस्तभंगाची व आवश्यक असल्यास फौजदारी स्वरुपाची कारवाई होऊ शकेल असे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद, अपिलार्थी यांचे व्दितीय अपील अर्जातील म्हणणे व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात श्री. अब्दुल हकीम यांच्या जातीच्या वैधता प्रमाणपत्राबाबत जे पुरावे जन माहिती अधिकारी यांनी ग्राह्य धरले, त्या पुराव्याच्या प्रती मागितल्या होत्या. तथापि, अपिलार्थीने विचारलेली माहिती आजतागायत, जन माहिती अधिकारी हे त्यांना, ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध न होऊ शकल्यामुळे, देऊ शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि अपिलार्थीने त्यांना मागितलेली माहिती देण्यासंदर्भात, त्यांनी कोणतेही इतर प्रकारे सकारात्मक प्रयत्न केल्याचे देखील दिसून येत नाही. अपिलार्थीस द्यावयाची माहिती जर त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती तर, त्यांनी ती माहिती ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट या संस्थेकडे उपलब्ध आहे किंवा कसे हे पाहून याबाबत तपास करणे गरजेचे होते.

या प्रकरणी, त्यांनी असा तपास केलेला नाही. याचबरोबर, कायम स्वरुपी ठेवावयाचे हे अशा प्रकारचे महत्वाचे अभिलेखे त्यांच्या कार्यालयातून गहाळ होतात व त्यावर, ते काहीही कारवाई करत नाही ही बाब देखील महसूल विभागास निश्चितपणे भुषणावह नाही, असे आयोगाचे मत आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांनी ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट महाराष्ट्र या पुणेस्थित संस्थेशी प्रथमतः संपर्क साधून, सदर वैधता प्रमाणपत्र देतांना श्री. अब्दुल हकीम यांनी या संस्थेकडे जी कागदपत्रे दाखल केली होती, त्या कागदपत्रांची तपासणी त्यांनी करणे इष्ट राहील असे आयोगाचे मत आहे. जर सदर संस्थेकडे देखील काहीच माहिती उपलब्ध होऊ शकली नाही तर, या प्रकरणी जबाबदार असलेल्या लिपिकावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करणे हे जन माहिती अधिका-यास अनिवार्य राहील.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध घेऊनही जन माहिती अधिकारी यांना ही कागदपत्रे उपलब्ध होऊ शकली नाही हे त्यांनी शपथपत्र देऊन कबूल केले आहे. तेव्हा ही माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही असे त्यांचे म्हणणे आयोग ग्राह्य धरत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट, महाराष्ट्र, पुणे यांच्याशी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तात्काळ संपर्क साधून, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. सदर संस्थेशी संपर्क साधून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती हस्तगत करणे व ती अपिलार्थीस पुरविणे या प्रक्रियाकरिता जन माहिती अधिका-यास एकूण २० दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

ज्या कर्मचा-याच्या हातून अपिलार्थीने मागितलेल्या माहिती विषयीची नस्ती गहाळ झाली आहे त्याच्यावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद, यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे व इतर अनुषंगिक नियमाप्रमाणे / संहितेप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, ट्रायबल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग इंस्टिट्यूट महाराष्ट्र, या पुणेस्थित संस्थेशी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तात्काळ संपर्क साधून, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांना ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. सदर संस्थेशी संपर्क साधून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती हस्तगत करणे व ती अपिलार्थीस देणे या सर्व प्रक्रियाकरिता जन माहिती अधिका-यास एकूण २० दिवसांची मुदत देण्यात येत आहे.

३. ज्या कर्मचा-याच्या हातून अपिलार्थीने मागितलेल्या माहिती विषयीची नस्ती गहाळ झाली आहे त्याच्यावर जिल्हाधिकारी, औरंगाबाद, यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे व इतर तदअनुषंगिक नियमाप्रमाणे / संहितेप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २३-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. एस. एम. मगर, घर नं. २-५-९७/बी, मोगलपूरा, पानचक्की रोड, औरंगाबाद
२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६६८

निर्णय दिनांक २६-११-२००७

१ श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ, : अपिलार्थी
अध्यक्ष क्रांतीसेना महाराष्ट्र प्रदेश,
मु. पो. क्रांती निवास, नरोड गल्ली, बिलोली,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी रेल्वे

तालुका उमरी, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा कृषि अधिकारी,

नांदेड

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तालुका कृषि अधिकारी, उमरी, जिल्हा नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी (तांत्रिक), तालुका कृषि अधिकारी कार्यालय श्री. मोहमद झाकीर हुसेन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, श्री. दिगांबर माधव तपासकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. व्यंकट लक्ष्मणराव राठोड हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक १५-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामासंदर्भात २००५ या वर्षाच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१. गोरठा GV/09/II/ICLBS-1

२. अस्वलदरी GV/09/II/I-dCBS-1

३.    अस्वलदरी GV/09/II/I-dLBS-2

उपरोक्त कामावरील उपस्थित मजुरांच्या मस्टर व पेशीटच्या सत्यप्रती त्या त्या कामांना तांत्रिक मंजुरी दिली त्या त्या मंजुरीची सत्यप्रती मिळणेबाबत.”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या प्रथम अर्जास, जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००७ रोजी सुनावणी ठेवल्याचे, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अपिलार्थीबरोबर केलेल्या पत्रव्यवहारासंदर्भात, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयातील आवक जावक रजिस्टरच्या सत्यप्रती आयोगास सादर करण्याचे त्यांना सूचित केलेले असतांना देखील, आज अपिलार्थीस हे पत्र पाठविल्याच्या पुष्ट्यर्थ जन अपिलीय अधिकारी आयोगासमोर कोणताही पुरावा सादर करु शकले नाहीत, ही बाब येथे नोंद करुन घेण्यात येत आहे. यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच सुनावणीसाठी बोलाविले होते किंवा कसे याबाबत आयोग साशंक असल्याची नोंद या निर्णयामध्ये विशेषकरुन घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम

२००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे म्हटले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांना अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे अर्ज पाठविला होता तथापि सदर अधिका-यांनी जाणून-बुजून माहिती दिली नाही व यासंदर्भात त्यांचेशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्याचबरोबर त्यांनी या व्दितीय अपील अर्जामध्ये पुढे असेही म्हटले की, त्यांनी ज्या कामांची माहिती मागितली होती ती कामे, ठेकेदारी पध्दतीने करुन घेतली असून, त्यावर बोगस मस्टर भरले असल्याबाबत त्यांची खात्री आहे. ठेकेदाराकडून कामे करुन घेतल्यामुळे सदरची कामे निकृष्ट तर झालीच आहेत परंतु, रोजगार हमी योजनेच्या नियमावलीला बगल देऊन संबंधीत कर्मचारी अधिकारी यांनी कर्तव्यात कसूर केला आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी उपरोक्त परिच्छेदामध्ये म्हटल्याप्रमाणे त्यांचा युक्तिवाद असून, आयोग या प्रकरणी जो काय निर्णय घेईल तो त्यांना मान्य असेल.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने अर्ज केला तेव्हा, त्या वेळेस ते जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तथापि अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती आता त्यांच्या सोबत आणली आहे.

सुनावणीच्या वेळेस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. व्यंकट लक्ष्मणराव राठोड हे उपस्थित आहेत. त्यांना त्यांच्या बचावाची पूर्ण संधी देवून देखिल त्यांनी फक्त असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी त्यांच्याकडे माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी त्यांच्याकडे अतिवृष्टीशी संबंधीत कामे चालू होती, त्यामुळे त्यांना अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देता आली नाही. यापेक्षा जादा मुद्दे त्यांच्याकडे, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाचे समर्थन करण्याकरिता नाहीत याची आयोगाने नोंद घेतली आहे.

सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी या पदाचा नुकताच कार्यभार घेतला असून तत्कालीन जन अपिलीय अधिकारी वेगळे होते, त्यामुळे जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी विहित मुदतीत का सुनावणी घेतली नाही याची कारणे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, संबंधीत उपस्थितांनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या अर्जाकडे कृषि विभागाच्या जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या अधिका-यांनी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. अपिलार्थीने दिनांक १५-०६-२००६ रोजी प्रथम अर्ज केला, त्यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०७-२००६ रोजी, अगर तत्पूर्वी अपिलार्थीस माहिती देणे अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि आजतागायत म्हणजे १ वर्ष ४ महिन्यांचा कालावधी लोटून गेल्यानंतर, त्यांनी अपिलार्थीस इतक्या विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथम अपील दिनांक २५-०७-२००६ रोजी केले. या अपिलाची सुनावणी त्यांनी यानंतर ३० ते ४५ दिवसाच्या आत घेणे अपेक्षित होते, तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या अर्जाची प्रथम दखल त्यांच्याकडील दिनांक २५-०४-२००७ रोजीच्या पत्रान्वये घेतली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची दखल इतक्या विलंबाने घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीस एप्रिल २००४ ते मार्च २००५ या कालावधीतील त्यांनी निर्देशीत केलेल्या कामावरील मस्टरच्या झेरॉक्स प्रती त्यांना हव्या होत्या. सदर कालावधी, माहिती मागितलेल्या कालावधीशी नजीकचा असल्यामुळे व अपिलार्थीस द्यावयाच्या माहितीमध्ये मस्टरच्या झेरॉक्स प्रती व तांत्रिक मंजुरीच्या आदेशाच्या

प्रती अशा साध्या मुद्दयाचा -- जी माहिती त्यांच्याकडे सहज उपलब्ध होऊ शकेल -- समावेश असल्याने अपिलार्थीने मागितलेली माहिती फार क्लीष्ट स्वरुपाची अथवा विस्तृत व्याप्तीची होती असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीस त्यांनी माहिती विहित मुदतीत न देण्याची शक्यता केवळ, संबंधीत मस्टरच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या हीच असू शकते. जर त्यांनी वेळेवर मस्टर भरुन संबंधीत मजुरांचे वेतन अदा केले असेल तर या मस्टरच्या प्रती अपिलार्थीस देण्यास काहीच हरकत नव्हती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची दखल घेतली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर विहित मुदतीत सुनावणी घेण्याचे साधे सौजन्य देखील दाखविले नसल्याचे स्पष्ट होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोघाही अधिका-यांनी, त्यांच्या या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई पूर्णपणे सिध्द केली असल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी दाखविलेल्या त्यांच्या कार्यशैलीची नोंद सचिव (कृषि) यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सुचविण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी हे वरील प्रमाणे केलेल्या विवेचनानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निश्चितपणे पात्र होत आहेत असे आयोगाची, वरील वस्तुस्थिती पाहता, खात्री झाली आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा, ते अतिवृष्टीच्या कामामध्ये गर्क होते हा युक्तिवाद आयोग मानत नाही, कारण अपिलार्थीने अर्ज केल्यापासून ते आयोगासमोरील व्दितीय सुनावणी होण्यापर्यतच्या १ वर्ष ५ महिने या कालावधीत, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणतीही सकारात्मक कारवाई केलेली नाही व या संपूर्ण कालावधीमध्ये ते या प्रकरणाबाबत पूर्णतः निष्क्रिय राहिले आहेत, हे पाहता त्यांच्या अतिवृष्टीच्या कामात ते गुंतले असल्याचा त्यांचा युक्तिवाद आयोगास मान्य करता येणार नाही.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की :

संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदी प्रमाणे विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम त्यांनी पुढील लेखाशिर्षाखाली शासकीय कोषागारात हे आदेश निर्गमीत होताच एकुण १० हप्त्यात भरावी. याबाबत पहिला हप्ता भरण्याची अंतीम मुदत ३१ डिसेंबर २००७ ही असेल व १० वा हप्ता भरण्याची मुदत ३० सप्टेंबर २००८ ही असेल.

**“ ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ”**

अपिलार्थीने कोषागारात शास्ती दरमहा भरल्यासंदर्भातील अनुपालन अहवाल अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी आयोगाकडे जानेवारी २००८ पासून पुढे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात नियमित पणे पाठवावा.

त्याच बरोबर पुढे असेही आदेशीत करण्यात येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत, विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ३ दिवसाच्या आत संपूर्ण माहिती विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील निश्चित केलेल्या विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांचेवर प्रतिदिनी रुपये २५० प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती लावण्यात येत आहे. या शास्तीचा भरणा त्यांनी वरील विवेचनामध्ये स्पष्ट केल्या-प्रमाणे करावा.

४. अपिलार्थीने कोषागारात शास्ती दरमहा भरल्यासंदर्भातील अनुपालन अहवाल अधीक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांनी आयोगाकडे जानेवारी २००८ पासून पुढे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या पंधरवाड्यात नियमितपणे पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कंजे मनोहरराव पंढरीनाथ, अध्यक्ष क्रांतीसेना महाराष्ट्र प्रदेश, मु. पो. क्रांती निवास, नरोड गल्ली, बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी तांत्रिक, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, उमरी जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, उमरी, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (कृषि), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ जिल्हा कृषि अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५२

दिनांक २६-११-२००७

श्री. असलम खान इब्राहीम खान, : अपिलार्थी
जुना बस स्टॅंड, खुलताबाद, जिल्हा
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, खुलताबाद,
तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. असलम खान इब्राहीम खान हे गैरहजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार श्री. पद्माकर कुलकर्णी व जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद सौ. अलका उध्दवराव खैरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील, दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील अतिक्रमणासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ खुलताबाद नगरपालिका हद्दीत जुना बस स्टॅड, परिसर नविन बसस्टॅण्ड परिसर, कुतर बावडी परिसर, असझमशाहीपुरा, धर्म तलाव जवळ, बाग कोट, परिसर, सागर होटल ते पंचायत समिती रोड, सागर होटल ते आंबेडकर पुतळा रोड, किती लोकांनी अतिक्रमण केले, किती लोकांना भाडेपट्टीवर जागा दिली, नावांची यादी मिळणे व त्यावर कार्यवाही केली किंवा नाही. नगरपालिका हद्दीत राखीव जागा कोणकोणती त्याचा नकाशा मिळणेबाबत.”

सदर माहिती अपिलार्थीस, व्यक्तिशः , टपालाव्दारे किंवा कशी मिळावी याबाबत त्यांनी आपल्या अर्जामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, उपरोक्त परिसरातील अतिक्रमण केलेल्या लोकांचा सर्व्हे करण्यात आलेला आहे.

अतिक्रमण सर्व्हेक्षण यादीस मान्यता नसल्याने सदरील यादी देता येणार नाही.  तसेच भाडेपट्टीवर जागा दिलेल्या नाहीत.  उपरोक्त सर्व्हेक्षणास मान्यता मिळाल्यानंतरच त्यांना नावाची यादी देण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने,  माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित कोणत्या तारखेस सुनावणी घेतली, हे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. तथापि, या सुनावणीचे आदेश जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे पारीत केलेले आहेत.  सदर आदेश जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांना, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील पत्र दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्राने पाठविल्याचे दिसून येते.  या अपील निर्णयामध्ये त्यांनी, अपिलार्थी यांचे अपील मान्य केले असून, सदर माहिती देण्यापोटी अपिलार्थीकडून जन माहिती अधिकारी यांनी घेतलेले रुपये २०० इतके शुल्क अपिलार्थीस परत करण्याचे सूचित केले आहे व अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ७ दिवसाच्या आत देण्याचे आदेशीत केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय प्राप्त होण्यापुर्वीच, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस माहिती दिल्याचे दिसून येते.  सदर माहिती अपिलार्थीस दिनांक १६-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या संबंधीत पत्राच्या स्थळप्रतीवर सही केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या, माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०६-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना ३० दिवसात माहिती दिली नाही, २२ दिवस उशिराने दिली व दिलेली माहिती अपुरी असल्याचे नमूद केले आहे.

आज रोजी युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १४-०८-२००६ रोजी अपिलार्थीस माहिती दिली आहे व ती दिनांक १६-०८-२००६ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. या प्रकरणात जो निर्णय होईल तो त्यांना मान्य राहील.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येईल की, मुळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती त्यांना, अधिनियमाव्दारे विहित मुदतीत म्हणजे दिनांक २६-०७-२००६ रोजी, अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०७-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिलेला आहे तो अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आहे. तथापि, अपिलार्थीस माहिती न देण्यापोटी जी कारणे या पत्रामध्ये नमूद केली आहेत, ती आयोगास मान्य नाहीत. या पत्रामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "अतिक्रमण सर्व्हेक्षण यादीस मान्यता नसल्याने" सदरील यादी आता देता येत नाही. त्यांचे हे म्हणणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीस छेद देते. अपिलार्थीस माहिती देण्यापूर्वी, सर्व्हेक्षण यादीस सर्वसाधारण सभेत मान्यता घेण्याचा जन माहिती अधिकारी यांच्या मानस होता, असे त्यांच्याशी झालेल्या चर्चेतून निष्पन्न झाले. सर्वसाधारण सभेमध्ये जरी यादीस मान्यता नसली

तरी, त्यांनी सर्वसाधारण सभेच्या मान्यतेच्या आधिन राहून असा उल्लेख करुन ही यादी अपिलार्थीस पुरवावयास हवी होती. तथापि, त्यांनी तसे केल्याचे या प्रकरणी दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती पुरविली नाही, हे जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांचे कडील प्रथम अपिलावरील सुनावणीमध्ये मान्य केले आहे. केवळ सर्वसाधारण सभेची मान्यता नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न देणे हे चुकिचे असून, त्यांनी अपिलार्थीच्या माहितीच्या या अर्जास सकारात्मक प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस लिहिलेल्या दिनांक १७-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनंतर माहिती देण्याचे कबूल केले आहे. तदनंतर खुलताबाद नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा झाली, या सभेत जन माहिती अधिकारी यांनी ठेवलेल्या यादीस सर्वसाधारण सभेने मान्यता दिली व अखेरीस जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस दिनांक १४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविली, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सांगितले. अशा सर्वसाधारण सभेची वाट पाहण्याकरिता त्यांना काही कालावधी लागला. अर्थात, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेची वाट न पाहता सदर सभेच्या अधिन राहून ही माहिती त्यांना अपिलार्थीस सहज पुरविता आली असती. तथापि त्यांचा अपिलार्थीपासून ही माहिती लपवून ठेवण्याचा किंवा माहिती देण्यास टाळाटाळ करण्याचा कोणताही असद्हेतू असल्याचे, त्यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन व त्यांनी आयोगासमोर आज मांडलेल्या युक्तिवादावरुन दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीमध्ये आरक्षित जागेच्या माहितीसंदर्भात नगरपरिषदेच्या विकास योजना नकाशाची प्रत दिली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु आयोगास दाखविण्यात आलेल्या संबंधीत नकाशावर, आरक्षित जागा निश्चितपणे दाखविलेली नाही. या जागा अपिलार्थी यांना पुरविलेल्या नकाशामध्ये दाखविल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी

यांचे म्हणणे पडले. सदर म्हणणे अग्राह्य धरुन त्यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी खुलताबाद नगरपालिकेच्या विकास योजनेच्या नकाशाची नवीन प्रत तयार करुन त्यामध्ये आरक्षित जागा वेगळ्या रंगाने दर्शविण्यात यावी व याची प्रत अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत द्यावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा. अपिलार्थीस त्यांनी अधिनियमामध्ये विहित केलेल्या तरतुदीपेक्षा १९ दिवस इतक्या विलंबाने व अर्धवट माहिती दिल्याचे सिध्द झाल्याने, त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी यापुढे, भविष्यामध्ये अशा प्रकारच्या चूका टाळून, माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अर्जावर विहित मुदतीत सकारात्मक कारवाई करावी, असेही पुढे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. या ताकीदीची यथायोग्यरित्या नोंद त्यांच्या वरिष्ठांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अद्यापपर्यत द्यावयाची माहिती ( खुलताबाद नगरपरिषद विकास योजना नकाशाची प्रत – ज्यामध्ये राखीव क्षेत्र वेगळ्या रंगाने दर्शविलेले आहे), हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत विनामूल्य द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस विलंबाने व अर्धवट माहिती पुरविल्याबद्दल त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. असलम खान इब्राहीम खान, जुना बस स्टॅड, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपालिका, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५३

दिनांक २६-११-२००७

श्री. कमलकिशोर काळूराम बजाज, : अपिलार्थी

“स्मृती” शिल्पनगर,

आर. टी. ओ. रोड,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर,

महानुभव आश्रम, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सचिव, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभव

आश्रम, औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २६-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कमलकिशोर काळूराम बजाज (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर श्री. रमेश भणगे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव श्रीकृष्ण विद्यामंदिर संतोषमुनी नागनाज बाबा कपाटे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील, दिनांक १३-०१-२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या संस्थेतर्फे चालवित असलेल्या शाळा संदर्भात एकूण ४ मुद्दयावर काही मागितली मागविली होती.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या, माहितीसाठीच्या मूळ अर्जावर १० रुपये किंमतीचे कोर्ट फी स्टॅम्प चिटकविल्याचे दिसून येत नाही.

शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने प्रसिध्द केलेल्या, दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जी कार्यपध्दती विहित केली आहे, त्यामध्ये खालील प्रमाणे तरतुदी आहेत.

Procedure for seeking information.

A request for obtaining information under sub-section (1) of section 6 shall be made to the concerned State Public Information Officer on plain paper in the format given in Annexure "A" **and shall be accompanied by an application fee of rupees ten by way of cash against proper receipt or by demand draft or banker's cheque payable to the public authority or by affixing a court fee stamp of rupees ten.**

अधिनियमातील विहित केलेल्या उपरोक्त तरतुदींचे पालन न केल्याने, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांचा मूळ अर्जच मूळात तथ्यहीन ठरत असल्याने, अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१.  अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २६-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कमलकिशोर काळूराम बजाज, "स्मृती" शिल्पनगर, आर. टी. ओ. रोड, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभव आश्रम, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्रीकृष्ण विद्यामंदिर, महानुभव आश्रम, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८३

निर्णय दिनांक - २७-११-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री.सिद्दीकी फसियोद्दीन,<br>सहसंपादक, सा.लातूर दर्पण, झिनत हाऊसींग सोसायटी, ईस्माइल उर्दू शाळेसमोर, लातूर तालूका जिल्हा- लातूर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ माहिती अधिकारी, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) कार्यालय, पुणे. | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक)शिक्षण संचालनालय कार्यालय, पुणे. | : | प्रतिवादी |
| प्रत्यक्षात जनमाहिती अधिकारी | : | प्रशासन अधिकारी |
| प्रत्यक्षात जनअपिलीय अधिकारी | : | शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च मान्यमिक) |

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सिद्दीकी फसियोद्दीन (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण

संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे, श्री. सदानंद शंकरराव शिंदे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०२-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे माध्यमिक शाळेस जोडलेल्या विनाअनुदानित वर्गाच्या व्यवस्थापना संदर्भात सन १९९८- १९९९ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे एकूण ५ मुद्यावर माहिती मागविली होती.

‘‘१. अनुदानित माध्यमिक शाळेस जोडलेल्या विनाअनुदानित समांतर वर्गाला अनुदान कोणत्या धोरणानुसार देण्यात येते? नवीन शाळा समजुन ? जादा तुकडी समजुन? शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी.

२. अनुदान जादा तुकडी गृहीत धरुन देण्यात येत असेल तर अवलंबण्याची कार्यपध्दती?

३. अनुदान नवीन शाळा गृहीत धरुन देण्यात येत असेल तर शासन निर्णयाची प्रत.

४. या समांतर वर्गाला स्वंतत्र मुख्याध्यापकपद देय आहे का ? स्वतंत्र शिक्षकेतर कर्मचारीवर्ग देय आहे का ?

५. शै.वर्ष १९९८-९९ पासून समांतर वर्गाना मान्यता देण्यात आलेल्या राज्यातील विभागनिहाय शाळांची यादी देण्यात यावी.

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन व जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये दिलेल्या माहितीवरुन दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, याची नोंद घेण्यात आली. जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे  असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा माहितीसाठीचा दिनांक- ०२-०९-२००६ रोजीचा प्रथम अर्ज व त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३०-१०-२००६ रोजी केलेला प्रथम अपीलअर्ज हे दोन्हीही त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाहीत. ज्यावेळी आयोगाचे व्दितीय अपिलाची सुनावणीची नोटीस त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाली त्यानंतर त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये या अर्जासंदर्भात कसोशीने शोध घेतल्यानंतरही त्यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज व प्रथम अपीलअर्ज

प्राप्त होवू शकले नाहीत. तसे त्यांनी आयोगासमोर लेखी शपथपत्राव्दारे कबुल केले आहे. अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या प्रतिवर सदर अर्ज संबंधितांना प्राप्त झाल्यासंदर्भात कोणतेही अभिप्राय अथवा संबंधित कार्यालयाचा शिक्का नाही. त्यामूळे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज व अपीलअर्ज प्राप्त झाले नाहीत, हे त्यांच्या प्रतिनिधीचे म्हणणे आयोग मान्य करीत आहे व त्याच बरोबर त्यांना पुढे असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाच्या व अपील अर्जाच्या प्रती आयोगाच्या कार्यालयाकडून व्यक्तिशः प्राप्त करुन घ्याव्यात व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे विचारणा केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी व अनुपालन अहवाल तदनंतर ७ दिवसात आयोगाकडे सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेशा पारीत करण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ०२-०९-२००६ रोजीच्या प्रथम अर्जाची प्रत प्राप्त करुन घेवून त्यामध्ये अपिलार्थीने विचारलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी.

औरंगाबाद. ( वि. बा. बोरगे )
दिनांक २७-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री.सिद्दीकी फसियोदीन, सहसंपादक, सा.लातूर दर्पण, झिनत हाऊसींग सोसायटी, ईस्माइल शाळेसमोर, लातूर, ता.जि. लातूर- ४१३५३१.

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र-राज्य, पुणे- ४११००१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र-राज्य, पुणे- ४११००१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८४

निर्णय दिनांक २७-११-२००७

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, : अपिलार्थी

सचिव, जगजीवनराम को. ऑप. हौसिंग

सोसायटी, पद्मपूरा, ५-११-२०, पद्मपूरा,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,

औरंगाबाद, जिल्हाधिकारी कार्यालय, तळ

मजला, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी,

जालना रोड, कॅनरा बॅकेंचे वर, सेव्हन हिल

जवळ, उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी रावसाहेब उदाजी राठोड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी श्री. सदानंद गोविंदराव पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९५८ ते ०३-०७-२००६ पर्यंतच्या

कालावधीतील औरंगाबाद शहरातील पद्मपूरा येथील सर्व्हे क्रमांक ३ च्या जमिनीसंदर्भात खालील प्रमाणे एकूण ३ मुद्दयावर माहिती मागविली होती.

" चर्मकार समाजास जमीन संपादन करण्यात अन्याय.

१. नंबर जी. बी. डब्ल्यू. ३. १- एआर-२३/२९१/५७, दिनांक १७-०७-१९५८ पदमपूरा औरंगाबाद सर्वे नंबर. ३ ची ३ ए. १९ गुंठे जागा कोणाच्या पुनर्वसनाकरिता का व कोणत्या उद्देशाकरिता कोणी जागा संपादन केली. त्या जागेचे काय केले ?

अ) चर्मकारांनी किती वर्ष संर्घष केल्यानंतर कोणत्या आदेशान्वये सदरची जागा त्यांचेकरिता संपादन करण्याचे केव्हा आदेश दिले. जागा केव्हा संपादन केली क्षेत्र किती व ती जागा चर्मकारांच्या पुनर्वसनाकरिता संपादन करुनही चर्मकारांना का देण्यात आली नाही ? कारणे काय ? व सदरची जागा दुस-या कोणत्या उद्देशाकरिता का वापरली ? कारण काय ?

ब) ज्या उद्देशाने जागा संपादन केली त्या उद्देशाकरिता उपयोग न करता दुस-याच उद्देशाकरिता वापरणे कायद्याच्या कोणत्या नियमान्वये असे करण्यात आले ? हे नियम बाह्य असल्यास त्यास जबाबदार कोण आहे ?

क) पदमपूरा सर्वे नं. ३ ची ३ ए. १९ गुं. जागेच्या मोबदल्यात चर्मकार समाजाला कोठे, कोणती, क्षेत्र किती व केव्हा जागा संपादन करुन देण्यात आली.

२. नंबर एलएक्यू.ए.आर.१/६३, दिनांक २१-०२-१९६८ पदमपूरा सर्वे नं. २ ची किती जागा संपादन कोणाकरिता करण्याचे काय कारण घडले होते ?

अ) १९५८ मध्ये पदमपूरा औरंगाबादची ३ ए. १९ गुंठे जागा समाजकल्याण विभागाने स्वतः करिताच ठेऊन घेऊन त्या जागेच्या मोबदल्यात किती वर्षाने कोणत्या वर्षी कोणती जागा किती क्षेत्र जागा देण्यात आली व ३ ए. १९ गुंठे जागेपैकी मोबदल्याची किती जागा देणे बाकी राहिली आहे ? समाजकल्याण विभागाकडे १९५८ पासून मोबदल्याची ५२ आर बाकी असलेली जागेसंबंधी समाजकल्याण विभागाने काय निर्णय घेतले ?

३.	निवाडा क्र. वि.भू.सं.अ./वि.घ./औ/भूसं/७/८७ औरंगाबाद दिनांक २५-०६-२००३ अनुसार केसरसिंगपूरा सर्वे नं. १२, सी. टी. एस. २०१५५ पैकी ५२ आर जमीन संपादनाची कार्यवाहीचे समाजकल्याण विभागानेच प्रस्ताव सादर करुन त्या जागेचा निवाडा मंजूर झाला असून या जागेच्या संदर्भात उच्च न्यायालयाचे स्थगन आदेश उठले असूनही जमिनीची रक्कम भरुन जमिनीचा ताबा संबंधीत संस्थेस देण्यास विलंब का करण्यात येत आहे ? व या जमिनीचे पैसे केव्हा भरण्यात येतील ?

अ)	समाजकल्याण विभागाने १९५८ ला चर्मकार समाजाच्या खास पुनर्वसनाकरिता जागा संपादन करुन चर्मकांराना दिलीच नाही त्या उद्देशाची पूर्ती केलीच नाही ती ३ ए. १९ गुंठे जागा समाजकल्याण विभागाने स्वतःच ठेऊन घेतली त्या जागेच्या मोबदल्याची अजून बाकी राहिलेली ५२ आर जागा अद्याप संस्थेस का दिलेली नाही हा अन्याय समाजकल्याण का करीत आहे ? दिवसेन दिवस मटेरिल कॉस्ट वाढत आहे यास जबाबदार कोण ? ही विसंगती व त्रास देणे का ? कशासाठी ? या मागे जातियतेची भावना तर नाही ? या नुकसानीस कोण जबाबदार आहे ? या नुकसानभरपाईपोटी किती रक्कम जास्तीची देवून चर्मकारांचे पूनर्वसन केव्हा करण्यात येणार आहे ? माहिति द्यावी वेळोवेळी झालेले आदेश प्रति देण्यात याव्या.”

अपिलार्थीने सदर माहिति नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २५-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या ३ मुद्दयावरील खुलासा केला. सदर पत्र अपिलार्थीस त्याच दिवशी प्राप्त झाले असे अपिलार्थीने आज सुनावणीमध्ये कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर, जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५-०९-२००६ रोजी सुनावणी घेऊन, आपला अंतीम आदेश दिनांक २१-०९-२००६ रोजी पारीत केला. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता असे दिसून येईल की, या प्रकरणातील सर्व मुद्दयांचा परामर्श जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांच्या पारीत केलेल्या आदेशात घेतला असून जन माहिती अधिकारी व अपिलार्थीस त्यांनी वेगवेगळ्या सूचना केल्या आहेत. या सुचनांचे अनुपालन केल्यास अपिलार्थीचे मूळ काम होऊ शकेल. सदर अपील निर्णयामध्ये, जन अपिलीय अधिकारी यांनी परिच्छेद ९ मध्ये असे म्हटले आहे की, सदर अपील अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्या संमतीने निकाली काढण्यात येत आहे, याची आयोग विशेष करुन नोंद घेत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी यांच्यातर्फे अशी माहिती देण्यात आली की, औरंगाबाद शहरामध्ये पद्‌मपूरा या प्रभागातील सर्व्हे नंबर ३ मध्ये प्रथमतः ३ एकर १९ गुंठे इतकी जागा समाजकल्याण विभागाने चर्मकार समाजाच्या पुनर्वसनाकरिता १९५७ साली ताब्यात घेतली होती. तथापि समाजकल्याण विभागाने सदर जागा मागासवर्गीय चर्मकार समाजासाठीच्या संबंधीत गृहनिर्माण संस्थेला हस्तांतरीत न करता ती खात्याकडे तशीच ठेऊन दिली व कालांतराने, सन १९५८-६० या कालावधीमध्ये या जमिनीवर मागावसर्गीय मुलांच्या २ वसतीगृहाचे बांधकाम करण्यात आले. या बांधकामामध्ये सर्व्हे नंबर ३ मधील जागा उपयोगात

आणली गेल्याने, समाजकल्याण विभागाने मागासवर्गीय चर्मकार गृहनिर्माण संस्थेकरिता लगतच्या सर्व्हे नंबर २ मधील २ एकर ७ गुंठे इतकी जागा दिनांक २४-०३-६५ रोजी चर्मकार सहकारी संस्थेच्या ताब्यात दिली. सदर जागा या संस्थेच्या तत्कालीन सचिवाने ताब्यात घेतली. एकूण ३ एकर ७ गुंठ्यापैकी २ एकर ७ गुंठे जमीन संस्थेस प्राप्त झाली आहे व उर्वरीत १ एकर १२ गुंठे इतक्या सर्वे नं. १२ मधील क्षेत्राच्या भूसंपादनाचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाने तयार करुन, सदर जमीन भूसंपादन कायद्याखाली संपादित करण्याची प्रक्रिया समाजकल्याण विभागाकडे चालू असून, सध्या ही प्रक्रिया निवाडा स्तरावर आहे. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, या सर्व्हे नंबर १२ मधील या क्षेत्रासंदर्भातील आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे, मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थीने उपस्थित केलेल्या तिन्ही मुद्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे कारणे विचारली आहेत. त्यांनी ही माहिती विचारतांना, जागेचे काय केले ? सदरची जागा दुस-या कोणत्या उद्‌देशाकरिता का वापरली आहे ? सदर जागा का देण्यात आली नाही ? कारणे काय ? कोणत्या नियमान्वये असे करण्यात आले ? जमिनीचे पैसे केव्हा भरण्यात येतील ? यामध्ये जातीयतेची भावना तर नाही ? नुकसानीस कोण जबाबदार आहेत ? पुनर्वसन केव्हा करण्यात येणार आहे ? अशा प्रकारची खुलासे अपेक्षित असलेली माहिती मागितल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २ (च) मध्ये माहिती या शब्दाची व्याख्या खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात आली आहे.

**<u>कलम २ (च)</u>**

**‘‘माहिती’’ याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दिपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही**

**इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो.**

अपिलार्थीने मागितलेली माहिती वरील प्रवर्गात मोडत नसल्याचे दिसून येते. तद्वतच, अपिलार्थी ही जागा प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्नशील असून त्यांनी विभागीय समाजकल्याण अधिकारी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, यांच्याकडे वेळोवेळी अर्ज करुन यासंबंधातील खात्याकडे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करुन घेतली आहे. तथापि, या प्रकरणी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती व या प्रकरणातील विविध घडामोडीची कारणे अथवा या विषयाचे खात्याचे नियोजन हे जाणण्यासाठी त्यांनी विभागाची संबंधीत नस्ती पाहण्या करिता वेगळा अर्ज करणे इष्ट राहिल असे आयोगाचे मत आहे. तद्वतच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांचा अशा प्रकारचा अर्ज आल्यानंतर आपल्याकडील या विषयावरील सर्व नस्त्या अपिलार्थीस प्राधान्याने उपलब्ध करुन देणे ही त्यांच्या, हे प्रकरण मार्गी लावण्याच्या दृष्टीने इष्ट राहील असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीस सर्व्हे नंबर १२ मधील नवीन संपादन करण्यात येत असलेली १ एकर १२ गुंठे जागा मिळण्यामध्ये स्वारस्य आहे. तथापि त्यांच्या संस्थाकडे असलेल्या सर्व्हे नंबर २ मधील पहिल्या जागेबाबत चर्मकार समाजाच्या संबंधीत संस्थेने कोणतीही कारवाई न केल्यामुळे व परिणामी या क्षेत्रातील काही जागा अतिक्रमणाने बाधीत झाल्याने सर्व्हे नंबर १२ मधील १ एकर १२ गुंठे ही जागा मिळवून देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे साशंक आहेत. तेव्हा, या प्रकरणातील गुंता सचिव (समाजकल्याण) यांनी प्राधान्याने सोडवावा असेही त्यांना या प्रकरणी सुचविण्यात येत आहे. जेणेकरुन अपिलार्थीच्या जागेचा प्रश्न सुटू शकेल.

अपिलार्थीने उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांचा परामर्श जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील निर्णयामध्ये घेतला आहे. या निर्णयामध्ये वर उल्लेख केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या संमतीने निर्णय घेतल्याचे म्हटले आहे. तथापि तदनंतर अपिलार्थीने परत आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले. अपिलार्थीच्या या विसंगत प्रकारच्या कृतीची नोंद आयोग घेत आहे. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळविण्याच्या दृष्टीने समाजकल्याण विभागाच्या संबंधीत विभागाने त्यांना सहाय्य करुन आवश्यक ती माहिती नस्ती तपासणीव्दारे उपलब्ध करुन दिल्यास त्यांचा प्रश्न सुटू शकेल असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात या प्रकरणाशी संबंधीत नस्त्या पाहणीची मागणी केल्यास, त्यांनी, या प्रकरणाशी संबंधीत सर्व नस्त्या अपिलार्थीस पाहण्यासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, सचिव, जगजीवनराम को. ऑप. हौसिंग सोसायटी, पद्मपूरा, ५-११-२०, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, औरंगाबाद, जिल्हाधिकारी कार्यालय, तळ मजला, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, जालना रोड, कॅनरा बॅकेंचे वर, सेव्हन हिल जवळ, उड्डाण पूलाजवळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८५

निर्णय दिनांक २७-११-२००७

१ श्री. अंशूल नरेंद्रकुमार आसड, : अपिलार्थी

आसड भवन, नलगल्ली,

जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,

न्यास कार्यालय, जालना,

जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, जालना

जन अपिलीय अधिकारी : सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जालना

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अंशूल नरेंद्रकुमार आसड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी सहाय्यक जन माहिती अधिकारी श्री. रमेश जगन्नाथ मेश्राम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. व. स्था. जैन श्रावक संघ, जालना तर्फे जालना येथील रिंगरोड सर्व्हे नंबर ५५८ व पूर्ण झालेल्या बांधकाम संदर्भात काही माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“१. मंठा रिंगरोड पर चल रहे बांधकाम की जगह की रजिस्ट्री (खरेदीखत) कि प्रति मिळणेबाबत,

२. जो बांधकाम चल रहा है उसके नगर परिषद जालना कि बांधकाम की प्रति मिळणेबाबत,

३. उस जगह के एन. ए. ऑर्डर / पी. आर. कॉर्ड / मोजणी नकाशा (टी.आय.एल.आर.) की प्रति मिळणेबाबत,

४. किस ट्रस्ट के मिटींग मे बांधकामसंबंधी ठराव पास किया गया उसकी प्रत एवं किस जनरल मिटींग मे बांधकाम को मंजुरी दि गयी उसकी ठराव की प्रत,

५. किस बजेट मे मंजुरी ली गयी एवं उसकी मालूमात जानकारी मिळणेबाबत,

६. आज तक उपरोक्त बांधकाम पर किया गया हुआ बांधकाम पर खर्चे का संपूर्ण विवरण कि लिखीत रुप मे जानकारी मिळणे बाबत,

श्री. व. स्था. जैन श्रावक संघ, जालना व्दारा लिये गये उपरोक्त माहिती मिळणेबाबत (मंठा रिंगरोड सर्व्हे नं. ५५८ पर हो चूके बांधकाम संबंधी माहिती मिळणेबाबत).”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये, जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीने सदर अपील सह धर्मादाय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे केल्याचे दिसून येते. तथापि या प्रकरणी सह धर्मादाय आयुक्त यांनी ते जन अपिलीय अधिकारी नसल्याने, अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या खात्यातील औरंगाबादस्थित कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविल्याचे दिसते. या कार्यालयाकडून अपिलार्थीचा हा अर्ज सहाय्यक

धर्मादाय आयुक्त जालना, जे या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे दिनांक ०६-११-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांनी, या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. या प्रकरणी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीपेक्षा जास्त कालावधीनंतर प्रथम अपील केल्याची नोंद घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या अपिलावर निर्णय न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांचे वडिलाचे मालकीच्या जागेवर श्री. व. स्था. जैन श्रावक संघ, जालना या संस्थेने विना परवानगी बांधकाम केले आहे. सदर बांधकाम विना परवानगी असल्यामुळे ते अनाधिकृत ठरत आहे. या बांधकामासंदर्भात न्यायालयात प्रकरण चालू असून, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित वेळेत माहिती दिली असती तर त्या माहितीचा उपयोग त्यांना या दाव्यासाठी करता आला असता. परंतु आता ही माहिती देऊन काही उपयोग नाही तरीही संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर आयोगाने दंडात्मक कारवाई करावी.

सुनावणीच्या वेळी सहाय्यक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. त्यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०६-०३-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी, संबंधीत संस्थेच्या तपासणीबाबत त्यांच्याकडील दिनांक ०९-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये नोटीस काढली. जन माहिती अधिकारी यांनी काढलेल्या

या दिनांक ०९-११-२००६ रोजीच्या पत्राची पाहणी केली असता, त्यामध्ये अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००६ च्या प्रथम अर्जाचा काहीही उल्लेख नाही. परंतु सदर संस्थेसंदर्भात सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयामध्ये प्राप्त झालेल्या दिनांक ०४-०१-२००६ रोजीच्या तक्रारीचा उल्लेख आहे. सदर संस्थेची संबंधीत निरीक्षकाने तपासणी केल्यानंतर या संस्थेने दिनांक ०७-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे तपासणीचा अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयास सादर केला. सदर माहिती संस्थेने अपिलार्थीस दिली असे सहाय्यक जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. तथापि तसा पुरावा ते आज सुनावणी मध्ये आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यांनी पुढे आयोगासमोर असे कबूल केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आता संबंधीत संस्थेकडून प्राप्त झाली असून ती संपूर्ण माहिती ते अपिलार्थीस ७ दिवसाचे आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व उपस्थिताने केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, धर्मादाय आयुक्त कार्यालयाची, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ त्यांच्या कार्यालयास लागू नाही अशी धारणा झाल्याचे दिसून येते. अपिलार्थीने दिनांक ०६-०३-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यानंतर, सर्वसाधारण परिस्थितीत अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०५-०४-२००६ रोजी, अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित होते. तथापि या अपिलार्थीच्या माहिती संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीशी त्यांच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी कोणताही पत्रव्यवहार केल्याचेही आयोगास आढळून येत नाही. शेवटी कंटाळून अपिलार्थीने सुमारे ८ महिन्याने सह धर्मादाय आयुक्त यांच्याकडे अपील केले. सह धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाने देखील अपिलार्थीने मागितलेली माहिती कोणत्या जिल्ह्यासंदर्भात आहे,

कोणत्या जिल्ह्याची आहे याची कोणतीही शहानिशा न करता त्यांनी, त्यांच्या औरंगाबाद येथील कार्यालयाकडेच अपिलार्थीचा अपील अर्ज पाठवून दिला. त्यांनी हा अर्ज कोठे पाठविला हे संबंधीत कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे सांगता येत नाही. तथापि औरंगाबादच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाने अपिलार्थीचे अपील या प्रकरणाशी संबंधीत असलेले जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे शेवटी दिनांक ०६-११-२००६ रोजी पाठविले आहे. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत न देऊन त्यांचे अपरिमित नुकसान, जन माहिती अधिकारी यांनी केवळ त्यांच्या अशा प्रकारच्या बेजबाबदार कार्यशैलीमुळे केले आहे अशी आयोगाची आता खात्री पटली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा व दक्षतेचा अभाव या प्रकरणी सिध्द केला असल्यामुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत. तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव, (विधी व न्याय) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा व याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी एकूणच, धर्मादाय आयुक्त कार्यालयातील संबधीत कर्मचा-यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीविषयी कोणतेही सोयर-सुतक नसल्याचे आपल्या वरील प्रकारच्या कृतीने दर्शविले आहे. त्यामुळे एक तर त्यांना अधिनियमातील तरतुदीचे पुरेसे ज्ञान नसावे किंवा, ते सर्वसामान्य नागरिकांना माहिती मिळविण्यापासून हेतु:पुरस्सर वंचित ठेवत असावेत असे दोन पर्याय दिसतात. तेव्हा या वस्तुस्थितीचा सकारात्मक विचार करण्याच्या दृष्टीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात या कायद्याचे महत्व त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्याकडे त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता वेळोवेळी प्रशिक्षण शिबीरे / कार्यशाळा, आयोजित कराव्यात असे त्यांना या प्रसंगी सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती यांना हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील दर्शविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव, (विधी व न्याय) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत सादर करावा.

४. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीच्या अंमलबजावणी संदर्भात या कायद्याचे महत्व कर्मचारी / अधिकारी यांच्या मनावर बिंबविण्यासाठी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी त्यांच्याकडे त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता वेळोवेळी प्रशिक्षण शिबीरे / कार्यशाळा, आयोजित कराव्यात.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अंशूल नरेंद्रकुमार आसड, आसड भवन, नलगल्ली, जालना

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई, डॉ. ॲनी बेझेंट रोड, वरळी नाका, मुंबई – १८ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (विधी व न्याय विभाग), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८८

निर्णय दिनांक २७-११-२००७

१ श्री. खांडेभराड मैनाजी रखमाजी, : अपिलार्थी
मु. कुंभेफळ (सिंदखेड), पो. वाघुळ (ज),
तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, रंगनाथराव पाटील
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
जामवाडी, तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव भागिरथी प्रतिष्ठाण (ट्रस्ट)
जामवाडी व्दारा संचलित, रंगनाथराव पाटील
माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,
जामवाडी तालुका जिल्हा जालना

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २७-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. खांडेभराड मैनाजी रखमाजी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रंगनाथराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय श्री. अनिल नारायणराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव भागिरथी प्रतिष्ठाण (ट्रस्ट) श्री. अर्जूनराव पांडुरंग वाढेकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक २०-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेतील शिक्षकांची पदे कशा पध्दतीने भरली गेली आहे याबाबत खालील प्रमाणे एकूण ५ मुद्दयावर माहिती मागविली होती.

“१. दिनांक ०८-१२-२००४ च्या जाहिरातीनुसार विना अनुदानित तत्त्वावर कोणत्या दोन सह शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.

२. दिनांक १० जानेवारी २००५ च्या जाहिरातीनुसार विना अनुदानित तत्त्वावर बी. एस्सी. बी. एड या पात्रतेच्या कोणत्या दोन सह शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली.

३. श्री. मधुकर नागरे, श्री. देविदास जाधव व श्री. मैनाजी खांडेभराडी यांचे अप्रोल कोणत्या तारखेला देण्यात आले.

४. वर्ग ९ (क) ची विना अनुदानित तुकडी केव्हा रद्द झाली.

५. डिसेंबर २००४ ते ऑक्टोंबर २००५ दरम्यानच्या कालावधीतील कर्मचा-यांच्या उपस्थितीचे झेरॉक्स.”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०८-२००६ च्या टिपणीव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. या टिपणीमध्ये त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील ५ मुद्दयांचा परामर्श घेतल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नाही, मात्र त्यांच्याकडील टिपणी दिनांक ०८-०९-२००६ अन्वये अपिलार्थीस ४ मुद्दयावर माहिती दिल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही पध्दत चुकिची असून, त्यांनी त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दाखल झालेल्या अपील अर्जावर कारवाई करण्याकरिता, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्यावर आपला अंतीम निर्णय पारीत करणे हे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदी मध्ये अभिप्रेत आहे. तथापि या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांना, जन माहिती अधिकारी यांच्याकडून चुकिची माहिती प्राप्त झाली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती कशी चुकिची आहे याचे वर्णन त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून चुकिची माहिती प्राप्त झाली आहे. ते या शाळेमध्ये डिसेंबर २००५ मध्ये कार्यरत असतांना देखील त्यांना जी माहिती संस्थेतर्फे देण्यात आली आहे त्यामध्ये त्यांना गैरहजर दाखविण्यात आले आहे. वास्तविकतः त्यांनी या कालावधीमध्ये संबंधीत मस्टरवर सह्या केलेल्या आहेत, त्यामुळे डिसेंबर महिन्याच्या उपस्थितीचे पान संस्थेने बदलले असल्याचा त्यांचा दावा आहे. त्याच बरोबर संस्थेने त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००४ च्या जाहिरातीनुसार विना अनुदानित तत्वावर दोन जागा भरल्या असतांना त्यांना ४ जागा भरल्या असल्याची माहिती दिली. अशा प्रकारचे इतरही मुद्दे त्यांनी त्यांच्या अपील अर्जामध्ये उपस्थित केलेले आहेत. त्यामुळे त्यांना विसंगत माहिती दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी असे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी असे सांगितले की, त्यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००६ व ०८-०९-२००६ रोजी पुरविली आहे. त्यांनी मस्टरच्या प्रतीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केलेला नाही व हीच माहिती त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याविरुध्द केलेल्या न्यायालयाच्या प्रकरणामध्ये दाखल केली आहे. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे नमूद केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करत असून त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती वेळोवेळी उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थी यांचा आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करण्यामध्ये हेतू जन माहिती अधिकारी यांना त्रास देणे हाच आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, संबंधीत शाळेच्या व्यवस्थापनासंदर्भात शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना चौकशीचे आदेश

देऊन, सदर संस्थेवर प्रशासक नियुक्तीबाबतचा प्रस्ताव त्यांच्या कार्यालयास, त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ रोजीच्या पत्रान्वये सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जरी दिनांक ०७-०८-२००६ व ०८-०९-२००६ रोजी माहिती पुरविली असली तरी ती माहिती चुकिची असल्याचे अपिलार्थीचे म्हणणे आहे. संबंधीत मुख्याध्यापकाने खोटे रेकॉर्ड करणे संस्था प्रशासनात अनियमितता असणे इत्यादी सर्व बाबीसंदर्भात उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उप संचालक शिक्षण यांच्या स्तरावर कारवाई झाली असून त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २८-०५-२००७ च्या पत्राप्रमाणे या संस्थेवर प्रशासक नेमण्याचा प्रस्ताव सादर करण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जालना यांना सूचना दिली आहे. त्याचबरोबर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सदर संस्थेचे सचिव यांना, त्यांच्याकडील पत्र दिनांक २३-०३-२००७ नुसार संबंधीत मुख्याध्यापकावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत हे पाहता, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात त्यांच्यावर अगोदरच कारवाई चालू असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, मुद्दा क्रमांक १ बाबत संबंधीत संस्थेने विना अनुदानित तत्वावर २ शिक्षकांची नेमणूक करण्याकरिता जाहिरात दिली असतांना एकूण ४ शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अशी माहिती दिलेली आहे की, दिनांक १०-०१-२००५ च्या जाहिरातीनुसार त्यांनी कोणत्याही शिक्षकाची नेमणूक केली नाही. तथापि, मुद्दा क्रमांक २ च्या बाबत अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यात मतभेद आहेत तर, मुद्दा क्रमांक ३ व ४ च्या बाबत देखील अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यात मतभेद असल्याचे आयोगास दिसून आले आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या वरील प्रमाणे चारही मुद्दयावर शिक्षण उप संचालकांनी व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी निर्णय घेतला असून या निर्णयाच्या

अंमलबजावणीची प्रक्रिया प्रगतीत आहे हे पाहता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीबाबत आयोगाने कोणतेही भाष्य करणे उचित ठरणार नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००६ व ०८-०९-२००६ रोजी माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०७-०८-२००६ रोजी दिलेली माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संपूर्णपणे विसंगत आहे हे पाहता, ते माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीचा निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे. तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत संस्थेच्या सचिवांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत करुन आपला अहवाल आयोगास तदनंतर १५ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव भागिरथी प्रतिष्ठान (ट्रस्ट) जामवाडी व्दारा संचलित, रंगनाथराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामवाडी यांनी, जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत करुन तदनंतर १५ दिवसाच्या आत आपला अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २७-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. खांडेभराड मैनाजी रखमाजी, मु. कुंभेफळ (सिंदखेड), पो. वाघुळ (ज), तालुका जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, रंगनाथराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामवाडी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रा तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव भागिरथी प्रतिष्ठाण (ट्रस्ट) जामवाडी व्दारा संचलित, रंगनाथराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जामवाडी तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८७

निर्णय दिनांक - २८-११-२००७

श्री. रामराव गोपाळराव पाटील, : अपिलार्थी
कल्याणनगर, पो.अंबाजोगाई,जिल्हा-बीड.

**विरुध्द**

१ माहिती अधिकारी :
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये
विभाग, मंत्रालय, मुंबई.

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसचिव, वैद्यकीय
शिक्षण व औषधी द्रव्ये
विभाग मंत्रालय, मुंबई.

प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी : कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय,मुंबई.

प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी : उपसचिव,वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई.

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रामराव गोपाळराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई, श्री. सुनिल पांडुरंग पांढरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मंत्रालय, मुंबई, श्री.विलास किसनराव आल्हाट (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १४-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी डॉ.व्यंकटराव डावळे, वैद्यकीय प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्याकडे केलेल्या २१ महिन्याच्या कामाप्रित्यर्थ त्यांना देय असणा-या वेतना संदर्भात दिनांक- ०१-०१-२००१ ते १३-०७-२००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागविली होती.

> ‘‘ रामराव गोपाळराव पाटील यांनी १-०१-२००१ ते १-१०-२००२ पर्यंत कै.व्यंकटराव डावळे वैद्यकीय प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येत असलेल्या कर्करोग उपचार केंद्रात व्यवस्थापकीय संचालक म्हणून २१ महिने काम केले आहे. त्या कामाचे वेतन प्रतिमहा रु.१२,०००/- कार्यकारी अध्यक्ष डॉ.अरुण डावळे यांनी ठरविले होते. त्या केलेल्या कामाचे वेतन पाच वर्षे झाले तरी R.G.Patil यांना देण्यात आले नाही. शासनाने आदेश देऊन चौकशी केली आहे. त्याचा अहवाल पत्र क्र.वैमरु/ कोबाल्ट/२४०६/२००३, दि. ६-५-२००३ अन्वये सादर केला आहे. तथापि त्याबाबत शासन स्तरावर अद्याप कोणतीही आदेश देण्यात आलेले नाहीत.’’

अपिलार्थीने ही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना त्यांच्याकडील दिनांक-१७-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, ‘‘ स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई हया संस्थेतील कोबाल्ट युनिट चालविण्यासाठी कै.व्यंकटराव डावळे वैद्यकीय प्रतिष्ठान, अंबाजोगाई

हया संस्थेबरोबर शासनाने करार केला आहे. त्यानुसार सदर कोबाल्ट युनिट चालविण्यासाठी लागणा-या अधिकारी/ कर्मचा-यांच्या नियुक्त्या सदर संस्थेने करावयाच्या आहेत. शासनाकडून हे युनीट चालविण्यासाठी येणारा खर्च भागविण्यासाठी सदर संस्थेला ठोक अनुदान दिले जाते. सदर संस्थेने नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांच्या वेतन व अन्य बाबींशी शासनाचा कोणताही संबंध नाही.''

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०९-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. अपिलार्थीच्या या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०५-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. या उत्तरामध्ये त्यांनी अपिलार्थीस या प्रकरणातील सर्व बाबींचा खुलासा करुन शेवटी असे म्हटले आहे की, '' व्यवस्थापकीय संचालक '' या शासन मान्यता नसलेल्या पदावरील आपली नियुक्ती कै.डावळे प्रतिष्ठानने त्यांच्या अधिकारात केलेली असल्याने या नियुक्तीशी अथवा त्याच्या वेतनाशी शासनाचा संबंध पोहोचत नाही किंबहुना त्यांचे कोणतेही दायित्व शासनावर येत नाही.''

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची अशा प्रकारची पध्दती चुकीची असून त्यांनी या प्रकरणी अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी या दोघांना एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेवून आपला निर्णय अंतिमतः देणे हे ' अपील ठरविणे' या प्रक्रियेमध्ये अभिप्रेत आहे. त्यांनी अशा प्रकारची कोणत्याही कृतीचे पालन न करता अपिलार्थीस पत्राव्दारे उत्तर देणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये

‘अपीलावर निर्णय देणे’ या प्रक्रियेत अभिप्रेत नाही. येथून पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीव्दारे त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपीलअर्जावर जनमाहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघानाहि एकत्र बोलावून घेवून त्यांचे म्हणणे ऐकून व त्याची नोंद घेवून त्यावर आपला अंतिम निर्णय पारीत करावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली व त्याच बरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना त्यांच्याकडील दिनांक- ०५-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये अनावश्यक माहिती देवून त्यांची दिशाभूल केली आहे, असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, या प्रकरणी संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मुंबई यांनी त्यांचे थकीत पगारा संदर्भात चौकशी करुन सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांना त्यांच्याकडील दिनांक- ०६-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये एक अहवाल सादर केला आहे. त्या अहवालावर शासनाने काय कार्यवाही केली या संदर्भातील माहिती त्यांना हवी आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक- १४-०७-२००६ रोजीच्या अर्जावर त्यांनी अपिलार्थीस दिनांक- १७-०८-२००६

रोजी व तदनंतर अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०९-०९-२००६ रोजी प्रथम अपील केल्यानंतर दिनांक- ०५-१०-२००६ रोजी अपिलार्थीस पूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट करणारा अहवाल त्यांना दिलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जा प्रमाणे ज्या माहितीची मागणी केली आहे. त्यामध्ये अपिलार्थीने दिनांक- ०६-०५-२००३ च्या अर्जाचा उल्लेख केला आहे. अशा प्रकारचा कोणताही अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने त्यांनी यावर काहीही कार्यवाही केली नाही. परंतू अपिलार्थीस त्यांच्या वेतना संबंधीच्या प्रकरणाचा योग्य तो खुलासा केलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्हीहि बाजुने केलेला युक्तीवाद व वरील घटनाक्रम पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की अपिलार्थीचा मूळ माहिती साठीचा अर्ज पाहिला असता, अपिलार्थीस निश्चीतपणे कोणती माहिती हवी आहे, याचा बोध होत नाही. अपिलार्थीने केलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांनी दिनांक- ०६-०५-२००३ रोजी सादर केलेल्या अहवालाचा संदर्भ दिलेला आहे. तथापि अपिलार्थीना संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांनी दिनांक- ०६-०३-२००६ रोजी सादर केलेल्या अहवालाची माहिती हवी आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहिती अर्जामध्ये उल्लेखिलेल्या अर्जाची तारीख चुकीची पडल्याने व अपिलार्थीने त्यांना निश्चीत कोणती माहिती हवी आहे, याचा उल्लेख केला नसल्यामूळे, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांना अपेक्षित असलेली माहिती देता आली नाही. तथापि अपिलार्थीची मूळ तक्रार लक्षात घेवून जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रत्यक्षातील वस्तुस्थिती संदर्भात आवश्यक तो खुलासा दिनांक- १७-०८-२००६ व दिनांक ०५-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये केला आहे.

आज सुनावणीमध्ये अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप निश्चीत झाल्याने जनमाहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की,- अपिलार्थीच्या अर्जा संदर्भात संचालक, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई  यांना सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये यांना त्यांच्याकडील दिनांक- ०६-०३-२००६ रोजीच्या अहवालावर मंत्रालय स्तरावर झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील सर्व कागदपत्राच्या प्रती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवाव्यात.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी अर्धवट व दिशाभूल करणारी माहिती दिली आहे व त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी अनावश्यक माहिती दिली असल्याचे म्हटले आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अर्धवट, दिशाभूल करणारी व अनावश्यक माहिती दिली, हा अपिलार्थी यांचा दावा वर उल्लेख केलेल्या पार्श्वभूमीवरुन आयोगास मान्य करता येणार नाही. कारण मुळात अपिलार्थीने प्रथमतः केलेल्या मूळ अर्जामध्ये त्यांना हवी असलेली माहिती निश्चीत स्वरुपात मागितली नाही व त्याचबरोबर या अर्जामध्ये त्यांनी दिलेल्या पत्राचा दिनांकहि चुकीचा आहे.

वरील विवेचनाच्या  पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संचालक वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मुंबई यांच्याकडून, त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या दिनांक- ०६-०३-२००६ रोजीच्या अहवालावर जी कार्यवाही झाली आहे त्या कार्यवाहीशी

संबंधित सर्व कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यानंतर ७ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवाव्यात.

औरंगाबाद.　　　　　　　　　　　　　　　( वि. बा. बोरगे )
दिनांक　२८-११-२००७　　　　　　　　राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रामराव गोपाळराव पाटील, कल्याणनगर, अंबाजोगाई, जिल्हा-बीड, पिन-४३१५१७.

२ जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६८९

निर्णय दिनांक　२८-११-२००७

१ श्री. भाऊ शंकरराव सुरडकर,　　　　:　　अपिलार्थी

सा. सत्यधर्म, उस्मानपूरा पोस्ट ऑफिस शेजारी,

उस्मानपूरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद,

जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. भाऊ शंकरराव सुरडकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री सौ. हेमलता प्रकाश वांगीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद श्री. आण्णासाहेब शिंदे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकासाठी केलेल्या व्यवस्थापनासंदर्भात सन २००४ ते २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“ सन २००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकासाठी औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघासाठी भोजन व्यवस्था, मंडप, स्टेशनरी इत्यादी पुरविण्याबाबत निविदांची माहिती. अनुक्रमांक ३ मध्ये दर्शविलेल्या विविध कामासाठी मागविलेल्या निविदा, मंजूर निविदा,

वृत्तपत्रात दिलेल्या जाहिराती, अभिकर्त्याचे बिले, अभिकर्त्यांनी रक्कम मिळाल्याबाबतच्या दिलेल्या पावत्या, विविध कामासाठी वरिष्ठांनी दिलेली मान्यता, निविदा मंजूरी, वेळेसचा इतिवृत्तांताच्या प्रती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही, अथवा यासंदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केलेला नाही.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०९-२००६ व ०३-१०-२००६ या दिवशी सुनावणी घेतली. दिनांक २६-०९-२००६ रोजी अपिलार्थी हे गैरहजर असल्यामुळे त्यांनी ही सुनावणी दिनांक ०३-१०-२००६ रोजी घेतली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील कर्मचारी श्री. पगारे व अपिलार्थी हे दोघे हजर होते. तदनंतर सदर अपिलाची दुसरी सुनावणी दिनांक ०३-१०-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी घेऊन आपला अंतीम निर्णय त्या दिवशी पारीत केला. या अपिल निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ८ दिवसात माहिती द्यावी असे सूचित करुन अपिलार्थीचा अपील अर्ज निकाली काढला. सदर माहिती शुल्कासहीत अथवा विनाशुल्क द्यावयाची याबाबत जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या आदेशामध्ये भाष्य केलेले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी ८ दिवसात माहिती देण्याचे सूचित करुन देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे,

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-१०-२००६ रोजी त्यांना ही माहिती प्राप्त झाली नसल्याबाबत कळविले. अपिलार्थीच्या या पत्रावर जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना परत त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये आपल्या आदेशाचा पुनरुच्चार करणारी सूचना देऊन विहित मुदतीत अपिलार्थीस माहिती न दिल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देखील दिलेला आहे.

तदनंतर अपिलार्थीने उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना दिनांक ३०-१०-२००६ व १५-११-२००६ रोजी स्मरणपत्रे पाठवून संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आणले. याच बरोबर येथे असेही दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०३-०७-२००६ रोजीच्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे किती रक्कम भरावी याची देखील विचारणा केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस या पत्रासंदर्भात देखिल कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही असे अपिलार्थी यांनी आज आयोगासमोर सुनावणीमध्ये सांगितले.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन देखील जन माहिती अधिका-याने अपिलार्थीस कोणतीही माहिती न दिल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत केल्यानंतरही माहिती प्राप्त न झाल्यामुळे त्यांना प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्याची व त्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसाठी संबंधीत तहसीलदार यांच्याशी वेळोवेळी संपर्क साधूनही, त्यांना ही माहिती संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी देण्यास टाळाटाळ केली त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी व त्यांना संपूर्ण माहिती मिळावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज प्राप्त झाला त्यावेळी त्या या पदावर कार्यरत नव्हत्या व त्यांनी अपिलार्थीच्या अर्जावर सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती निवडणुकीच्या वेळी करावयाच्या व्यवस्थेसंदर्भातील आहे. व निवडणुकीचे व्यवस्थापन हे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पातळी वर केले जाते. त्यामुळे ही माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होऊ शकली नाही व याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस वर निर्देशित केलेल्या पत्राप्रमाणे कळविले आहे. त्याचबरोबर आपल्या युक्तिवादा मध्ये त्यांनी पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा त्यांनी आयोगाच्या सुनावणीची नोटीस त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर, त्यांच्या कार्यालयात शोध घेतला परंतु ही माहिती त्यांना त्यांच्या कार्यालयात आढळून आली नाही.

दोन्ही बाजुंचा युक्तिवाद, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व घटनाक्रम याचा अभ्यास केल्यास असे दिसून येईल की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १९-०५-२००६ रोजीच्या प्रथम अर्जान्वये मागणी केलेली माहिती सर्वसामान्य परिस्थितीमध्ये त्यांना दिनांक १८-०६-२००६ रोजी, अगर तत्पूर्वी मिळणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपेक्षित होते. तथापि या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुळात जो प्रथम प्रतिसाद दिला आहे तो दिनांक २१-११-२००६ रोजी म्हणजेच अंदाजे ६

महिने इतक्या विलंबाने. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधीत माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध असल्याबाबत कळविले आहे. जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने अर्ज करतेवेळी माहिती उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत याप्रमाणे अपिलार्थीस कळविणे त्यांना सहज शक्य होते. जी माहिती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही अशी माहिती नागरिकांनी विचारल्यानंतर कोणती कारवाई करावयाची याचे मार्गदर्शन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (I) मध्ये केलेले आहे. त्याप्रमाणे संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा हा अर्ज, या प्रकरणी, जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कार्यालयातील जन माहिती अधिका-यास, त्यांच्या कडे प्राप्त झाल्यापासून ५ दिवसाच्या आत पाठविणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये अभिप्रेत आहे. तथापि अशा प्रकारची कोणतीही कृती त्यांनी केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६ (३) (I) चा निःसंशयपणे भंग करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीमुळे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देऊन सिध्द केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत केल्यानंतर १५ दिवसाच्या आत करावा. त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न

झाल्यास त्यांना या प्रकरणी संधी देऊनही काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन हे आदेश कायम केले जातील. त्याचबरोबर त्यांनी आपल्या कार्यशैलीतील उपरोक्त, वर्णन केल्याप्रमाणे दाखविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास ३ महिन्याच्या आत सादर करावा.

अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालय हे एकाच प्राधिकरणाचे वेगवेगळे भाग असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व आपला अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व आपला अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत पाठवावा.

३. जन माहिती अधिकारी यांनी आपल्या कार्यशैलीतील दाखविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, सचिव, (महसूल) यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अहवाल आयोगास, ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भाऊ शंकरराव सुरडकर, सा. सत्यधर्म, उस्मानपूरा पोस्ट ऑफिस शेजारी, उस्मानपूरा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ श्री. तुपे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद (सध्या रा. तळेगाव, तालुका भोकरदन, जिल्हा जालना) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (मार्फत – उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद)

५ सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९०

निर्णय दिनांक २८-११-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, (नवीन इमारत), देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, (नवीन इमारत), देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी) (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सहसंचालक (उच्च शिक्षण) श्री. अर्जून धोंडीराम पाटील (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सह संचालक (उच्च शिक्षण) यांचे प्रतिनिधी श्री. अर्जून धोंडीराम पाटील हे हजर आहेत.

सुनावणी सुरु होतांना अपिलार्थी यांनी, राज्य माहिती आयोग यांच्याकडे त्यांचे दिनांक २८-११-२००७ चे एक पत्र सादर करुन, त्यामध्ये त्यांनी आज विचाराधीन असलेल्या, त्यांच्या दिनांक ०७-०९-२००६ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली माहिती त्यांना सहसंचालक (उच्चशिक्षण), औरंगाबाद यांच्याकडून दिनांक २७-११-२००७ रोजी मिळाल्याने, त्यांनी आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेण्याची या पत्रामध्ये आयोगास, विनंती केलेली आहे.

अपिलार्थी यांची सदर विनंती, आयोग मान्य करत आहे व अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले त्यांचे व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

प्रसंगवशात येथे असे दिसून येते की, अपिलार्थीने दिनांक ०७-०९-२००६ रोजी माहितीची मागणी केली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २७-११-२००७ रोजी माहिती दिल्याचे, अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे. सदर विलंबाबाबत जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक ०७-०९-२००६ रोजी मागितलेली माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिली होती. तथापि सदर पत्र अपिलार्थीस मिळाले नसल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत या पत्राव्दारे प्रतिसाद दिला. तथापि सदर पत्र अपिलार्थी यांच्याकडे पोहोचले नसल्याने, अपिलार्थीस राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करावे लागले, असे एकंदरीत आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाईबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, (नवीन इमारत), देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्च शिक्षण), औरंगाबाद विभाग, (नवीन इमारत), देवगिरी महाविद्यालया जवळ, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९१

निर्णय दिनांक २८-११-२००७

| | | |
|---|---|---|
| १ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर,<br>व्दारा - बुद्धुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर,<br>परळी वैजनाथ, तालुका परळी,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा माहिती अधिकारी, कै. लक्ष्मीबाई देशमुख<br>महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला<br>महाविद्यालय, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, कै.

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, विद्या व्यंकटराव देशपांडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, रेखा परळीकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक २६-०८-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयासंदर्भात, महाविद्यालय स्थापनेपासून ते दिनांक २६-०८-२००६ पर्यतच्या कालावधीतील काही माहिती मागविली होती.

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०९-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणारे शुल्क रुपये १०० त्यांचे कार्यालयात जमा करण्याची सूचना दिली. तथापि अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जमा न करता, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालयास मिळाली नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्या कडील आवक जावक रजिस्टर आयोगासमोर दाखविले. यावरुन त्यांना सदर अपील अर्ज प्राप्त झालेला नसल्याचे अनुमान काढता येते. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर अपील अर्ज त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठविला असून त्याची पोहोच त्यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थी यांनी दाखविलेल्या पोहोच पावती

वर संबंधीत महाविद्यालयाच्या प्रतिनिधीची सही नाही असे जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी जाणुन-बुजून माहिती पासून वंचित ठेवले व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी एकदाही सुनावणी घेतली नाही असे म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आवश्यकता आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादामध्ये त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरले नसल्यामुळे, त्यांना अपिलार्थीस माहिती देता आली नाही. अपिलार्थीने या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्यास ही माहिती देण्यास ते तयार आहेत. तर जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा खुलासा करण्यात आला की, अपिलार्थीचे दिनांक ०४-१०-२००६ रोजीचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयात मुळात प्राप्त झाले नसल्यामुळे, त्यांना या अपिलाची सुनावणी घेता आली नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय घेणे अनिवार्य आहे असे आयोगाचे मत आहे. अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय त्यांना मान्य नसेल तर ते राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये व्दितीय अपील करु शकतील.

सबब, खालील प्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे :

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत झाल्यावर १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०४-१०-२००६ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारीत करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २८-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर, व्दारा - बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला

महाविद्यालय, परळी वैजनाथ, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९६

निर्णय दिनांक - २८-११-२००७

श्री.बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, : अपिलार्थी
सेवानिवृत्त अधिकारी, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड, व्दारा- राहणार गंगाधाम गवळीपूरा, घर नं.३-२-२५२, नांदेड.

**विरुध्द**

१ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका नांदेड. :

२ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगर रचना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड. : प्रतिवादी

प्रत्यक्षतः जनमाहिती सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय

| | |
|---|---|
| अधिकारी | क्रमांक-४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड. |
| प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी | सहाय्यक संचालक, नगर रचना नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका नांदेड |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २८-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय क्रमांक-४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड, श्री.प्रकाश माधवराव येवले (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगर रचना, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड, श्री.बबन निवृत्ति बनकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०६-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-०४-२००४ ते ३१-०५-२००६ या कालावधीमध्ये श्री. नरेंद्रसिंग परिमलसिंग बुंगई राहणार बडपूरा,नांदेड यांनी सर्वे नं. ८६,८७,९३ मौजे नांदेड येथील प्लॉटवर केलेल्या बांधकामा संदर्भात एकूण ३ मुद्यावर खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

''१. सदरील अनधिकृत बांधकाम रोखण्यास आपणाकडून महाराष्ट्र नगर रचना अधिनियम १९६६ प्रमाणे श्री.बुंगई किंवा त्यांचे कुटूंबियावर कलम ५१ प्रमाणे काय कार्यवाही केली किंवा त्यांना तशी नोटीस दिली काय ?

२. त्याच प्रमाणे सदरील कायद्याचे उल्लंघन करुन बांधकाम चालूच ठेवलेले असल्यामुळे सदरी कायद्याचे कलम ५२,५३ खाली अथवा ५४ खाली त्यांना आपल्या किंवा संबंधीता कडून श्री.बुंगई किंवा त्यांच्या कुंटूबियांना नोटीस बजावले काय?

३ श्री.बुंगई यांनी बांधकाम परवानगीसाठी अर्ज दाखल केल्यास संचीकेची पहाणी करण्यास परवानगी देण्यात यावी.

अपिलार्थीनें ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. श्री.बुंगई हे करीत असलेले अनधिकृत बांधकामा संदर्भात त्यांना महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलमातील तरतूदीनूसार कलम ५३ (१) व ५४ नुसार नोटीस निर्गमीत केल्याचे अपिलार्थीस कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या या पत्राचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्याकडून महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ मध्ये कलम ५१ प्रमाणे काय कार्यवाही केली, याची विचारणा केली होती. तथापि त्याचे उत्तर जनमाहिती अधिकारी यांनी दिल्याचे दिसून येत नाही व त्याचबरोबर अपिलार्थीने श्री. बुंगई यांचे बांधकाम परवानगी संदर्भात नस्तीची पाहणी करण्याची जी परवानगी मागितली होती, या परवानगी संदर्भात जनमाहिती अधिकारी यांचे या उत्तरामध्ये कोणताही उल्लेख नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये त्यांनी दिनांक १०-०७-२००६ रोजी मूळ अर्ज केल्याचे म्हटले आहे. तथापि आयोगाकडे दाखल केलेल्या त्यांच्या प्रथम अर्जावर त्यांनी दिनांक- ०६-०७-२००६ असा उल्लेख केला आहे. या दोन्हीहि तारखांच्या विसंगती बाबत अपिलार्थी यांना विचारले असता त्यांनी दिनांक- ०६-०७-२००६ ही तारीख चुकीची पडली असून सदर अर्ज दिनांक- १०-०७-२००६ रोजी केला आहे, असे समजावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

सदर अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २९-०८-२००६ व दिनांक-०२-०९-२००६ रोजी सुनावणी घेवून या संदर्भातील आपले अंतिम आदेश दिनांक- २०-०९-२००६ रोजी पारीत केले आहेत. या आदेशामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली असल्याने त्यांचे अपील फेटाळले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी केलेल्या मूळ माहितीची मागणी आजही कायम आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे जनअपिलीय अधिकारी यांच्या दिनांक- २५-०८-२००६ रोजीच्या अपीलाच्या निर्णया विरुध्द व्दितीय अपील सादर केले आहे, येथे असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक- १०-०७-२००६ रोजीच्या अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २०-०९-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थीने या ठिकाणी व्दितीय अपील अर्जामध्ये एक म्हणणे मांडून त्या सोबत सादर केलेली कागदपत्रे ही त्यांच्या दुस-या अर्जा संदर्भातील आहेत. अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील जनअपिलीय

अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक- २५-०८-२००६ रोजीच्या दुस-या प्रकरणातील आदेशा संदर्भातील आहे, येथे असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील करतांना मूळअर्ज, प्रथम अपील अर्ज व त्यावरील निर्णय हे चुकीचे दाखल केले असल्याने त्यावर आयोगास निर्णय देता येणार नाही. सबब असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांना आयोगाकडे जनअपिलीय अधिकारी यांच्या ज्या निर्णया विरुध्द त्यांना व्दितीय अपील करावयाचे आहे, त्या निर्णयाशी संबंधित प्रथम माहितीचा अर्ज व जनअपिलीय अधिकारी यांचा त्या अर्जावरील निर्णय, अशी सर्व कागदपत्रे एकत्र करुन आयोगाकडे नव्याने व्दितीय अपील दाखल करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

३. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद. ( वि. बा. बोरगे )
दिनांक २८-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद
प्रत,

१ श्री.बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, सेवानिवृत्त अधिकारी, नांदेड वाघाळा महानगर पालिका, नांदेड व्दारा- राहणाार गंगाधाम गवळीपूरा, घर नं ३-२-२५२, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त क्षेत्रीय कार्यालय, क्रमांक-४, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक संचालक,नगर रचना विभाग, नांदेड

वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९२

निर्णय दिनांक २९-११-२००७

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), : अपिलार्थी
बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी
वैजनाथ, तालुका परळी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब
आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा संचालक, बी. सी. यु. डी.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी) व जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ श्री. मंझा इश्वरसिंग रायभान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीस अपिलार्थी यांनी, राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेले त्यांचे दिनांक २६-१२-२००६ रोजीचे, त्यांनी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मागे घेण्यास मान्यता देण्यासंदर्भात आयोगास विनंती केली आहे.

अपिलार्थीची सदर विनंती आयोग मान्य करत असून अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे दिनांक २६-१२-२००६ रोजीचे (आयोगाच्या मुंबई कार्यालयास दिनांक १५-०१-२००७ अशी नोंद असलेले ) अपील खारीज करण्यात येत आहे.

प्रसंगावशात येथे असे दिसून येते की, अपिलार्थीस या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती देवूनही, अपिलार्थीने माहिती अधिका--याने माहिती दिली नाही, अपिलीय अधिका-याने जाणुन-बुजून माहिती मिळण्यापासूच वंचित ठेवले व कायद्याची क्रूर चेष्टा केली असे नमूद केले आहे. तथापि अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा मध्ये, अशा प्रकारची कोणतीही बाब अथवा कारण आढळले नाही. अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांना प्रश्नार्थक स्वरुपात व खुलासेवजा माहिती विचारली आहे. अपिलार्थीच्या माहितीचे

सर्वसाधारण स्वरुप पाहता अपिलार्थीकडे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता पुरेसे गांभीर्य नसावे असे दिसून येते. त्यांनी विचारलेली माहिती उदा. कालावधी २ ओळीत का दर्शविला? कालावधी ३ ओळीत का दर्शविला ? एक माहिती विद्यापीठाच्या लेटरपॅडवर तर एक माहिती को-या कागदावर दिली असे का ? अशा प्रकारची माहिती विचारुन अपिलार्थीनेच, उलट माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची चेष्टा केली आहे असे आयोगाचे मत झाले आहे. तेव्हा अपिलार्थीने यापुढे जन माहिती अधिका-यास माहिती विचारतांना थोडा विवेक बाळगावा असे त्यांना आयोगातर्फे सुचविण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), बुद्बुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९४

निर्णय दिनांक २९-११-२००७

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), : अपिलार्थी

बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी

वैजनाथ, तालुका परळी,

जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब

आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा संचालक, बी. सी. यु. डी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी) व जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे गैरहजर आहेत. तर जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ श्री. मंझा इश्वरसिंग रायभान (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे पी. एच. डी. संदर्भात एकूण ७ मुद्दयावर वेगवेगळ्या प्रकारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः / अधिकारपत्रानुसार मागविली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नसल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे व तसे अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या दिनांक ३१-१०-२००६ रोजीच्या प्रथम अर्जावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१०-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतली नसल्याचे दिसून येते.

सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये ६१ इतके जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १०-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये

भरण्यासंदर्भात सूचना दिली होती, ते शुल्क देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

जन माहिती अधिकारी हे आजच्या सुनावणीस अर्धा तास उशिरा आल्याने त्यांनी जी माहिती आयोगासमोर सादर केली आहे त्याचा यापुढे समावेश करण्यात आला आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. तथापि, त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जी विधाने केली आहेत त्यावर विचार करुन पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

आजच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या ५ पैकी ४ मुद्दयावर माहिती पुरविली आहे. ५ व्या मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस व्यक्तिशः देऊ केली आहे कारण अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली आहे. याचबरोबर त्यांनी अपिलार्थीचे आयोगाकडे दाखल केलेले व्दितीय अपील मागे घेण्याचा विनंती अर्ज आयोगास सुनावणीच्या वेळी सादर केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १६-१०-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस समर्पक माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ बाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी जाणुन-बुजून व संगनमताने दिली नाही असे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये म्हटले आहे. तथापि या मुद्दा क्रमांक २ च्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती बरोबर आहे

असे आयोगाचे मत आहे. यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी जाणुन-बुजून संगनमताने माहिती दडविल्याचे दिसून येत नाही. याचबरोबर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक ४ संदर्भात त्रोटक व अपुरी माहिती दिल्याचे म्हटले आहे हे विधान देखील या पत्राचे अवलोकन करता वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ क्रमांक व ४ बाबत त्यांचे वरील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत. सदर अभिप्राय आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्राची पाहणी करता वस्तुस्थितीशी विसंगत आढळल्याने असल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे, आयोगास आजच्या सुनावणीमध्ये असे निवेदन करण्यात आले की, अपिलार्थी हे त्यांच्याशी संबंधीत असलेली माहिती न विचारता इतर प्रकरणाबाबत खुलासेवजा व प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती त्यांना वारंवार विचारत असतात व त्यामुळे त्यांच्या अमुल्य वेळेचा अपव्याय होत असतो. सदर माहिती व्यक्तिशः मागवून त्या कार्यालयात हजर राहत नाहीत. आयोगास देखील संबंधीत अपिलार्थीचे अशा प्रकारचे वर्तन इतर प्रकरणामध्ये आढळून आले आहे. तेव्हा अपिलार्थी यांनी यापुढे माहिती मागतांना विवेक बाळगावा अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ सौ. संध्या सखारामपंत आसेगांवकर (कुलकर्णी), बुद्रुककर निवास, शाळेमागे, विद्यानगर, परळी वैजनाथ, तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप कुलसचिव, (शैक्षणिक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९५

निर्णय दिनांक २९-११-२००७

१ श्री. अच्युतराव भिमराव जाधव, : अपिलार्थी
सह शिक्षक,
महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, पिशोर
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले
विद्यालय, पिशोर तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, शालेय समिती, महात्मा ज्योतिबा
फुले विद्यालय, पिशोर तालुका कन्नड,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अच्युतराव भिमराव जाधव, जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शालेय समिती, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-१२-२००५ व दिनांक १४-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये अनुक्रमे १९८० ते २००५ या वर्षातील त्यांच्या शाळेच्या आस्थापना विषयक बाबीसंबंधी काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये -- सेवा जेष्ठता सूची, शालेय समितीच्या दिनांक ०५-०७-२००५ रोजीच्या प्रोसिडींगच्या ठरावाची प्रत, श्री. ए. बी. जाधव, यांच्या पर्यवेक्षक नियुक्तीचा ठराव व रुजू अहवालाची साक्षांकीत प्रत व याचबरोबर श्री. एस. एस. गवई, श्री. यु. एल. नवले आणि अन्य शिक्षकांची अशाच प्रकारची माहिती, वर्गनिहाय व शिक्षकनिहाय वेळापत्रकाची साक्षांकीत प्रत, नेमणूक आदेश, सर्व्हिसबुक झेरॉक्स, १९७९ ते २००६ या कालावधीतील शिक्षक हजेरीपटाची साक्षांकीत प्रत, शिक्षणाधिकारी यांनी प्रमाणित केलेली २००५ ची सेवा जेष्ठता यादी — या माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन त्यामध्ये अपिलार्थीस काही खुलासेवजा माहिती दिलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या वरील प्रकारच्या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीच्या अन्वये कोणतेही अपील केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी अशा प्रकरणी करावयाच्या अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदींचे पालन न करता, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००६ रोजी सरळ व्दितीय अपील केले. यामध्ये त्यांनी, आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी, मुख्याध्यापकाने सेवा जेष्ठता यादी व मागणीनुसार दस्तऐवजाची पुर्तता न केल्याने त्याच्या पदोन्नतीचा प्रश्न प्रलंबीत राहिला असल्याचे या अपील अर्जामध्ये म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही सुनावणीस उपस्थित नाही. त्यांना सुनावणीची नोटीस दिनांक २४-१०-२००७ रोजी, म्हणजे एक महिन्यापुर्वी पाठवून देखील, संबंधितांपैकी कोणीही आयोगा-समोर सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत. तद्वतच या प्रकरणी अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील न करता, राज्य माहिती आयोगाकडे सरळ व्दितीय अपील केले आहे. त्यांनी अवलंबिलेली अशा प्रकारची पध्दत चुकिची आहे. त्यांनी अवलंबिलेल्या अशा प्रकारच्या चुकिच्या पध्दती मुळे, त्यांचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक २९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अच्युतराव भिमराव जाधव, सह शिक्षक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, पिशोर तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, पिशोर तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शालेय समिती, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, पिशोर तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६९७

निर्णय दिनांक - २९-११-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री लक्ष्मण दशरथराव पाटील, एन-९, एच-१६४/०३, श्रीकृष्णनगर टि.व्हि. सेंटर चौकाजवळ, हडको, औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा उपसरव्यवस्थापक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, प्रधान कार्यालय, कॉटन काम्प्लेक्स अजनीचौक वर्धा रोड, नागपूर-१५. | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी तथा सर व्यवस्थापक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन | : | प्रतिवादी |

महासंघ मर्यादित, प्रधान कार्यालय,
कॉटन कॉम्प्लेकस, अंजनी चौक,
वर्धारोड, नागपूर- १५.

| | |
|---|---|
| प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी | सरव्यवस्थापक (विक्री) कापूस पणन महासंघ, प्रधान कार्यालय, मुंबई. |
| प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी | प्रभारी विभागीय व्यवस्थापक, कापूस महासंघ मर्यादित, औरंगाबाद. |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मण दशरथराव पाटील (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सरव्यवस्थापक (विक्री) कापूस पणन महासंघ, प्रधान कार्यालय, नागपूर, श्री. दिवाकर रामचंद्र कडू (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी तथा प्रभारी विभागीय व्यवस्थापक, कापूस पणन महासंघ मर्यादित औरंगाबाद, श्री. दगू कारभारी जाधव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९५-१९९६ ते २००४-२००५ या कालावधीतील संबंधित कार्यालयाकडील काही माहिती मागविली होती. या माहितीमध्ये- २००४-२००५ या वर्षामध्ये प्रक्रीया संस्थाना जादा पेमेंट केल्या बाबत जी चौकशी श्री. डी.एस.पाटील, उपसरव्यवस्थापक (हि.वि.) प्रशासकीय कार्यालय, मुंबई-१५ यांनी करुन त्याचा अहवाल वरिष्ठांना सादर केला व वरिष्ठांनी त्यावर कोणत्या कार्यवाहीचा शेरा दिला

त्याची एक प्रमाणित प्रत तसेच श्री.महाडिक लिपीक व श्री.भाले जे. लेखापाल यांना त्यावरुन दिलेली कारणे दाखवा नोटीस प्रत, श्री.एल.डी.पाटील, जेष्ठ लेखापाल (माजी) यांनी एकूण जी १० पत्रे दिलेली आहेत, त्या संबंधित पत्रावर वरिष्ठांचा जो काही कार्यवाहीबद्दल त्यावेळी शेरा आहे त्या शे-यांच्या संबंधित पानाची प्रत्येकी एक झेरॉक्स प्रत. या पत्रावर कोणतेही आदेश दिले नसेल तर त्या पत्रा संदर्भात त्यांनी अलहिदा दिलेल्या आदेशाच्या प्रती,- या माहितीचा समावेश होता.

सदर माहिती अपिलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षीली होती.

अपिलार्थीच्या या अर्जा संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांना माहिती देण्याकरिता वेळोवेळी लागणारी स्टेशनरी व पोस्टेज खर्च रु.१०००/- त्यांच्या विभागीय कार्यालय औरंगाबाद येथे भरण्याची व त्याची एक प्रत नागपूर येथील मुख्य कार्यालयास सादर करण्याची सूचना अपिलार्थीस देवून सदरील कार्यवाहीनंतर अपिलार्थीस माहिती देण्याचे त्यांना आश्वासीत केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- १६-११-२००६ रोजी रुपये १,०००/- इतक्या रक्कमेचा भरणा केला. अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात केल्याच्या पृष्ठयर्थ संबंधित पावतीची झेरॉक्स प्रत आयोगास सादर केली आहे. सदर पावतीचा क्रमांक १८१०८ व दिनांक- १६-११-२००६ असा आहे.

अपिलार्थीने आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करुन देखील  त्यांना संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५

मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक-१७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले.  सदर अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादामूळे व्यथित होवून अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना अवाजवी शुल्क आकारले, माहिती नाकारण्याचे कारण कळविले नाही, किती दिवसात व कोणाकडे अपील करावयाचे, याचा तपशीलहि त्यांनी दिला नाही, असे नमूद केले आहे. त्याचबरोबर त्यांनी एक अपिलमेमो सादर करुन सदर अपिलमेमोमध्ये त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्याकरिता संबंधित जनमाहिती अधिका-यांना आदेशित करावे व योग्य ते शासन करावे, अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांना आता जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक- २७-११-२००७ रोजी काही माहिती मिळाली आहे. सदर माहिती अर्धवट असून त्यांनी मूळ अर्जातील मुद्दा ३ (ड) मधील क्रमांक-१,३,४,५,६,७,८ येथे उल्लेखिलेल्या त्यांच्याकडील पत्राच्या वरिष्ठाने दिलेल्या शे-यासह प्रती दिल्या नाहीत. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी, त्यांना विलंबाने तर माहिती दिली आहे परंतू जी दिली ती देखील त्यांनी अपूरी दिली आहे. जनमाहिती अधिका-यांनी

विलंबाने व अपूरी माहिती दिल्याबद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्यावर  शास्ती लावण्याची कार्यवाही व्हावी, असाही त्यांनी पुढे युक्तीवाद केला.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक- ०१-११-२००६ रोजी मागितलेली माहिती ही मुंबई व नागपूर कार्यालयाशी संबंधित असल्यामूळे त्यांनी लागलीच दिनांक- ०४-११-२००६ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी, मुंबई व उपसरव्यवस्थापक, नागपूर यांच्याकडे अपिलार्थीच्या अर्जाची प्रत पाठवून त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात सादर करण्या विषयी सूचित केले. तथापि तदनंतर त्यांची दिनांक- ०८-१२-२००६ रोजी तेथून बदली झाल्याने अपिलार्थीने त्यांच्याकडे दिलेल्या माहितीसाठीच्या अर्जावर त्यांच्याकडून पाठपूरावा होवू शकला नाही व अंतिमतः संबंधिताकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक- २७-११-२००७ रोजी अपिलार्थीस ही माहिती दिली आहे.

आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम आणि दोन्हीही बाजूने केलेला युक्तीवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अधिकाराव्दारे मागितलेली माहिती त्यांना देण्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांना  फारसे स्वारस्य नसावे. अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक- ०१-११-२००६ रोजी अर्ज केल्या नंतर अपिलार्थीस त्यांनी दिनांक- ०६-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये  माहिती देण्यापोटीचे स्टेशनरी व पोस्टेजसह शुल्क रुपये १,०००/- भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस किती पृष्ठांची माहिती आहे ती देण्याचा दर काय आहे, पोष्टाचा अंदाजे खर्च काय आहे, ते कळविले नाही. अपिलार्थीने या पत्रामध्ये  सूचित केल्या प्रमाणे दिनांक- १६-११-२००६ रोजी सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात पावती क्रमांक १८१०८ व्दारे भरले. अपिलार्थीने  माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क भरुन देखील अपिलार्थीस अंतिमतः माहिती दिनांक २७-११-

२००७ रोजी प्राप्त झाली  व तीहि अर्धवट स्वरुपात, यावरुन जनमाहिती अधिका-यास अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये कितपत स्वारस्य  होते, याची आयोगास शंका येत आहे. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती फारशी क्लीष्ट किंवा व्यापक स्वरुपाची होती, असे म्हणता येणार नाही. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून उपलब्ध असलेली, त्यांनी विशिष्ट प्रकारे उल्लेख केलेल्या कागदपत्राच्या झेरॉक्सप्रती, अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जाव्दारे मागितल्या होत्या. तथापि  एवढी साधी माहिती देण्यास देखील जनमाहिती अधिकारी यांनी ११ महिने व १२ दिवस इतका विलंब लावल्याचे येथे दिसून येत आहे. सदर विलंबाचे कारण विचारले असता, अपिलार्थीने मागितलेली माहिती वेगवेगळया कार्यालयाकडे उपलब्ध होती व सदर माहिती या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांनी वेळेतच कार्यवाही केली, असे त्यांचे म्हणणे आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदी अन्वये जनमाहिती अधिका-यास माहिती देण्याकरिता त्यांचे जे इतर सहाय्यक / कर्मचारी जबाबदार असतील त्यांना देखील जनमाहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे.  ही तरतूद पाहता, जनमाहिती अधिकारी व त्याचबरोबर त्यांच्या कार्यालयातील जे इतर अधिकारी / कर्मचारी अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्यासाठी जबाबदार आहेत ते देखील जनमाहिती अधिकारी यांच्या इतकेच दोषी आहेत, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. जनमाहिती अधिका-याने येथे अपिलार्थीकडून  स्टेशनरीचा देखील खर्च अपेक्षिला आहे. वास्तविक पाहता माहिती अधिकार अधिनियमामध्ये माहिती देण्यासाठी प्रतिपृष्ठ २/- रुपये  अधिक पोस्टेज खर्च इतके त्यांनी अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी अपिलार्थीस द्यावयाची माहिती निश्चीतपणे किती पृष्ठांची आहे. त्याची संख्या व त्याचे प्रतिपृष्ठ  २/-रुपये मूल्य अधिक पोस्टेजखर्च एवढा खर्च अपिलार्थीस कळवावयास हवा होता. तथापि त्यांनी अपिलार्थीस १,०००/रुपये इतकी ठोक रक्कम  त्यांच्या कार्यालयात भरण्याचे अपिलार्थीस

कळविले. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली दिनांक- २७-११-२००७ रोजीची माहिती एकूण ६८ पृष्ठांची आहे, असे अपिलार्थीने आयोगास स्पष्ट केले.

वरील घटनाक्रमावरुन जनमाहिती अधिकारी व त्यांचे सहकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामूळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देवून त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वा वृती बद्दल त्यांच्यावर व्यवस्थापकीय संचालक कापूस पणन महासंघ यांनी प्रचलित सेवा नियमा प्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १५ दिवसात सादर करावा, त्याचबरोबर अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती पैकी अद्यापही जी माहिती द्यावयाची राहीली आहे ती संपूर्ण माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याने अपिलार्थीस त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (६) च्या तरतुदी नूसार विनामुल्य माहिती देणे क्रमप्राप्त ठरते, त्यामूळे त्यांनी अपिलार्थीकडून ही माहिती देण्यापोटीचे जे १०००/-रुपये इतके शुल्क अपिलार्थीस आकारले आहे व त्याचा भरणा त्यांच्या कार्यालयात करुन घेतला आहे, ती सदर १,०००/- रुपये इतकी रक्कम अपिलार्थीस त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत तात्काळ परत करावी. असेही त्यांना पुढे आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

४. अपील मान्य करण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलाथीस अद्यापपर्यंत जी माहिती दिली नाही ( त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा ३ (ड) मधील क्र. १,३,४,५,६,७,८ च्या शे-यासह प्रती ) ती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामुल्य पुरवावी.

६. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून सदर माहिती देण्यापोटी घेतलेले शुल्क रुपये १,०००/- अपिलार्थीस, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ दिवसाच्या आत परत करावे.

७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, मुंबई यांनी, जनमाहिती अधिकारी व त्यांचे या प्रकरणातील इतर सहाय्यकावर प्रचलित सेवा नियमा प्रमाणे हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन या संबंधीचा अनुपालन अहवाल तद् नंतर १५ दिवसात आयोगास सादर करावा.

औरंगाबाद. ( वि. बा. बोरगे )
दिनांक २९-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद
प्रत,

१ श्री.लक्ष्मणराव दशरथराव पाटील,एन-९,एच-१६४/०३, श्रीकृष्णनगर

टि.व्हि.सेंटर चौकाजवळ, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा , यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादित, खेतान भवन, ६ वा मजला, १९८ जे.टी.रोड, चर्चगेट रेल्वेस्टेशन जवळ, मुंबई -२० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/५७०

निर्णय दिनांक ३०-११-२००७

१ शेख मसरत पिता शेख अहेमदसाब, : अपिलार्थी
घर नं. ४-१३-३८/३९, मकसूद कॉलनी,
रोशनगेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, विधी व न्याय

विभाग, जुने उच्च न्यायालय इमारत,

अदालत रोड, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सह सचिव, विधी व न्याय विभाग, जुने

उच्च न्यायालय इमारत, अदालत रोड,

औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सॉलिसीटर (मु. वि.) नि - उपसचिव, विधी व न्याय विभाग, जुने उच्च न्यायालय इमारत, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : सह सचिव, विधी व न्याय विभाग, जुने उच्च न्यायालय इमारत, औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी शेख मसरत पिता शेख अहेमदसाब या गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा सॉलिसीटर (मु. वि.) नि उपसचिव, विधी व न्याय विभाग श्री. एकनाथ शिवराम बुधवत (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, विधी व न्याय विभाग श्री. संभाजीराव माधवराव शेंबोळे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक १२-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक १६-०८-२००४ पासून ते १२-०७-२००६ पर्यंतच्या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती. सदर अर्ज जन माहित अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

"१. एकतर्फी तलाख पाठविण्यापुर्वी कॉन्सीलींग केली आहे त्या तपशिलाची प्रत देण्यात यावी.

२. त्याचप्रमाणे तज्ञ डॉक्टरचा वैद्यकीय तपासणी अहवालाची प्रत देण्यात यावी.

३. एकतर्फी तलाख हे ज्या आदेशान्वये कायदेशीर व वैध ठरविला आहे त्या आदेशाची प्रत देण्यात यावी.

४. रितसर तक्रार करण्यापुर्वी, लग्नाच्या दोन महिन्यानंतर घरबांधणीसाठी रुपये १,००,००० /- ची मागणी केली त्या सबबीवर निर्दयतेने / क्रुरतेने / मानसिक, बौध्दीक छळ केली नाही व रुपये १,००,००० /- मागणी पूर्ण केली नाही असा लिहीत तलाखनाम्याची प्रत देण्यात यावी.

५. एकतर्फी तलाख हा अटी व शर्ती पूर्ण केल्यानंतर कधीही परत घेता येणार नाही असा एकतर्फी तलाखनामा आहे त्या तलाखनाम्याची प्रत देण्यात यावी."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्याने, ती माहिती त्यांना देता येणार नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक २९-०८-२००६ रोजी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी न घेता अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०९-२००६ च्या पत्राव्दारे निर्णय पारीत केला आहे. सदर निर्णय त्यांच्या कार्यालयाने दिनांक १८-०९-२००६ रोजी निर्गमीत केल्याचे दिसून येते. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांना दिलेले उत्तर ग्राह्य मानून, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नसल्याने अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये देखील त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना नैसर्गिक न्याय देण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी ह्या गैरहजर असून त्याची नोंद घेण्यात आली असून, त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे लेखी स्वरुपामध्ये मांडलेले म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे. अपिलार्थी श्रीमती शेख मसरत पिता शेख अहेमदसाब हिने तिचा नवरा व इतर दोघांच्याविरुध्द पोलीसात तक्रार केल्यावरुन पोलीस केस क्रमांक १३७६/२००३ कलम ४९८-अ, भा. द. वि. प्रमाणे औरंगाबाद येथील ८ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात दाखल झाली होती. संबंधीत न्यायालयाने दिनांक ०७-०५-२००४ रोजी सदर प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढून आरोपींची निर्दोष

मुक्तता केली होती. सदर निर्णय न्यायालयाचा असल्याने, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाचा या आक्षेपापर्यंत त्याच्याशी काही संबंध आला नाही. सदरील प्रकरणात आरोपींना निर्दोष सोडण्यात आल्यानंतर सरकारपक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील, औरंगाबाद यांनी सह सचिव, विधी व न्याय विभाग कार्यालयास सदर निकालाविरुध्द अपिलात जाण्याबाबत एक प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावासोबत न्यायालयाच्या निकालाची प्रमाणित प्रत व साक्षीदारांच्या जबाबाच्या प्रती पाठविण्यात आल्या होत्या. जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात या प्रस्तावाची छाननी करण्यात येऊन या प्रकरणामध्ये दिनांक १८-०८-२००४ रोजी अपील न करण्याचा निर्णय घेण्यात येऊन त्याप्रमाणे त्यांनी जिल्हा सरकारी वकीलास कळविले होते.

जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दयांशी त्यांच्या कार्यालयाचा दुरान्वये देखील कोणताही संबंध पोहोचत नाही. अपिलार्थीने मागितलेली माहिती ही, संबंधितांनी जर ती न्यायालयात सादर केली असेल तर संबंधीत न्यायालयाकडे उपलब्ध होऊ शकेल. त्यांच्याकडे ही माहिती कोणत्याही प्रकारे उपलब्ध होऊ शकत नसल्याने त्यांनी ही माहिती, अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तद्वतच, त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १४-०७-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांच्याकडील दिनांक १०-०८-२००६ च्या पत्रान्वये अपिलार्थीस विहित मुदतीत प्रथम प्रतिसाद दिला आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झालेल्या दिनांक २९-०८-२००६ रोजीच्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील विहित मुदतीत निर्णय घेऊन तो अपिलार्थीस दिनांक १८-०९-२००६ रोजी कळविला आहे. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत आपले

कर्तव्य पार पाडले असल्याचे त्यांनी त्यांच्या या युक्तिवादाव्दारे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकता असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे जी माहिती मागितली आहे ती कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाची कार्यपध्दती व त्यांना नेमून देण्यात आलेल्या कामाचे स्वरुप पाहता, ते फक्त शासनास वेगवेगळ्या विषयावर कायदेशीर सल्ला देण्यापुरतेच मर्यादित असल्यामुळे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध असणे दुरापास्त आहे. जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता अपिलार्थीने माहितीसाठीचा त्यांचा मूळ अर्ज चुकिच्या प्राधिकरणाकडे केल्याचे दिसून येते त्यामुळे अपिलार्थीचे हे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती हवी असल्यास त्यांनी, संबंधीत न्यायालयाकडे त्याची रितसर मागणी करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ शेख मसरत पिता शेख अहेमदसाब, घर नं. ४-१३-३८/३९, मकसूद कॉलनी, रोशनगेट, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा सॉलिसीटर (मु. वि.) नि - उपसचिव, विधी व न्याय विभाग, जुने उच्च न्यायालय इमारत, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सह सचिव, विधी व न्याय विभाग, जुने उच्च न्यायालय इमारत, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७००

निर्णय दिनांक ३०-११-२००७

१ श्री. रासूरे अभिमन्यू विरभद्रप्पा, : अपिलार्थी
रासूरे निवास,
मस्जिद रोड, गंजगोलाई,
लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, श्रीदेशिकेंद्र विद्यालय,
(सिग्नल कॅम्प), लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा
परिषद, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रासूरे अभिमन्यू विरभद्रप्पा व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीदेशिकेंद्र विद्यालय सौ. महाजन सुरेखा रामकृष्ण (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) या हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम, त्यांच्याकडील दिनांक ०५-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये (प्रत्यक्षात हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०१-२००६ रोजी प्राप्त झाला) जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या महाविद्यालयात नोकरीला असलेल्या एकूण ७ कर्मचा-यांच्या विषयी खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ या पत्रासोबत जोडलेल्या कर्मचा-याचे टी. सी. प्रमाणपत्रे व सेवा पुस्तकातील जातीचा उल्लेख असणारा पृष्ठांक मिळणेबाबत.”

अपिलार्थीने खालील कर्मचा-यांची माहिती या अर्जाव्दारे मागितली होती -

१) श्री. व्ही. के. हलकंचे, २) श्री. बी. एन. राघो, ३) एस. एच. इटगे, ४) श्री. जी. एन. रायफळे, ५) सौ. थोटे एस. टी. (सर्व सह शिक्षक), ६) श्री. व्ही. जी. कारभारी, ग्रंथपाल, ७) श्री. व्ही. एम. बेलूरे, प्रयोगशाळा परिचर.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, संबंधीत कर्मचा-यांच्या जात प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व सेवा पुस्तकातील जातीचा उल्लेख असलेल्या पृष्ठांच्या सत्यप्रती अपिलार्थीस दिल्या. या पत्रामध्ये त्यांनी संबंधीत कर्मचा-यांच्या टी. सी. प्रमाणपत्राच्या सत्यप्रती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपिलावर सुनावणी न घेता, जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०७-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये मागितलेली संपूर्ण माहिती ३ दिवसात देण्याच्या सूचना दिल्या व याच बरोबर सदर माहिती अपिलार्थीस विहित मुदतीत न पुरविल्यास त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्याचा इशारा देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांना या पत्रात शेवटी दिलेला आहे. तदनंतर मुख्याध्यापक व शिक्षणाधिकारी यांच्यामध्ये याविषयासंदर्भात बराच पत्रव्यवहार झाल्याचे, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी जन अपिलीय अधिकारी यांना

लिहिलेल्या दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रामध्ये, त्यांनी अपिलार्थीस माहिती न देण्याचे कारण म्हणून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या तरतुदीचा आधार घेतला आहे. जन माहिती अधिकारी यांचे जन अपिलीय अधिकारी यांना पाठविलेले पत्र हे चुकिच्या गृहितकावर आधारीत आहे. कारण जन अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांनी हे पत्र पाठविण्यापुर्वीच, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ हा निरसीत झाला होता व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा आस्तित्वात आला होता, याची जाणीव जन माहिती अधिकारी यांना कदाचित त्यावेळी नसावी असे दिसते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून इच्छित माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना टी. सी. प्रमाणपत्राची मागणी केली असतांना सदर प्रमाणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिल्या नसल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे सदर कर्मचारी हे संस्थाचालकांचे नातेवाईक असून, त्यांच्या टी. सी. वर लिंगायत (ओपन) असे लिहिलेले आहे व जातीच्या बोगस प्रमाणपत्राआधारे त्यांनी या संस्थेत नियुक्त्या मिळविल्या असल्याचे, त्यांनी या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, सदर कर्मचारी संस्थाचालकांचे नातेवाईक असल्यामुळे यात मुख्याध्यापक व कर्मचा-यांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे त्यांनी शासनाची फसवणूक केलेली आहे व या अर्जाच्या शेवटी त्यांनी संबंधीत कर्मचा-यांच्या टी. सी. प्रमाणपत्राच्या मागणीचा पुनरुच्चार केला आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे त्यांचे जे लेखी स्वरुपात म्हणणे सादर केले आहे तोच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मागितलेल्या माहितीपैकी, या सर्व कर्मचा-यांच्या जात प्रमाणपत्राच्या सत्यप्रती व सेवा पुस्तकातील जातीचा उल्लेख असलेल्या पृष्ठांच्या प्रती अपिलार्थीस समक्ष देऊन त्याची पोहोच घेण्यात आलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस दिनांक २१-०३-२००६ रोजी देण्यात आल्याबद्दल अपिलार्थीने, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील दिनांक २१-०३-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळ प्रतीवर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ केलेली स्वाक्षरी त्यांनी आयोगास दाखविली. यावरुन अपिलार्थीस ही माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, सदर माहिती अर्धवट असून, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस टी. सी. प्रमाणपत्राच्या सत्यप्रती पुरविल्या नाहीत. टी. सी. प्रमाणपत्राबाबत जन माहिती अधिकारी यांना आयोगाने विचारले असता त्यांनी आयोगासमोर शपथपत्राव्दारे असे स्पष्ट केले आहे की, टी. सी. याचा अर्थ ट्रान्सफर सर्टिफिकेट असा असून, सदर प्रमाणपत्र शाळा व महाविद्यालयातर्फे विद्यार्थ्यांना ते ज्या वेळी शाळा अथवा महाविद्यालय सोडून जात असतात त्यावेळी त्यांना दिले जाते. सदर प्रमाणपत्राच्या प्रती तदनंतर हे विद्यार्थी ज्या शाळेत अथवा महाविद्यालयात प्रवेश घेतात त्यांच्याकडे कायम स्वरुपी सादर केले जाते. संबंधीत सात कर्मचारी त्यांच्या संस्थेत कर्मचारी म्हणून कार्यरत असल्याने सदर प्रमाणपत्रे त्यांच्या कार्यालयात असण्याचा कोठेही प्रश्न उद्‌भवत नाही. त्यांनी संबंधीत कर्मचा-यांना नेमणूक देतेवेळी ज्या जातीच्या प्रमाणपत्राचा आधार घेतला त्या प्रमाणपत्राची व संबंधीत कर्मचा-याच्या सेवा पुस्तकातील त्यांच्या जातीचा उल्लेख असलेल्या पृष्ठाची प्रत अपिलार्थीस दिली आहे व सदर प्रत अपिलार्थीस दिल्याबाबतचा पुरावा देखील त्यांनी आयोगास सादर केला आहे.

सर्वसाधारण परिस्थितीत, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०७-०१-२००६ रोजी माहितीसाठीचा अर्ज केल्यास, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून

दिनांक ०६-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी माहिती मिळणे, अधिनियमातील कलम ७ (१) अन्वये अभिप्रेत आहे. तथापि, या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २१-०३-२००६ रोजी माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी ४५ दिवस इतक्या विलंबाने माहिती दिल्याचे व पर्यायाने माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला असल्याचे सिध्द होत आहे.

आज रोजी सुनावणीमध्ये उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, त्या या शाळेत मुख्याध्यापकपदी दिनांक ०१-०४-२००६ रोजी रुजू झाल्या आहेत. सदर प्रकरण घडले त्यावेळेस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक म्हणून श्री. भालचंद्र सायबन्ना जिरगे हे होते व ते आता नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. हे पाहता त्यांच्यावर आता त्यांनी विलंबाने माहिती दिल्याबद्दल कारवाई करता येणे शक्य नसल्याने, यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत. तथापि सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी येथून पुढे त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीअन्वये प्राप्त झालेल्या माहितीच्या अर्जावर, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती द्यावी.

या प्रकरणी मुळात अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही प्रकारे उपलब्ध होण्याची शक्यता नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिलेली असल्याने अपिलार्थीचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ३०-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रासूरे अभिमन्यू विरभद्रप्पा, रासूरे निवास, मस्जिद रोड, गंजगोलाई, लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीदेशिकेंद्र विद्यालय, (सिग्नल कॅम्प), लातूर यांना या निकालपत्रा तील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०१

निर्णय दिनांक - ३०-११-२००७

श्री.खान रजाउल्ला हिदायतउल्ला : अपिलार्थी
सनत नगर, मळवटी रोड, अल्फलाह
शाळेजवळ लातूर जि.लातूर.

**विरुध्द**

१ जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१. :

२ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई. : प्रतिवादी

प्रत्यक्षतः जनमाहिती अधिकारी : शिक्षण संचालक (प्राथमिक) संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत्यक्षतः जनअपिलीय अधिकारी : शिक्षण संचालक (प्राथमिक) संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे-१

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री.खान रजाउल्ला हिदायतउल्ला (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्रा) शिक्षण संचालनालय, पुणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, शालेय शिक्षण, मंत्रालय, मुंबई (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे ३० सप्टेंबर २००५ रोजीची अल्पभाषिक प्राथमिक शाळा संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

□(एक) माहितीचा विषय : शासन निर्णय दिनांक- ३०-०१-१९९६ मध्ये निकष □ब□ नुसार अल्पभाषिक प्राथमिक शाळांसाठी जे निकष आहेत त्या प्रमाणे महाराष्ट्र राज्यात

जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिका व्दारा संचलित उर्दू प्राथमिक शाळांमध्ये ३०-०९-२००५ चे पट व उपस्थितीच्या आधारे किती पद मान्य आहे व त्या पैकी किती रिक्त आहेत ही माहिती जिल्हा निहाय मिळणे बाबत.

अपिलार्थीने त्यांना हवी असलेली माहिती एका विशिष्ट तक्त्यात अपेक्षिली असून त्या तक्त्याचा नमूना त्यांनी या अर्जा सोबत खालील प्रमाणे सादर केला आहे.

| क्र. | जिल्ह्याचे नांव | जिल्हा परिषद व्दारा संचलित शाळा | | | | | | नगर परिषद व महानगरपालिका व्दारा संचलित शाळा | | | | | | साध्य जि. प. न. प. व म. न. प. मध्ये एकूण रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | शाळा संख्या | पट | | ३०-९-०५ च्या वि. पटसंख्या व उप नुसार अनुज्ञेय पदे | सध्या कार्यरत पदे | सध्या रिक्त पदे | शाळा संख्या | पट | | ३०-९-०५ च्या वि. पटसंख्या व उप नुसार अनुज्ञेय पदे | सध्या कार्यरत पदे | सध्या रिक्त पदे | |
| | | | मुले | मुली | | | | | मुले | मुली | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |

अपिलार्थीने ही माहिती रजिष्टर टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या मूळ अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक-०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून त्यामध्ये एकूण २९ जिल्हापरिषदेच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. उर्वरित ४ विभागाची माहिती त्यांच्याकडे प्राप्त झाली नसल्याने सदर माहिती प्राप्त झाल्या नंतर ती अपिलार्थीस पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी याच पत्राव्दारे अपिलार्थीस आश्वासीत केले आहे. या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी माहितीची प्रत सोबत जोडली असल्याचे म्हटले आहे. तथापि या पत्रावर जोडलेल्या सहपत्राचा कोणताही उल्लेख नाही. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी या पत्राव्दारे अपिलार्थीस खरोखरीच माहिती पाठविली होती किंवा कसे, या बाबत शंका निर्माण होत आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस संपूर्ण माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १५-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने प्रथम अपील सचिव, शालेय शिक्षण, महाराष्ट्र-राज्य मुंबई यांच्याकडे केले होते. तथापि या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी, शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे हे असल्यामूळे सचिव, शालेय शिक्षण यांनी अपिलार्थीचा सदर अपील अर्ज त्यांच्याकडील दिनांक- १७-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये संबंधित शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांच्याकडे हस्तांतरीत

केला. अपिलार्थीचा सदर अर्ज प्राप्त होवूनही जनअपिलीय अधिकारी यांनी या अपीलाची कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीने माहितीसाठी केलेला दिनांक-०१-१२-२००५ चा प्रथम अर्ज व दिनांक- १५-०२-२००६ रोजी केलेले प्रथम अपिल या दोन्ही अर्जावर त्यांनी दिनांक- ०७-०३-२००६ च्या वर उल्लेखिलेल्या पत्राव्दारे एकत्र प्रतिसाद दिला आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादामूळे व्यथित होवून अपिलार्थीने, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १३-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना अर्धवट व अप्रमाणित माहिती दिल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या सुनावणीच्यावेळी अपिलार्थी, जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी हे तिघेही गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी त्यांचे म्हणणे एका फॅक्स व्दारे आयोगास सादर केले असून त्यामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपीलावर सुनावणी ठेवली नाही व त्यांना जी माहिती प्राप्त झाली ती त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर प्राप्त झाली तव्दतच त्यांना अद्यापहि नागपूर विभागाची माहिती प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी या पत्रामध्ये म्हटले आहे. त्यांचे हे म्हणणे हाच त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या इतर वेगवेगळया कार्यालयाकडून प्राप्त करुन घेवून तदनंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी सदर माहिती गोळा करण्यासाठी त्वरेने कार्यवाही केली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून अपिलार्थीस अर्धवट माहिती पुरविल्याचे दिसून येते. ही माहिती देखील दिनांक- ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रा सोबत जोडली असल्याचा कोणताही पुरावा आयोगाकडे असलेल्या कागदपत्रामध्ये उपलब्ध नाही. उपलब्ध कागदपत्रावरुन फक्त एवढेच अनुमान काढता येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्या संदर्भात  प्रथम प्रतिसाद, अधिनियमा व्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने दिलेला आहे. सर्व साधारण परिस्थितीत अपिलार्थीस ही माहिती दिनांक- ३१-०१-२००६ रोजी अगर तत्पूर्वी मिळणे अपेक्षित  आहे तथापि अपिलार्थीस ती ३५ दिवस इतक्या विलंबाने पुरविली गेल्याचे दिसते. या विलंबाचे समर्थन करण्याकरिता जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्यातर्फे कोणतेहि प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिका-यास त्यांचेकडील क्षेत्रिय अधिका-यांकडून प्रथमतः प्राप्त करुन घेवून नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागत होती. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जनमाहिती अधिकारी यांना माहिती देण्यास त्यांचे जे इतर कर्मचारी / सहायक जबाबदार आहेत त्यांना देखिल जनमाहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यासाठी जबाबदार असलेले त्यांचे क्षेत्रिय स्तरावरील इतर अधिकारी हे देखिल या विलंबास तितकेच जबाबदार ठरत आहेत. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक-

०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अर्धवट माहिती दिल्याचे त्यांच्या आज रोजी आयोगास पाठविलेल्या पत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीस अर्धवट माहिती मिळाल्याने त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत अपील केले. परंतू जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे विहित मुदतीत अपील ठरविण्याची तसदी देखील घेतली नाही. सदर अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांनी का घेतली नाही, हे आयोगास आज जन अपिलीय अधिकारी यांच्या गैरहजेरीमुळे कळण्यास मार्ग नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, शिक्षण विभागातील कर्मचारी / अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीशी काहीहि सोयरसूतक नाही. आयोगाकडे प्राप्त झालेल्या शिक्षण विभागाच्या सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी अनुपस्थित राहणे, हे नित्याची बाब झाली आहे. शिक्षण विभागाच्या अधिका-यावर आयोगाने त्यांच्या निर्णयामध्ये वेळोवेळी ताशेरे ओढूनहि त्याचा त्यांच्या कार्यपध्दतीवर कोणताहि परिणाम झाल्याचे आयोगास आढळून आले नाही. शिक्षण विभागातील अधिका-याच्या कार्यशैलीतील बेपर्वाई व अकार्यक्षमतेचा कळस त्यांनी त्यांच्या कार्यपध्दतीने आता गाठला असल्याचे त्यांच्या वेळोवेळीच्या अनुपस्थितीवरुन व वेगवेगळया पत्राने अपिलार्थीना दिलेल्या प्रतिसादावरुन दिसून येतो.

उपरोक्त प्रकरणी जनमाहिती अधिकारी व त्यांचे क्षेत्रिय स्तरावरील संबंधीत अधिकारी यांनी अपिलार्थीस अर्धवट व विलंबाने माहिती देवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वा वृती सिध्द केली असल्यामूळे असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यास जबाबदार असलेले क्षेत्रिय

अधिकारी या सर्वांवर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीनूसार प्रतिदिनी २५०/- प्रमाणे एकूण ३५ दिवसाकरिता एकुण रुपये ८,७५०/-(एकुण रुपये आठ हजार सातशे पन्नास) इतकी शास्ती का लावू नये, याचा खुलासा त्यांनी, हे आदेश त्यांना प्राप्त होताच, तीस दिवसाच्या आत लेखी स्वरुपात सादर करावा. सदर खुलासा प्राप्त न झाल्यास जनमाहिती अधिकारी यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे समजून सदर आदेश आयोगातर्फे अंतिम करण्यात येईल. तसेच संबंधित जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यास जबाबदार असणारे इतर सहाय्यक दोषी कर्मचारी / अधिकारी यांच्यावर सचिव (शालेय शिक्षण) यांनी उपरोक्त प्रकरणात त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइ बद्दल प्रचलित सेवा नियमानूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश त्यांना प्राप्त होताच १५ दिवसाच्या आत अपिलार्थीने विहित केलेल्या नमुन्यात, विनामुल्य पुरवावी.

३. संबंधित जनमाहिती अधिकारी व त्यांना माहिती देण्यास जबाबदार असणारे इतर सहाय्यक दोषी कर्मचारी / अधिकारी यांच्यावर सचिव (शालेय शिक्षण) यांनी, उपरोक्त प्रकरणात त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य पराणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाइ बद्दल प्रचलित सेवा नियमानूसार यथायोग्य

प्रशासकीय कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद. ( वि. बा. बोरगे )
दिनांक ३०-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री.खान रजाउल्ला हिदायतउल्ला, सनत नगर, मळवटी रोड, अल्फलाह शाळेजवळ, लातूर, जिल्हा- लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (BY RPAD )

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण संचालक (प्राथमिक) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१ ,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (BY RPAD )

४ सचिव (शालेय शिक्षण) मंत्रालय, मुंबई-३२, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (BY RPAD )

५ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०२

निर्णय दिनांक - ३०-११-२००७

श्री.सोमनाथ दादाराव डाके, : अपिलार्थी
घ.नं. १/ १८३, तांबरी विभाग,

ता.जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१ जनमाहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, :
राज्य परिवहन उस्मानाबाद.

२ जन अपिलीय अधिकारी तथा : प्रतिवादी
प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन
कार्यालय, उस्मानाबाद.

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-११-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. सोमनाथ दादाराव डाके (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन उस्मानाबाद, श्री. बापूसाहेब नामदेवराव लाळीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक १३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील काही कर्मचा-याच्या कामा विषयी / दौ-या विषयी व सर्वसाधारण कामकाजा विषयी एकूण ४ मुद्यांवर २००४- २००५ ते २००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

१. श्री.सी.जी.मुळे वाह. निरी. हे तपासणी पथकातून आर अँड टी शाखेत रुजू झालेपासून किती वेळा मुंबईला गेले व कोणत्या कोणत्या कामा करिता गेले?

२. देगावकर, वाह. निरि. यांनी कळंब आगारातून विभागीय कार्यालयात बदली झाल्यानंतर यांच्या कामाची उत्पादकता काय ? गेल्या दोन महिन्यापासून ते कोठे कामगीरी करीत आहेत ?

३. श्री. देगावकर, वाह.निरी./ श्री.आर.एस. कुलकर्णी, स्टेनो / श्री. जी.एच. इंगळे, लेखापाल हे कोणत्या कामा करिता किती दिवसाकरिता सुरतला गेले होते ? त्यांचे कामाची फलनिश्पती काय ? (टी/४ प्रमाणे तपशील)

४. मार्ग तपासणी पथकात सध्या स.वा.नि. आहेत. उपलब्ध गाडयांच्या संख्यानुसार किती चालक आहेत ? ते सँक्शन कि प्रमाणे आहेत काय ?

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक- २४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देवून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील कलम ७ चे पोट कलम (ट) अन्वये ही माहिती अपिलार्थीस देण्याचे नाकारले. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीचा मुद्दा क्रमांक-४ संबंधातील माहिती देतांना, तपासणी पथकात सध्या नियमाप्रमाणे सहाय्यक वाहतूक निरिक्षक / चालक आहेत व ते मंजूरी प्रमाणे आहे, अशा प्रकारचे मोघम उत्तर दिल्याचे दिसून येते.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये दिनांक- १२-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि

त्यांनी त्यांच्याकडील दिनांक- २५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक- २४-०३-२००६ रोजीच्या पत्रास सहमती दर्शविली आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसला तरी त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असल्याचा निष्कर्ष त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रावरुन काढता येतो.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या निर्णयाने व्यथित झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनूसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तीवादाच्यावेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी नाकारली, माहिती नाकारल्याने त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे अपिलाची सुनावणी न घेता फक्त जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जास उद्देशून  दिलेल्या प्रथम उत्तरास सहमती दर्शविली. त्यांनी जर अपिलाची सुनावणी घेतली असती तर अपिलार्थीला आयोगाकडे व्दितीय अपील करण्याची गरज पडली नसती. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळण्या बाबत ते आजहि ठाम आहेत.

जनमाहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक- १५ जून, २००७ रोजी या पदावर रुजू झाले असून त्यांच्या अगोदरच्या जनमाहिती अधिका-यानी अपिलार्थीस ती माहिती का दिली नाही. याबद्दल त्यांच्याकडे आज रोजी कारणे उपलब्ध नाहीत. तथापि अपिलार्थीने मागितलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून अपिलार्थीस ती माहिती विनामुल्य देण्यास ते तयार आहेत. सदर तयार असलेली माहिती पाहता अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी ही माहिती सुसंगत असल्याचे दिसून येते.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने ज्यावेळी अर्ज केला त्यावेळी कार्यरत असलेले जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उत्तर देण्याकरिता महाराष्ट्र माहिती अधिकार २००२ च्या अधिनियमातील तरतुदीचा आधार घेतला आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे उत्तर देण्याच्या वेळी महाराष्ट्र माहिती अधिकार २००२ हा निरसीत झाला होता. त्यामूळे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले हे उत्तर ग्राहय धरता येणार नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा  क्रमांक-४ च्या संबंधी दिलेली माहिती मोघम स्वरुपात दिल्याचे दिसून येते, किंबहूना ही माहिती अपिलार्थीस द्यावयाची नाही, असाच त्यांचा उद्देश असावा, अशी त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रावरुन ध्वनित होते. तथापि आता सध्या कार्यरत असलेले जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली सर्व माहिती तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या अज्ञानापोटी अपिलार्थीस दिनांक- २४-०३-२००६ रोजी उत्तर दिल्याचे दिसून येते. या पत्रातील उत्तरामध्ये अपिलार्थीने मागितलेली माहिती मोघम स्वरुपात पुरविल्या बद्दल त्यांना आयोगातर्फे ताकीद

देण्यात येत असून या पुढे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा अभ्यास करुन नंतरच त्यावर आपला निर्णय घ्यावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे. त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी, असेहि पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपीलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत असून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

४. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

६. तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना आयोगातर्फे अपिलार्थीस मोघम उत्तर दिल्याबद्दल ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद. ( वि. बा. बोरगे )
दिनांक ३०-११-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री.सोमनाथ दादाराव डाके, घर नंबर १/१८३, तांबरी विभाग, उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक राज्य परिवहन, उस्मानाबाद, यांना

या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, राज्य परिवहन प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद,यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, राज्य मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती